Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon




## INTERNAL QUALITY ASSURANCE CELL

## Criterion – 3 Research, Innovations and Extension

## 3.4- Extension Activities

**3.4.1 Extension Activities carried out in the Neighborhood Community, sensitizing students to social issues for their holistic development and impact thereof during the last five years**

## Survey of Old Temple in the region of Wadvani, Dharur and Majalgaon –A Case Study

M.S.P. Mandal's

Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Department of History

Extension Activity

Survey of Old Temple in the region of Majalgaon, Wadvani and Dharur: A Case Study

A Short Translated Report

The Dept. of History undertook the extension activity i.e. Survey of Old Temple in the region of Majalgaon, Wadvani and Dharur: A Case Study with help of Students, Teachers, and people of the concerned Villages regarding financial supports from the government. This survey aims to fetch the attention of the government to renovate the old famous historical sites of the region. It includes Lord Kesvraj Temple Kesapuri, Lord Purshottama Temple Purushottampuri, Saint Gautam Rushi Temple and Sarduleshwar Temple Sadola, Lord Trivikarma Temple Majarath, Lord Moreshwar Temple Gangamasala, Lord Narshiha Temple Mogara, Lord Rameshwar, Lord Somnath and Lord Vishnu Temple Shukalteerth Limbgaon, Dharur Fort Dharur, Lord Makrdhawaj Temple Chinchvan, Lord Khandoba Temple Devdahifal, Lord Aai Temple Kannapur, Lord Jagdamba Temple Aai Tanda, Lord Kanifnath Temple Mohakhed, Lord Dhunkeshwar Temple Dhunkwad, Lord Harishandra Temple Harshchandra Pimpri, Lord Ganesh Temple Pathrud.

The same 'Survey of Old Temple in the region of Majalgaon, Wadvani and Dharur: A Case Study' is submitted through Member of Legislative Assembly of this constituency to the Government of Maharashtra for Tourism and Religious development of the region. As a result, nine core rupees is sanctioned to the Lord Purshottama Temple Purushottampuri for renovation.

PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist. Beed (M.S.)

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon, Wadvani and Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes study report of all temples and collection of historical information of the temples in the above taluka villages.

Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon
Dept. of History

**म.शि. प्र. मंडळ संचलित**

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

## इतिहास विभाग

## माजलगाव वडवणी व धारूर तालुक्यातील मंदिरांचा निरीक्षण अहवाल

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने माजलगाव वडवणी व धारूर तालुक्यातील ऐतिहासिक मंदिराचा अभ्यास करण्यात आला व अभ्यासांती या मंदिराच्या संदर्भातील अहवाल माजलगाव वडवणी व धारूर मतदार संघाचे माननीय आमदार प्रकाश दादा सोळंके यांना सुपूर्द करण्यात आला सद्यस्थिती तील या मंदिराच्या परिस्थितीच्या संदर्भात सविस्तर अहवाल मंदिरानिहाय देण्यात आला इतिहास विभागाच्या वतीने इतिहास विभागप्रमुख प्रा.बालाजी बोडके,प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. संजय बागुल व प्रा. महादेव आलझेंडे तसेच 26, 27,28,29,30 सप्टेंबर व 1,2आणि 3 ऑक्टोबर 2020 रोजी एकूण आठ दिवसात तीन तालुक्यातील मंदिराचा सविस्तर अभ्यास करण्यात आला.

दिनांक 26 सप्टेंबर 2020 रोजी प्रा.बालाजी बोडके व इतिहासाच्या 10 विद्यार्थ्यांनी केसापुरी येथील केशवराज मंदिर व गावाबाहेरील प्राचीन माड मंदिराचा सविस्तर अभ्यास केला.

दिनांक 27 सप्टेंबर 2020 रोजी माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील श्री. पुरुषोत्तम मंदिराचा सर्वे करण्यात आला व त्या संदर्भातील सर्व इत्यंभूत माहिती डॉक्युमेंट्स व स्थापत्याच्या दृष्टिकोनातून माहिती घेण्यात आली व तसा अहवाल तयार करण्यात आला. 27 सप्टेंबर 2020 रोजी सादोळा येथील शार्दुलेश्वर मंदिराचा सर्वे करण्यात आला व त्यानंतर त्याच दिवशी गौतम ऋषी मंदिराचाही निरीक्षण अहवाल तयार करण्यात आला. 27 सप्टेंबर रोजी श्री पुरुषोत्तम मंदिर श्री गौतम ऋषी मंदिर व श्री शार्दुलेश्वर मंदिराचा अभ्यास करण्यात आला. यावेळी 10 विद्यार्थी या सर्वेक्षणात सहभागी झाले होते व त्यांच्यासोबत इतिहास विभागप्रमुख प्रा.बालाजी बोडके, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. संजय बागुल उपस्थित होते.

28 सप्टेंबर 2020 रोजी माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथील त्रिविक्रमाचे मंदिर व सोमनाथाच्या मंदिराचा अभ्यास करण्यात आला तर दुपारनंतर गंगामसला येथील मोरेश्वर मंदिराचा अभ्यास करण्यात आला या दिवशी 09 विद्यार्थ्यांनी या सर्वेक्षणात सहभाग घेतला. यावेळी इतिहास

विभागप्रमुख प्रा. बालाजी बोडके, प्रा. महादेव आलझेंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व अहवाल तयार केला.

29 सप्टेंबर 2020 रोजी माजलगाव तालुक्यातील मोगरा व शुक्ल तीर्थ लिमगाव येथील मंदिराचा अभ्यास करण्यात आला. मोगरा येथील प्राचीन नरसिंह मंदिराचा अभ्यास करून तसा अहवाल तयार केला तर शुक्ल तीर्थ लिमगाव येथील रामेश्वर मंदिर व सोमनाथ मंदिराचा अभ्यास करून तसा अहवाल तयार केला. या दिवशी प्रा. बालाजी बोडके, सुदर्शन स्वामी व 12 विद्यार्थ्यांनी या अभ्यासात सहभागी झाले.

दिनांक 30 सप्टेंबर 2020 रोजी धारूर तालुक्यातील देव दहिफळ, आई तांडा कान्नापूर व मोहखेड येथील मंदिराचा अभ्यास करण्यात आला. देवदहिफळ येथील खंडोबा मंदिराचा अभ्यास करून तेथील स्थापत्य कलेच्या संदर्भातील एक उत्कृष्ट नमुना म्हणून विद्यार्थ्यांना प्रवेशद्वारावरील कमाल व त्यापुढील असंख्य मुर्त्या दाखवण्यात आल्या. त्यानंतर कान्नापूर येथील आई मंदिराचा सर्वे करण्यात आला व त्या संदर्भातील जी महती आहे किंवा लौकिक कथा आहेत त्यांचाही आढावा घेण्यात आला. त्यानंतर मोहखेड येथील कानिफनाथ मंदिराचा अभ्यास करण्यात आला. तिथे असलेलं मुस्लिम धार्मिक स्थळ आणि कानिफनाथ मंदिर हे विशेष आहे. त्यानंतर आई तांडा येथील आई मंदिराचा अभ्यास करण्यात आला व त्या संदर्भातील आख्यायिका व लौकिक लोककथा आणि लोकगीतांचा आढावा घेऊन ऐतिहासिक घटनांची नोंद घेण्यात आली. या दिवशीच्या अभ्यास दौऱ्यात इतिहास विभागप्रमुख प्रा. बालाजी बोडके, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. संजय बागुल व 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक 01 ऑक्टोबर 2020 रोजी धारूर व वडवणी तालुक्यातील ऐतिहासिक वास्तुचा अभ्यास करण्यात आला. धारूर येथील ऐतिहासिक वास्तु किल्ला या संदर्भात पाहणी करून तसा अहवाल तयार करण्यात आला व किल्ल्यांची संदर्भात चौकशी करण्यात आली व तसा अहवाल तयार करून त्यातील त्रुटी अहवालात नोंदवण्यात आल्या यानंतर वडवणी तालुक्यातील चिंचवन येथे मकरध्वजाच्या मंदिराचा अभ्यास करण्यात आला तसेच त्याच गावातील शिव व विष्णू मंदिराचाही अभ्यास करण्यात आला चिंचवन येथून विष्णू मंदिरातून निघणारे गुंफा धारूरच्या किल्ल्यातून अंबाजोगाईच्या अंबा मंदिरात कशी निघते यांचे वर्णन तेथील गृहस्थानी सांगितले. तसेच येथील ऐतिहासिक वास्तूच्या संदर्भात व वास्तू कलेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली तसेच या मंदिराच्या पुनर्वसनासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्या गोष्टी अहवालात नमूद करण्यात आल्या. या दिवशी प्रा. बालाजी बोडके, प्रा.सुदर्शन स्वामी व 10 विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभागी झाले.

दिनांक 2 ऑक्टोबर 2020 रोजी वडवणी तालुक्यातील धुणकेश्वर व हरिश्चंद्र पिंपरी येथील मंदिराचा अभ्यास करण्यात आला. प्राचीन धुणकेश्वर मंदिराचा ऐतिहासिक धार्मिक व स्थापत्यच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली त्यानंतर हरिश्चंद्र पिंपरी येथील एकमेव मंदिर असलेले राजा हरिश्चंद्र यांचे मंदिर व त्या संदर्भातील ऐतिहासिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली व या दोन्ही मंदिरांचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला यावेळी प्राध्यापक बालाजी बोडके प्राध्यापक सुदर्शन स्वामी व 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक 3 ऑक्टोबर 2020 रोजी माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील श्री गणेश मंदिराचे निरीक्षण करून सखोल अभ्यास करण्यात आला. यावेळी दहा विद्यार्थी ग्रामस्थ प्राध्यापक बागुल प्राध्यापक सुदर्शन स्वामी व इतिहास विभागप्रमुख बालाजी बोडके उपस्थित होते.

या तीन तालुक्यातील ऐतिहासिक वास्तूंचा सर्वे केल्यानंतर त्या संदर्भातील जे वैशिष्ट्य आहेत किंवा त्यांच्या पुनर स्थानासाठी ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्याची नोंद संबंधित अहवालात करण्यात आली व हा अहवाल महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वतीने माजलगाव वडवणी व धारूर या तालुक्याचे लोकप्रतिनिधी आमदार प्रकाश दादा सोळंके यांना हा अहवाल सुपूर्द करण्यात आला त्यानंतर लोकप्रतिनिधी आमदार प्रकाश सोळंके यांनी या मंदिराच्या संदर्भात विधिमंडळात आवाज उठउन या मंदिराच्या साठी भरघोस मदत खेचून आणली एकटा पुरुषोत्तम मंदिरासाठी नऊ कोटीचा निधी उपलब्ध करण्यात आला हे इतिहास विभागाचे व महाविद्यालयाचे तालुक्याच्या पर्यटन व ऐतिहासिक विकासासाठीचे योगदान आहे.

**Head**
**Department of History**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

Temple survey Photo Report

Date 26/09/2020 – Keshavraj Temple , Kesapuri




Mad Temple



Keshavraj Templ




Shri Keshavraj




**Date 27/09/2020 – Shri.Purusottam Temple Purushottampuri, Shri. Sharduleshwar Temple Sadola & Shri. Gautamrushi Temple Sadola**




**Shri.Purusottam Temple Purushottampuri**



**Shri.Purusottam Purushottampuri**



Shri. Mahadev, Parvati & Ganpati Temple **Purushottampuri**




Shri. Mahadev, Parvati & Ganpati Temple **Purushottampuri**



**Shri. Sharduleshwar Temple Sadola**



**Shri. Sharduleshwar Temple Sadola**




**Shri. Gautamrushi Temple Sadola**



**Shri. Gautamrushi Temple Sadola**

## Date 28/09/2020 – Manjrath, Gangamasala Temple.



**Inscription on Manjrath Temple**



**Trivikrama Manjrath Temple**



Shri. Moreshwar Temple in Godavari river, Gangamasala.




Archaeological Place of Moreshwar Temple.

**Date 29/09/2020 – Mogra, Shuklatirth Limbgaon.**



Shri. Narsinha Temple, Mogra



Shri. Narsinha Temple, Godavari Ghat , Mogra



Shri. Rameshwar Temple, Shuklateerth Limgaon



old Rameshwar Temple, Shuklateerth Limgaon

**Date 30/09/2020 – Devdahiphal,Kannapur,Mohakhed & Aai Tanda.**



Shri. Khandoba Temple Devdahiphal, Entrance Gate.



Shri. Khandoba Temple Devdahiphal.




Aai Jagdamba Devi Temple, Aai Tanda.



Aai Jagdamba Devi Temple, Aai Tanda.



Bhavani Devi Kannapur



Bhavani Devi Kannapur on Mount



Shri. Kanifnath Temple opp. Muslim Dargah, Mohakhed.



Shri. Kanifnath Mohakhed


**Date 01/10/2020 – Dharur & Chinchvan**



Dharur Fort, Dharur.



Internal Place, Dharur Fort, Dharur.




Makardhawaj , Chinchvan.



Makardhawaj Temple , Chinchvan.



Shri. Shiva & Vishnu Temple , Chinchvan



Shri. Shiva & Vishnu Temple , Chinchvan

## Date 02/10/2020 – Dhhnkeshwar & Harichandra Pimpri



**Dhhnkeshwar Shiv Temple, Dhunkawad.**



**Dhhnkeshwar Shiv Temple, Dhunkawad.**



**Raja Harichandra Temple,Harichandra Pimpri.**



**Raja Harichandra Temple,Harichandra Pimpri.**

**Date 03/10/2020 – Patrud.**



**Historical Stones, Ganpati Temple Patrud.**



**Historical Ganpati Temple Patrud**

Date 26/09/2020 – Keshavraj Temple , Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | ALZENDE AVINASH SHIVAJI | BATY |
| 02 | TAUR POOJA DHANANJAY | BATY |
| 03 | ANDIL DNYANESHWAR LIMBAJI | BATY |
| 04 | LANDGE PORNIMA SURESHRAO | BATY |
| 05 | PAYKE PRASHANT RAMESHRAO | BATY |
| 06 | CHAVAN MUKESH DOSH | BATY |
| 07 | JADHAV ANKITA KALYAN | BATY |
| 08 | DOLAS PRIYANKA SIDDHARTH | BASY |
| 09 | JADHAV VIJAY RAMA | BASY |
| 10 | SALVE VIJAY KISAN | BASY |

**Date 27/09/2020 – Shri.Purusottam Temple Purushottampuri, Shri. Sharduleshwar Temple Sadola & Shri. Gautamrushi Temple Sadola Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | FUPATE SOPAN LAXMAN | BASY |
| 02 | SHENDAGE KISHORI SHRIKRUSHNA | BASY |
| 03 | KADAM KRUSHNA SHIVAJI | BASY |
| 04 | LOKHANDE VISHNU DNYANOBA | BASY |
| 05 | KHETRI GANESH ANGAD | BASY |
| 06 | BIJOLE MANGESH DHONDIRAM | BASY |
| 07 | GORE ZUNGARAM PANDURANG | BASY |
| 08 | BADADE PALLAVI ARJUN | BASY |
| 09 | KHANDAGALE DAYANAND UTTAM | BASY |
| 10 | PAYKE PRASHANT RAMESHRAO | BATY |

**Date 28/09/2020 – Manjrath, Gangamasala Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | SAMALE KETAN RAOSAHEB | BAFY |
| 02 | GARAD MAULI PRABHAKAR | BAFY |
| 03 | NEHARKAR DNYANESHWAR RAMESH | BAFY |
| 04 | POTBHARE PRANITA RAJESH | BAFY |
| 05 | UGALE KAILAS BABASAHEB | BASY |
| 06 | WASHIMBE HARIRAM GANESH | BASY |
| 07 | JADHAV KIRAN SONAJI | BASY |
| 08 | BOBADE RAMESHWAR BALIRAM | BATY |
| 09 | ATHAVE BABLU BALU | BATY |

**Date 29/09/2020 – Mogra, Shuklatirth Limbgaon Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | MANE BHAGWAT RAMESH | BAFY |
| 02 | SHINDE VISHAL BALASAHEB | BAFY |
| 03 | ADGALE AKSHAY RAMDAS | BAFY |
| 04 | MORE VIKAS SANTOSH | BAFY |
| 05 | MORE SHUBHAM PRABHAKAR | BASY |
| 06 | HATAGALE TUKARAM SHRIPATI | BASY |
| 07 | GHADGE MOHINI PRAKASH | BASY |
| 08 | SHINDE HRUSHIKESH RAMESH | BASY |
| 09 | ATHAVE BABLU BALU | BATY |
| 10 | RATHOD SUNIL VINAYAK | BATY |
| 11 | CHOURE CHANDRABHAGA SHIVAJI | BATY |
| 12 | DAKHURE KOMAL KAILAS | BATY |

**Date 30/09/2020 – Devdahiphal,Kannapur,Mohakhed & Aai Tanda Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | ABUJ PALLAVI SURESHRAO | BAFY |
| 02 | GHADSE RUTIK SHIVAJI | BAFY |
| 03 | SATPUTE SUGAT SATYAPREM | BAFY |
| 04 | DOLAS PRIYANKA SIDDHARTH | BASY |
| 05 | JADHAV VIJAY RAMA | BASY |
| 06 | SALVE VIJAY KISAN | BASY |
| 07 | KHARDE SHRAVAN BALASAHEB | BASY |
| 08 | SAWANT KRUSHNA MADHUKAR | BATY |
| 09 | ALAT SATYAPREM KASHINATH | BATY |
| 10 | KANNAKE SHITAL PURUSHOTTAM | BATY |

**Date 01/10/2020 – Dharur & Chinchvan Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | SAMALE KETAN RAOSAHEB | BAFY |
| 02 | GARAD MAULI PRABHAKAR | BAFY |
| 03 | NEHARKAR DNYANESHWAR RAMESH | BAFY |
| 04 | BIJOLE MANGESH DHONDIRAM | BASY |
| 05 | GORE ZUNGARAM PANDURANG | BASY |
| 06 | SAWANT KRUSHNA BABASAHEB | BATY |
| 07 | KASPATE SOMESHWAR MAROTI | BATY |
| 08 | DHARPADE KRISHNA BALIRAM | BATY |
| 09 | NIWALE DIGAMBAR NAVNATH | BATY |
| 10 | JADHAV KAMESHWARI SHIVAJI | BATY |

**Date 02/10/2020 – Dhhnkeshwar & Harichandra Pimpri Temple** Survey Student Presenty

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | KATKE GEETA NARAYAN | BAFY |
| 02 | SAVANT SWAPNIL BALASAHEB | BAFY |
| 03 | MORE ANISHA ARUNRAO | BAFY |
| 04 | KHANDAGALE DAYANAND UTTAM | BASY |
| 05 | PAWAR AJAY AMBADAS | BASY |
| 06 | GAIKWAD ARUN SHIVAJI | BATY |
| 07 | SHENDGE ABHISHEK SADASHIV | BATY |
| 08 | DAIT DINESH ASHOK | BATY |
| 09 | GHADGE AVINASH BABURAO | BATY |
| 10 | SHINDE RADHA HANUMAN | BATY |


**Date 03/10/2020 – Patrud Ganpati Temple Survey Student Presenty**

| Sr. No. | Student Name | Class |
|---|---|---|
| 01 | MISAL SAURABH RAJEBHAU | BAFY |
| 02 | CHOURE PRATIKSHA GORAKH | BAFY |
| 03 | GAIKWAD NEHA LAXMANRAO | BAFY |
| 04 | MISAL SAURABH RAJEBHAU | BAFY |
| 05 | SHINDE ANIL SUDAM | BASY |
| 06 | PAUL ROHAN BHASKAR | BASY |
| 07 | SHAIKH NADIM HANIF | BASY |
| 08 | MANE MAHESH BABASAHEB | BATY |
| 09 | BHARATI SURESH SAKHARAM | BATY |
| 10 | JADHAV PRABUDDHA SUDHAKAR | BATY |

Head
Department of History
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

# • ऐतिहासिक पार्श्वभूमी •

## ता.माजलगाव, किल्ले धारूर आणि वडवणी



म.शि.प्र.मंडळाचे

**सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड**

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Brief studey report of temples in Majalgaon, Wadvani and Dharur taluka of Beed district
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes study report of all temples and collection of historical information of the temples in the above taluka villages.

# थोडक्यात

महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा आहे. परंतु पाहिजे तसा पर्यटन व धार्मिक क्षेत्राचा विकास झालेला नाही. त्या दृष्टीने म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष तथा माजलगावचे आमदार मा.प्रकाश सोळंके यांनी सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने माजलगाव, धारूर,वडवणी तालुक्यातील धार्मिक व पर्यटन स्थळाचा सर्व्हे करून रिपोर्ट तयार करण्याचे सुचित केले. प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सतत १ महिना इतिहास विभागाचे प्रा.बालाजी बोडके, प्रा. संजय बागुल, प्रा. सुदर्शन स्वामी यांनी धार्मिक व पर्यटन स्थळाला प्रत्यक्ष भेट, स्थानिक ग्रामस्थांच्या मुलाखती जाणुन घेवुन ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ चाळुन हा रिपोर्ट तयार करण्यात आला आहे.

मतदार संघातील धार्मिक व पर्यटन स्थळांचा विकास व्हावा त्यातून जनतेचे समाधान व शासनाला पर्यटनातून महसुल प्राप्त व्हावा या शुध्द हेतून हा सर्व्हेक्षन करण्यात आले आहे. या पर्यटन व धार्मिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा मिळाल्यास आर्थिक विकास व सांस्कृतिक विकास व्हावा या दृष्टीने धारूरचा किल्ला, कानिफनाथ मंदिर मोहखेड, लोणार देवी मंदिर कान्नापुर, खंडोबा मंदिर देवदहिफळ, जगदंबा मंदिर आई तांडा हे धारूर तालुक्यातील तसेच माजलगाव तालुक्यातील पुरूषोत्तम मंदिर पुरूषोत्तमपुरी, केशवराज मंदिर, केसापुरी, गौतमऋषी मंदिर,सादोळा, मार्जर तिर्थक्षेत्र (दक्षिण काशी) मंजरथ, मोरेश्वर गणपती मंदिर, गंगामसला, शुक्लेश्वर मंदिर शुक्लतिर्थ लिमगाव, नृसिंह मंदिर मोगरा, गणपती मंदिर पात्रुड तर वडवणी तालुक्यातील मकरध्वज मंदिर चिंचवण, राजा हरिश्चंद्र मंदिर हरिश्चंद्र पिंपरी, महादेव मंदिर धुनकवड इत्यादी मंदिरांचा प्रत्यक्ष भेट व मुलाखती घेवुन हा सर्व्हे तयार करण्यात आलेला आहे.

यासाठी....संदर्भ ग्रंथ म्हणुन सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील ग्रंथालय, पुरातत्व विभाग औरंगाबाद, प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार, एकनाथ मस्के, फोटो ग्राफर यांचे सहकार्य मिळाले.

मार्गदर्शक
मा.आमदार प्रकाशदादा सोळंके

**इतिहास विभाग**

प्रा.बालाजी बोडके ९६५७६७८२४४
प्रा.संजय बागुल ७३५०९८५४६६
प्रा.सुदर्शन स्वामी ८८५५००५०९९

प्राचार्य
डॉ.व्ही.पी.पवार

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of fort, temples and historical places in Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report of fort in Dharur/Kille-dharur. Moreover, it includes information about the other historical places and temples in Dharur.

## धारूरचा किल्ला

धारूर किल्ला, धारूर

धारूर हे स्थान बीड जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असुन, केज माजलगाव ह्या रस्त्यावर केज पासून सुमारे २२ किलोमीटर अंतररावर आहे. धारूर हे शहर सपाट भूमीवर वसलेले आहे. बाण नदिचे उगमस्थान असलेल्या या स्थानाच्या नावातच धारूरचे भौगोलिक वैशिष्टये सामावलेले आहे. धारूर किल्ला बालाघाट पठारालगत उभारण्यात आलेला आहे. हा किल्ला धारूर जुने फतेहबाद आहे. धारूर किल्ला धारूर गावाच्या पश्चिमेला असून सर्व्हे.नं. ३४३ मध्ये आहे. धारूर किल्ल्याचे एकूण क्षेत्र २९ एकर २० गुंठे आहे. म्हणजे ११ हेक्टर ३८ आर एवढ्या व्यापक क्षेत्रात किल्ला व सभोवतालचा परिसर आहे. हे गाव ' किल्ले धारूर' या नावाने प्रसिध्द असून एकेकाळी ही व्यापारी पेठ होती. या किल्ल्याची लांबी जवळपास ६०० मिटर असून रूंदी २०० मिटर ओ. सदरील किल्ला हा ३५ एकरावर वसलेला असून धारूर किल्ला पठाराच्या एका उतरणीस तिन्ही बाजूंनी खंदक असलेला व एका बाजने खोल दरीमुळे सुरक्षित झालेल्या स्थानावर उभारण्यात आला आहे. या किल्ल्यास नैसर्गिक सुरक्षा तर लाभलेलीच आहे, याशिवाय मजबुत अशी तटबंदी पण आहे. धारूरचा किल्ला हा एक व्यवस्थित नियोजनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. याचे वर्णन फकीर महम्मद झुबेरी यांनी बुसातीन-उस-सलातीन या ग्रंथात केले आहे.

प्रचलित अख्यायिकानुसार धारूर किल्ला मुळतः धारसिंह याने १००० वर्षापुर्वी बांधला अशी धारणा आहे. याबाबत पुरावा उपलब्ध नाही. सातवाहन तसेच सातवहानौत्तर काळात ही मोठी बाजारपेठ होती. जिनेव्हा येथील संदर्भ ग्रंथात हिरे मोत्याची बाजारपेठ म्हणुन धारूरचा उल्लेख आला आहे. किल्ल्याच्या बांधकामात अनेक स्थित्यंतरे येत गेली. परंतु धारूर हेच नाव शेवटी रूढ झाले. ' बुऱ्हाण-ए-मासिर' यातील उल्लेखानुसार किश्वरखान लारी यांने हा किल्ला बांधला आहे. इ.स. ८०६ मधील राष्ट्रकुट राजा गोविंद तृतीय यांच्या ताम्रपटात धारूरचा उल्लेख *Vishya* असा केला आहे. अंबाजोगाई येथील चौबारा गणपती मंदिरात जो शिलालेख आहे, यामध्ये खोलेश्वर या यादवांच्या सेनापतीने इ.स. ९ व्या शतकात धारूर देशात सकलेश्वर, विष्णू, आणि गणपती मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. यादव काळात धारूर स्थानाला विभागाचे केंद्र म्हणून महत्व प्राप्त झाले होते. यावरून १२ व्या शतकापर्यंत धारूर हे प्रांताचे मुख्यालय असल्याचे स्पष्ट होते. साहित्यात तसेच लेखात धारूरचा उल्लेख 'धारूऊर' असा येतो. इतिहासाच्या दृष्टीने धारूरचे नाव ८ व्या शतकात 'धारूऊर' या नावाने प्रसिध्द होते. 'तारीख-ए-मजकूर' यात धारूरचा उल्लेख 'फतेह-आबाद' असा आहे.

धारूर किल्ल्याचे बांधकाम हे उत्तर बहामनी कालखंडातील आहे. या विषयीचे उल्लेख 'वाकियाते विजापुर' आणि सय्यद अली लिखित 'बुऱ्हाण-ए-मासिर' या ग्रंथात तसेच मोगल-मराठा कालीन ऐतिहासिक कागदपत्रातून येतात. कदाचित मुळ राष्ट्रकुटकालीन धारूर या गावात बांधण्यात आलेल्या महादुर्गाच्या अवशेषावरून नंतर विजापुरच्या आदिलशहाने किश्वरखान या सेनानिकडून सन १५६९/७० या काळात या किल्ल्याची निर्मिती केली. लारी हा या काळात आदिलशाहीत अधिकारी *(Incharge)* होता.

नंतर हा किल्ला आदिलशहाकडून मुर्तुजा निजामशहाने जिंकुन घेतला. किल्ल्यातील मस्जिदीवरील प्रवेशावर असलेल्या लेखातील उल्लेखानुसार १५७० नंतर, १६२० पर्यंत हा किल्ला अहमदनगरच्या सत्तेच्या वर्चस्वाखाली होता. निजामशाही कालखंडात याची दुरूस्ती करण्यात आली पुढे मोगलांनी हा किल्ल तात्यात घेतल्यावर काही महत्वाच्या इमारती उदाः रंगमहाल व बागांची निर्मिती येथे झाली. धारूर गावात औरंगजेबकालिन काही वास्तु व यादवकालिन देवालय आहे.

पोर्तूगीज विजरइ कोंदि द लिव्र्ज्यरिस याने एक लाख महसुलाचा केज-धारूरचा कोटअशी नोंद आपल्या १० मे १६३४ च्या रोजनिशीत केली आहे. नोव्हेंबर १६३४ मध्ये फतेह-आबाद (धारूर) याचा समावेश बालाघाट सुभ्यात करण्यात आला. बादशाहनाम्यात धारूरचा उल्लेख फतेह-आबाद असा केला आहे. परंतु ' फतेह-आबाद उर्फ धारूज' असा उल्लेख बादशाहनाम्यातच पुढे एके ठिकाणी आलेला आहे. धारूरला फतेह-आबाद हे नाम मोगलांनी धारूरचा किल्ला घेतला तेव्हा दिलेले असावे. छत्रपती शिवाजी महाराजांचा सरनौबत नेताजी पालकर यांचे धारूर या किल्ल्यावरच धर्मांतर करण्यात आले होते.

निजाम राजवटीत म्हणजेच तत्कालीन हैद्राबाद संस्थानात धारूर हे एक सुभ्याचे ठिकाण होते. निजाम-उल-मुल्क याने हैद्राबाद संस्थानाची निर्मिती केल्यानंतर या भागाचा समावेश हैद्राबाद संस्थानपात केला. भारतीय संघराज्याने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली इ.स. १९४८ मध्ये कारवाई करून हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात समाविष्ट करून घेतले. भारत सरकारने कारवाई करेपर्यंत धारूर हैद्राबाद संस्थानाचा भाग होता. रझाकार कासीम रझवी यास याच किल्ल्यात ठार करण्यात आले होते असे सांगतात.

किल्ला :-

धारूर गावाजवळच पश्चिमेकडील डोंगर रांगामध्ये ह्या भुईकोट किल्ल्याची रचना निसर्गरम्य अशा ठिकाणी आहे. पालघाट टेकड्याच्या काठांवर वरच्या पठारातील भागात किल्ला बांधला आहे. किल्ल्याच्या सभोवताल असलेला समांतर पठार पासन खंदरक तयार करण्यात आलेला खोल खंदक म्हणजे 'दिंडी' हे या किल्ल्याचे वैशिष्टये आहे. या किल्ल्याच्या तिन्ही बाजुला खोल दऱ्या असून त्या बाजूंनी वर किल्ल्यात चढणे दुरापास्त होते. अशा रितीने या किल्ल्याला तिन्ही बाजुंनी नैसर्गिक संरक्षण मिळत होते असे असले तरीही ह्या तिन्ही बाजूंना परकोटाची भक्कम अशा प्रकारची संरक्षक तटभिंत बांधलेली आहे. किल्ल्यांने एकूण ३० ते ४० एकर परिसर व्यापलेला आहे. हा किल्ला ज्या स्थानी बांधला आहे. त्याच्या सभोवताली तेवढ्याच उंचीचे पठार आहे. त्या शत्रुच्या तोफेच्या माऱ्यात सर्वच बाजुंनी किल्ल्याचा तोंड द्यावे लागत असे. दक्षिणेच्या भिंतीचा काही भाग, मध्यभाग तसेच पश्चिमोत्तर कोपऱ्यावरील काही भाग या तोफांच्या माऱ्याने उद्ध्वस्त झालेला आहे. निरीक्षणांती असे आढळून आले की, दरी मधून किल्ल्यावर प्रवेश करण्याकरिता थोडीफार चढण्याची शक्यता

ज्या भागात होती त्याच भागावर सतत तोफांचा मारा करून तेवढाच किल्ल्याचा भाग उद्ध्वस्त करण्यात आला आहे.



धारूर किल्ल्यातील तटबंदीची दोन तीन ठिकाणी पडझड झाली असून किल्ल्यातील इमारतींचीही पडझड झालेली आहे. संपुर्ण किल्ल्याच्या आतील व बाहेरील परकोटाला एकंदर ३० बुरूज असून दुसऱ्या संरक्षक भिंतीला ७ बुरूज आहेत. 'वाकियाते-मामलेकर-ए-बिजापुर' या पुस्तकात या किल्ल्याला एकंदर २२ बुरूज आहेत असे म्हटले आहे. ते बरोबर नाही. देखील त्यात आली आहेत. दक्षिण पुर्व कोपऱ्यातील बाहेरील संरक्षक भिंतीच्या एका भव्य बुरूजाला पर्शियन व देवनागरी लिपीतील शिलाखेत आहे. या लेखावरून हा किल्ला १५/१६ शतकातील असावा असे दिसते.


किल्ल्याचे प्रवेशद्वारे पूर्वाभिमूख आहे. त्या द्वाराच्या पुढे दोन मोठे बुरूज आहेत व द्वाराने किल्ल्यात प्रवेश करण्याकरिता एक चिंचोळा मार्ग आहे. किल्ल्याच्या जवळ आल्यावर देखील शत्रूला मात्र प्रवेशद्वार दिसत नाही. समोरील बुरूजांनी ते द्वार झाकल्या गेले आहे. तसेच प्रवेशद्वाराने मोठ्या प्रमाणात प्रवेश करावयाचा झाल्यास समोरील दोन भव्य बुरूज जमीन दोस्त केल्याशिवाय शत्रूला आत प्रवेश करणे कठीण आहे. प्रवेश केल्यानंतर डावीकडे वळल्यावर किल्ल्याच्या दुसऱ्या संरक्षक भिंतीत उत्तराभिमूख दरवाजा किल्ल्यात सरळ प्रवेश करण्याकरिता बांधला आहे. किल्ल्याच्या समोरील बाजूला किल्ल्याच्या दक्षिणेत्तर कोपऱ्यापर्यंत व त्याच्याही पुढे दोन्ही बाजूने पश्चिमेकडे जवळ जवळ २०० ते ३०० यार्ड अंतरापर्यंत आतील व बाहेरील अशी दोन संरक्षक भिंती आहेत ह्याच भिंतीत आतील व बाहेरील प्रवेशद्वारे व बुरूज आहेत. किल्ल्याच्या दक्षिणोत्तर दोन्ही बाजूला थोडे पश्चिमेकडे गेल्यावर वर्णन केलेली दरी लागते. त्यामुळे ती दरीच पुढे किल्ल्याच्या पिछाडीचे संरक्षण करते.


समोरील भागात पहिल्या संरक्षक परकोटाच्या पुढे खंदक आहे. हा खंदक खोदलेला नसून ह्या भिंतीच्या बाजूस काही अंतरावर तितक्याच लांबीची भिंत बांधून तयार केलेली आह. खंदकाची भित देखील दरीच्या तोंडापर्यंत उत्तर दक्षिण बाजूने नेऊन तेथे दोन्ही बाजूने बंद केली आहे. किल्ल्याच्या दोन्ही भिंतीमध्ये असणाऱ्या जागेत दक्षिनेस व उत्तरेस पाण्याचे मोठे साठे आहेत. संकटकाळी हयातील पाणी खंदकात सोडीत असावेत कारण त्याच्यापुढे असणाऱ्या खंदकात पाणी जाण्याकरीता ह्या साठ्यांच्या भिंतीना मोठमोठी दारे आहेत.

संपुर्ण किल्ल्याच्या आतील व बाहेरील परकोटाला एकंदर तीस बुरूज असून दुसऱ्या संरक्षक भिंतीला सात बुरूज आहेत. बाक्यात ए मम्केत विजापूर ह्या पुस्तकात ह्या किल्ल्याला एकंदर २१ बुरूज आहेत असे म्हटले आहेच ते बरोबर नाही. कदाचित ह्याने उध्दवस्त बुरूज मोजले नसतील. काही बुरूजांची नावे देखील त्यात आली आहेत. दक्षिण पूर्व कोपऱ्यातील बाहेरील संरक्षित भिंतीच्या एका भव्य बुरजाला पर्शियन व देवनागरी लिपीतील शिलालेख आहे पगर ऊंच असल्यामुळे तो वाचता आला नाही. देवनागरी अक्षरे उठावदार आहेत. यावरून या शिलालोखाचा काल साधारणः १५-१६ व्या शतकातील असावा असे दिसते.

## किल्ल्यातील वास्तु :-









किल्ल्यात प्रवेश केल्यावर उजवीकडे इमारतीचे अवशेष दिसतात. ती टाकसाळ होती असे तेथील लोक सांगतात. त्याच इमारतीच्या पुढे सुमारे १०० यार्डावर एक जामा मस्जिद आहे त्या मस्जिदीच्या भोवती एक भिंत आहे. त्या भिंतीला दक्षिणेकडे प्रवेश द्वारे असून त्यावर पर्शियन लिपीतील लेख कोरलेला आहे. त्याला टाकून पुढे गेले असता एका उंच चबुतऱ्यावर एका विराची समाधी आहे. व जवळच एक फार मोठे पिंपळाचे झाड आहे त्याच्या मागच्या बाजूला सुमारे दहा एक फुटावर एक दगडी प्रवेशद्वार सुस्थितीत आहे. ते प्रवशेद्वार बारूदखान्याचे आहे हा बारूदखाना चारी बाजूने भिंत बांधुन बंद केलेला आहे. त्या भिंती मात्र आता काही ठिकाणी पडलेल्या आहेत.

आतील भागात प्रवेशद्वाराजवळ एक त्यापुढे सुमारे दहा फुटांवर एक अशा दोन इमारती आहेत. बारूदखान्याच्यापुढे काही अंतरावर दोन हौद असून दुसऱ्या हौदाच्यापुढे उंचावर आणखी एक मस्जिद आहे. त्या मस्जिदीच्या दक्षिणेला सुमारे १०० फुटावर एक पुर्वीचा हौद असून त्याचेसमोर एक लहान हौद आहे. त्या लहान हौदाजवळच दक्षिणेला एक इमारत आहे. त्यास रंगमहाल म्हणतात त्या इमारतीच्या पश्चिमेकडे सुमारे पाच सात फुटावर कमानी असलेली व अर्धवट उघडी अशी वास्तु आहे. लहान हौदाच्या पुढे एक टाके असन त्यात तेल भरलेले असे. किल्ल्याच्या आतील बाजुला असलेल्या दुसऱ्या भिंतीत आतील बाजुने काही कोठड्या असाव्यात. त्या आता संपुर्ण उध्दवस्त झालेल्या आहेत. कदाचित त्या कोठड्या घोडपागा असाव्यात.

## धारूर परिसरातील अन्य ऐतिहासिक वास्तू :

धारूर नगराच्या परिसरामध्ये किल्ल्यासरख्या महत्वपूर्ण ऐतिहासिक वास्तुबरोबरच इतरही काही ऐतिहासिक वास्तूंचा समावेश आहे. बहुतांश ऐतिहासिक नगरांना चोहोबाजुनी तटबंदी आणि मोठ-माठ्या दगडी बांधकामाच्या वेशी असतात. परंतु धारूर नगराला मजबुत तटबंदीचा अभाव असलेला दिसुन येतो, असे जरी असले तरी येथे काही मोठ-मोठ्या वेशी आजतागयत आपले अस्तित्व टिकवू आहेत. डोंगर मार्गाकडील अतार दिलशा असणारी वेस व कसबा वस्तीतील वेस आहे.

धारूरमध्ये व परीसरामध्ये अनेक मंदिरे, मस्जिदी व मठ आहेत. या नगराच्या परिसरातील सीतची न्हाणी व गोल घुमट आणि ईदगाह आजतागयत येथील ऐतिहासिक पाऊलखुणा टिकवून आहेत. या सर्व वास्तुंची ठोस कालनिश्चिती समोर येत नसली तरी स्थापत्य रचनेवरून त्या आपणास त्यांच्या ऐतिहासिक कालखंडाबाबत माहिती सांगता येते. या ऐतिहासिक वास्तुमध्यू धारेश्वर मंदिर, सीतेची नहाणी, धारूरमधील मठ, धारूर मधील सुफी संतांचे दर्गे, अंबाचंडी मंदिर, बालाजी मंदिर, कसब्यातील पंचमुखी गणपती इत्यादींचा समावेश होतो.

१. **धारेश्वर मंदिर** - धारूरच्या कसबा विभागामध्ये दक्षिणोत्तर असणाऱ्या मुख्य रस्त्यावर धारेश्वराचे प्राचीन शिवमंदिर आहे. हे धारेश्वर मंदिर राष्ट्रकुट काळातील असल्याचे येथील स्थापत्यावरून दिसुन येते. राष्ट्रकुट शासक हे शिवभक्त होते, तर काही शासक जैन धर्माचे पुरस्कर्ते होते. २४ स्तंभांच्या आधारावर या मंदिराचे सभामंडप उभे असून त्यावर जवळपास एक हजार तीर्थकरांची शिल्पे आहेत. या मंदिरामध्ये शिवलिंगाची प्रतिष्ठापना राष्ट्रकुट शासक ध्रुवधारावर्ष याने केली असावी, म्हणुनच या शिवालयाला धारेश्वर मंदिर ह नाव मिळालेले दिसते. राष्ट्रकुट शासकाच्या व धारेश्वर मंदिराच्या नावावरूनच या नगराला धारूर हे नाव मिळालेले देखील आहे.

२.  **सीतेची नहाणी** - धारूर नगराच्या परिसरामध्ये असणाऱ्या या कुंडास स्थानिक लोक सीतेची नहाणी असल्याची आख्यायीका सांगतात. सीतेच्या नहाणीजवळ एका कोरीव खडकातून गरम पाण्याचा अखंड झरा वाहात आहे. तेथील कुंडात येणारे पाणी प्रत्येक ऋतूमध्ये चोवीस तास गरम असते. आणि शेजारील कुंडात येणारे पाणी थंडगार असते.

३.  **धारूरमधील मठ** - मध्ययुगीन काळामध्ये धारूर नगरीत नाथ संप्रदायाचा सुध्दा प्रभाव असल्याची माहिती पुढे येते. नाथ संप्रदायाचे प्रवर्तक विशिष्ट ठिकाणी मठ स्थापन करून ते वास्तव्य करीत असत. नाथ संप्रदायाशी संबंधित दोन मठ स्थापन करून ते वास्तव्य करीत असत. नाथ संप्रदायाशी संबंधित दोन मठ धारूर नगरीमध्ये आहेत.





४.  **धारूरमधील सुफी संताचे दर्गे** - धारूर नगरामध्ये व परिसरामध्ये सुफी संतांच्या विचारांचा प्रभाव बऱ्याच काळापासून होता, सुफी संतांचे बरेच दर्गे धारूर नगरमध्ये व परिसरामध्ये पाहावयास मिळतात. त्यातील धारूरच्या किल्ल्यातील हजरत इनाम कादरी हुसैन नक्शबंदी यांचा दर्गा व डोंगरवेशीजवळचा अन्वरशहा कादरी यांचा दर्गा सर्वश्रुत आहेत. हजरत इनाम कादरी हुसैन नक्शबंदी व अन्वरशहा कादरी या सुफी संप्रदायातील संतांनी योगसाधनेद्वारे अद्‌भूत सिध्दी प्राप्त केली होती.





५.  **अंबाचंडी देवीचे मंदिर** - अंबाचंडी या जागृती देवीचे ठिकाण धारूरपासून साधारणतः तीन किलोमीटर अंतरावर धारूरच्या पश्चिमेकडील डोंगररांगामध्ये असणाऱ्या एका नदीकाठी आहे. हे सप्तश्रृंगी देवीचे पीठ असून या देवीचे मुळस्थान नासिक जिल्ह्यातील वणी गावाजवळच्या उंच डोंगरावर आहे.



**वैशिष्टे** :-

१) राष्ट्रकुट काळातील धारुरचा किल्ला हा भुईकोट व गडकोट या दोन्ही प्रकारात आहे.

२) आदिलशाही सरदार किश्वरखान यान या किल्याचे पुर्नर उभारणी केली.

३) मध्ययुगीन काळातील राजकीय सत्तेचे केंद्रबिंदु धारुर होते.

४) धारुरचा किल्ला हा विठोजीराजे भोसले , शहाजीराजे भोसले व प्रतिशिवाजी समजले जाणारे नेताजी पालकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे.

५) धारुरच्या किल्यावर टाकसाळ होती.

६) प्राचीन व मध्ययुगीन काळात अर्थिकदृष्टया संपन्न असलेली धारुर ही बाजारपेठ होती.

७) धारुरच्या किल्यातील जलव्यवस्थापन अतिशय सुनियोजीत आहे.

**उपाय योजना** :-

१) ऐतिहासिक राजकीय व सांस्कृतिक घडामोडीचा धारुरचा किल्ला साक्षीदार असल्याने जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.

२) पुरात्त्वखात्याच्या दुर्लक्षामुळे किल्याची पडझड झाली आहे तरी वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

३) स्थानिक इतिहासाचा वारसा विद्यार्थी व नागरिकांना माहित होण्यासाठी पर्यटनाचा दर्जा देणे गरजेचे आहे.

४) किल्यातील जलव्यवस्थापनेच्या अभ्यास करुन त्याचा सद्यस्थितीत उपयोग करुण घेणे.

५) पर्यटनाला चालना देऊन पर्यटकांना सुविधा उपलब्ध करणे.

६) किल्ला परिसराचा विकास करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

**संदर्भ** :-

१) पाठक अरुणचंद्र व काळे भगवान, किल्ले धारुर संकेत प्रकाशन जालना २००४.

२) कुंटे भ.ग., दिल्लीच्या शहाजहॉचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई १९८६.

३) मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन,पुणे १९९३.

४) अन्सारी शफी मंहम्मद , बीड जिल्हयाचा इतिहास, नाथापुरी प्रकाशन, मुंबई

५) साळुंखे सतीश, बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड २०११.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Lonar Devi temple situated in Kannapur village of Dharur taluka.

## लोणार देवी तीर्थक्षेत्र (आईचा माळ कान्नापूर)




धारुर तालुक्यातील कान्नापूर गावापासून बालाघाट डोंगरावती लोणार देवीचे मंदिर आहे. गावापासून ४ किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. उंच टेकडीवर हे मंदिर असल्यामुळे आईचा माळ या नावाने सुंध्दा या तीर्थक्षेत्राला संबोधले जाते. नैसगिक सौदंर्याने नटलेले हे तीर्थक्षेत्र मुंगी, कान्नापूर, देवठाणा व आम्ला या चार गावच्या सिमेवर रमणीय ठिकाणी आहे. मंदिराचे बांधकाम दगडी असून १०० ते १५० वर्षापूवीचे असावे असा गावक-यांचा समज आहे. देवीचे मूळस्थान बुलढाणा जिल्यातील लोणार हे असुन तेथें देवीचे नाव कमळजा असे आहे असे गावकरी सांगतात. लोणार येथून देवी कान्नापूर येथे आली व येथे देवीची विधीवत पूजा केली जावू लागली परंतु येथे तिला रहाणे सोईचे वाटले नाही म्हणून गावच्या आमराईत आली. काही काळ आमराईत राहिल्यावर तेथील अस्वच्छतेमुळे देवी डोंगरावर आली. तेव्हापासून आजपयंत जवळपास दोनशे वर्षापासून ती डोंगरावर आसनस्थ आहे.

मंदिराचे बांधकाम दगडाचे असून ते २०० वर्षापूवी झालेले असावे असे वाटते. गर्भगृहात देवीची मुती ओट्यावर असून गाभा-याच्या वरील बांधकाम विटात केलेले आहे. मंदिरांच्या पुढे दीपमाळ आहे. या देवीची यात्रा कोजागिरी पौणिमेला भरते. भाविक मोठया प्रमाणावर यात्रेस येतात. विविध जाती - धर्माचे लोक या यात्रेत सहभागी होतात. आमवस्या व पौणिमेला मंदिराच्या परिसरात लख्ख प्रकाश पडतो असे गावकरी सांगतात.

हे मंदीर २०० वर्षापूवीचे जुने असून डोंगर परीसरात असल्यामुळे मंदिर विकासाला भरपूर वाव आहे. सामाजिक सांस्कृतिक वारसा म्हणून या तिर्थक्षेत्राचा विकास करणे या तिर्थक्षेत्राला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवणे गरजेचे आहे. त्यामुळे देवीचा परिसर व कान्नापूर गावचा विकास झाल्यास तीर्थक्षेत्रास भेट देणा-या भाविकांसाठी ती पर्वणी ठरेल.



**श्री लोणार देवी मंदिर कान्नापूर**

**मंदिराची वैशिष्टे :-**

१) उंच डोंगरावर हे लोणार देवीचे तीर्थक्षेत्र आहे.

२) देवीचे मूळस्थान लोणार जि. बुलढाणा हे आहे.

३) कोजागिरी पौणिमेस या देवीची यात्रा भरते.

४) या देवीचे मंदिर चार गावाच्या सिमेवर आहे.

५) नैसगिक सौंदर्याने नटलेल्या परिसरात देवीचे मंदिर आहे.

**उपाय योजना :-**

१) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करणे.

२) यात्रेस येणा-या भाविकांना सुविधा पुरवणे.

३) पर्यटन स्थळ म्हणून या तीर्थक्षेत्राचा विकास करणे.

४) तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवणे.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Kanifnath temple situated in Mohkhed village of Dharur taluka.

## कानिफनाथ तीर्थक्षेत्र मोहखेड

धारुर तालुक्यातील मोहखेड येथे कानिफनाथाचे पुरातन मंदिर आहे. बालाघाटाच्या डोंगर रांगेत एका डोंगर व टेकडीवर हे मंदिर असून नैसगिक सौदंर्याने नटलेले आहे. निजाम काळात हे मंदिर बांधले गेले असावे. येथे कानिफनाथ व बारमदान पीर असे दोन मंदीरे एकाच शैलीत बांधली गेलेली आहेत. या मंदिरांना निजाम काळात गट नंबर १ मध्ये ४० एक्कर जमीन मंदिराच्या देखरेखीसाठी दान दिल्याची माहिती मिळते. ही दोन्ही मंदिरे हिंदु - मुस्लीम ऐक्याची प्रतिकं मानली जातात. कारण एकाच ठिकाणी एकाच उंचवटयावर पीर व कानिफनाथाचे मंदिर आहे. या मंदिराला एकुण १११ दगडी बांधकाम केलेल्या पाय-या आहेत. मंदिराला चोहूबाजूने तटबंदी होती असे सांगतात; परंतु आता ती नष्ट होत चाललेली आहे.


आषाढ महिन्याच्या गुरुवारी येथे मोठी यात्रा भरते. हिंदु मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक येथे पूजा करतात मंदिराचे प्रवेशव्दार पूर्वेकडे असून कानिफनाथ व पीर यांच्यात फक्त १० फुटाचे अंतर आहे.


मोहखेड गावचे सोळंके हे मूळ सातारा खटाव येथील रहिवाशी आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे व्दितीय पुत्र राजाराम महाराज भोसले यांच्या पत्नी महाराणी ताराबाई यांनी सोळंके यांना आपआपली वतने तयार करण्यास सांगितले तेव्हा सोळंके खटाव जि. सातारा येथून मोहखेड येथे आले. महाराणी ताराबाई यांनी हे गाव सोळंके यांना वतन म्हणून दिले. साधारणत हा कालखंड १७०० ते १७०८ असा आहे. या वरुन हे मंदिर ३०० ते ३२५ वर्षापूर्वीचे किंवा निजाम कालखंडातील म्हटले तर २०० ते २५० वर्षापूर्वीचे असावे असा अंदाज आहे.



**श्री कानिफनाथ मंदिर मोहखेड**







या मंदिराच्या बांधकाम शैलीवरुन हे मंदिर ३५० वर्षापूर्वीचे असावे. मुख्य मंदिराच्या गर्भगृहात एक उंचवटा असून त्यावर व कानिफनाथाची मुर्ती बसवलेली आहे. आधी येथे कानिफनाथांच्या पादुका होत्या असे भाविक सांगतात. कानिफनाथाच्या मंदिरावर कळसाभोवती चार कोप-यावर चार घुमुट आहेत. दूरुन पाहिल्यावर हे मंदिर नसून मस्जिद वाटते. कदाचीत या भागात निजामाची सत्ता आसल्या कारणाने निजाम काळात मंदिराचा विधवंश होऊ नये म्हणून हिंदु मंदिरावर इस्लामिक स्थापत्य शैलीचा प्रभाव दिसतो. गर्भगृहाचे बांधकाम दगडात तर कळस विटाने बांधलेला आहे. गर्भगृहाबाहेर १० फुटावर दगडी स्तंभयुक्त बांधकाम असून त्यात बारमदान यांचा पीर आहे.

मोहखेड कानिफनाथ व पीर हे तीर्थक्षेत्र परळी बीड महामार्गापासून साधारण १५ किलोमीटर अंतरावर आहे, तर माजलगाव अंबाजोगाई या मार्गावर गावातील बसस्थानकापासून एक किलोमीटर अंतरावर आहे. मंदिराच्या पूर्व - पश्चिमेस बाळाघाटाच्या डोंगररांगा तर उत्तरेला गाव व पूर्वेस खोल व दरी आहे. मंदिराच्या दक्षीण बाजूस यात्रेसाठी, भक्ताची गदी होऊ नये म्हणून डोंगर सपाट करुन मंडपासाठी जागा केली आहे. लोकवर्गणीतुन मंदिरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. परंतु हे तुटपुंज्या स्वरुपाचे काम वगळता एक धामिक व पर्यटनाचे स्थळ म्हणून तीर्थक्षेत्राच्या विकासाला भरपूर वाव आहे.

**मंदिराचे वैशिष्टे :-**

१) हे मंदिर हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

२) बाळाघाटच्या कडेवर डोंगररांगेवर कानिफनाथाची टेकडी आहे.

३) हे तीर्थक्षेत्र नैसगिक सौंदर्याने नटलेले आहे.

४) आषाढ महिन्याच्या गुरुवारी यात्रेकरु मोठया संख्येने येतात.

**उपाय योजना :-**

१) मंदिर बांधकाम व सुशोभिकरण याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

२) सामाजिक व सांस्कृतिक वारसा जतन करणे गरजेचे आहे.

३) पर्यटन स्थळ म्हणून मंदिर क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे.

४) यात्रेत येणा-या भाविकांना सुविधा पुरवणे गरजेचे आहे.

५) या स्थाळाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवून देणे गरजेचे आहे.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of [illegible]gdamba Devi temple situated in Aai Tanda village of Dharur taluka.

# जंगदंबा देवी मंदिर तीर्थक्षेत्र आई तांडा

धारुर तालुक्यातील आई तांडा येथे जंगदंबा देवीचे मंदिर आहे. धारुर पासून आठ किलामीटर अंतरावर बालाघाटाच्या माळरानावर रमणीय ठिकाणी हे तीर्थक्षेत्र आहे. या तीर्थक्षेत्रास यात्रेसाठी महाराष्ट् , कर्नाटक , आंध्रप्रदेश येथून लाखोच्या संख्येने भाविक येतात. आषाढ व नवरात्रात देवीची मोठया प्रमाणात यात्रा भरते. मुळात हे बंजारा समाजाचे तीर्थक्षेत्र असले तरी सर्व जातीधर्मांचे श्रध्दास्थान म्हणुन या तीर्थक्षेत्राला ओळखले जाते. सर्व जातीधर्माचे लोक मोठया भक्तीभावाने नवस फेडण्यासाठी येतात. या देवस्थानाला आईचा तांडा म्हणून ओळखले जाते.

बंजारा समाज अशिक्षीत असल्यामुळे या तीर्थक्षेत्राची माहिती कागदोपत्री उपलब्ध नाही. ऐवजी मौखिक साधणे. अख्यायिकेव्दारे ती आपणास मिळते. मौखिक साधणे व पुजा-यांची वंशावळ पहाता हे तीर्थक्षेत्र २०० ते ३०० वर्षापूर्वीचे आहे असे म्हटले जाते. बंजारा समाज मिठाचा व्यापार करत येथे पोहचला येथील मूळ पुरुष मिठाचे व्यापारी जगना नाईक यांना देवीचे दर्शन कसे झाले व मंदिर स्थापना कशी झाली यांची माहिती जगणा नाईकाचे नातू / पंतू आताचे वंशंज नामदेव दगडू आडे यांनी विस्तृत माहिती सागितली. त्याआधारे आपणास तीर्थक्षेत्राचा कालावधी समाजण्यास मदत होते.

मिठाचा व्यापार करण्यासाठी बंजारा लोक येथे आले असता त्यांचा येथे मुक्काम पडला. पूर्वी व्यापार बैलगाडीचा असायचा. जेवण करुन जगनानाईक झोपल्यावर आई जंगदंबा त्यांच्या स्वप्नात आली. आणि जगना नाईक यांना म्हणाली मी बैलाच्या खुरात येथे आली आहे. ओल्या वस्त्राने मला पहा. सकाळी उठून जगना नाईक बैलाच्या गव्हाणीत ओल्या वस्त्रानीशी गेले असता त्यांना जंगदंबेची छोटीशी मूर्ती दिसली. ती मूर्ती घेऊन आपल्या तळावर आले. दुस-या दिवशी पुन्हा देवी जगना नाईक यांच्या स्वप्नात जाऊन म्हणाली तू इथेच रहा. माझी येथे स्थापना कर. तेव्हा जगना नाईक देवीला म्हणाले, एवढया भयंकर जंगलात मी एकटाच कसा राहू तेव्हा देवी त्यांना म्हणाली, तू माझी येथे स्थापना कर येथे मानसांची मुंग्यासारखी रांग लागेल. ती गोष्ट सत्य ठरली असून दरवर्षी आषाढ व नवरात्रात ५ ते ६ लाख भाविक येथे मोठया श्रध्देने येतात. पुढे जगना नाईक यांना देवी प्रसन्न झाली. मानसांच्या अडीअडचणी त्यांना कळू लागल्या. लोकांचे दु:ख निवारण्याचे काम ते करु लागले. या मंदिराचा एक दगड पोहारा देवी येथे नेऊन पोहरादेवी मंदिराची स्थापना करण्यात आली. म्हणजे पोहरादेवीचे मूळ हे धारुर तालुक्यातील आई तांडा जंगदबेचे मंदिर आहे हे सिध्द होते. पोहरादेवी मंदिर उभारणीवरुन या देवीच्या मंदीर उभारणीचा कालखंड आपल्या लक्षात घेता येतो. तेव्हा पासून नवसाला पावणारी देवी म्हणून तीर्थक्षेत्र ओळखले जाऊ लागले. लाखोच्या संख्येने भाविक नवस पूर्ण करण्यासाठी बकरे घेऊन यात्रेस येतात.

निजाम राजवटीत या तीर्थक्षेत्राचे पुजारी आंबु हेमा आडे हे होते. यात्रेनिमित्त बंदोबस्तासाठी अंबाजोगाई चौकीचे फौजदार या ठिकाणी आले होते. त्याच्या मित्राचा कातडे रंगवण्याचा व्यवसाय होता. त्याला चांबडे रंगवण्यासाठी रक्ताची गरज होती. म्हणून फौजदार पुजारी आंबु हेमा आडे यांच्याकडे देवीला कापल्या जाणा-या बक-याची रक्ताची मागणी केली. आंबु आडे यांनी या मागणीला नकार दिला. परंतु फौजदार यांच्या विनंती वरुन ते रक्त देण्यास तयार झाले. दोन बकरे कापण्यासाठी घेतले व रक्त धरण्यासाठी हांडे मागवण्यात आले. परंतु बकरे कापल्यानंतर त्यातून रक्त येण्याऐवजी काळे पाणी येऊ लागले. तेव्हा फौजदार म्हणाले, की, क्या तुम्हारी देवी रक्त के जगह काला पाणी असे म्हणाल्या बरोबर

त्याला रक्ताच्या उलटया व जुलाब सुरु झाले. त्यांना त्यांची चूक लक्षात आल्यावर ते पुजारी अंबु नाईक यांना म्हणाले माझे चुकले मला माफ करा. तेव्हा आंबुनायकांने देवीला शरण येण्याचा व पाच बक-याची दावण देण्याचा शब्द दिला. फौजदार कबूल झाला व देवीला वश झाला. अशा मौखिक माहितीव्दारे जागृत देवस्थान आसल्याचे सागितले जाते.

एकदा गावात चोरी झाली चोरी केली दुस-यांने व आळ व देवीचे पुजारी दामा नाईक यांच्यावर घेण्यात आला पोलीसानी दामा नायकाला अंबाजोगाई पोलीस स्टेशनला कैदेत टाकले. परंतु त्या कारागृहाचे दरवाजे आपोआप उघडू लागले. त्यामुळे फौजदाराने दामा नाईक यांना साखळदंडाणे बांधून कोठडीत टाकले व आता कसे दरवाजे उघडतो ते बघण्यासाठी खुर्ची टाकून समोर बसला. तर काय दामा नायकाच्या अंगात देवीचे वारे आले व साखळदंड गळून पडले. तेवढयात फौजदाराच्या घरुन फोन आला मुलाला ताप भरला असून उलटया जुलाब होऊ लागले तेव्हा लवकर घरी या. फौजदार घरी जाऊन पहातात तर मुले बायको तापाणे फनफनत होती. त्यात त्यांचा एक मुलगा दगवला. ते धावत पोलीस स्टेशनमध्ये आले. दामा नायकाच्या पायावर डोके ठेवून माफी मागितली. मी तुमची सोडण्याची व्यवस्था करतो, माझे कुंटुंब वाचवा. तेव्हा दामा नायकाने त्यांना आशीर्वाद देऊन पाच बक-यांची दावण देवीला कबूल करण्याचा शब्द दिला फौजदाराणे पाच बक-याची दावण कबूल केली. त्यामुळे कुटुंब सुरक्षीत राहिले. या कारणामुळे सुध्दा तीर्थक्षेत्राच्या आजुबाजुच्या गावात कोणही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करतांना खोटे बोलत नाही. सध्याचे पुजारी नामदेव दगडू आडे सांगतात की मला कळते तेव्हा पासून म्हणजे माझे वय आता ५० ते ५५ वर्षे आहे तेव्हापासून हैदाबाद वरुन दरवर्षी मुस्लिम कुंटूंब यात्रेसाठी बकरे घेऊन येतात. त्यांना विचारले की, मुस्लिमधर्मात मूर्तीपूजा नाही मग तुम्ही देवीच्या यात्रेला बकरे घेऊन कसे. तेव्हा ते मुस्लिम कुंटूंब म्हणाले, हैदाबाद मुक्तीसंग्रामाच्या वेळी रझाकारांनी आमचे घरदार उध्दवस्त केले. आम्ही सैरभैर झालो. आम्हाला कोठे जावे कळेना. माझ्या वडीलांनी या देवीला हात जोडले. आमचे रक्षण कर. आणि आम्ही जंगलात शिरलो. रझाकाराच्या टोळया जंगलात शिरल्या. आमच्या जवळ येत. जवळून जात पण आम्ही त्यांना दिसलो नाही. वडील म्हणाले, आई जंगदंबेची कृपा आहे. आम्ही सुरक्षीत हैदाबादला पोहचलो. आमचे कल्याण झाले. तेव्हा पासून आजपर्यंत आमच्या कित्येक पिढया आम्ही यावेळी येतो. अशा आनेक गोष्टीमुळे देवीचे तीर्थक्षेत्र अंखड महाराष्ट्रासह आंध्र , कर्नाटक राज्यापर्यंत परिचीत असून लाखो भाविक या वेळी येतात. अगदी मुंग्यासारखी मानसांची रीघ लागते.







## श्री जगदंबा देवी मंदिर आई तांडा

देवीवर भाविकांची मोठी श्रध्दा असून मुस्लिमसह सर्व जातीधर्माचे लोक येथे यात्रेला येतात. दोन तांडे, एक गाव, एकवाडी असे मिळून ग्रुप ग्रामपंचायत असून मतदार संख्या १४५० व लोकसंख्या ३००० च्या जवळपास आहे. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आईतांडा येथे ३०० लोकवस्ती आहे. ताडयांजवळ जाभायवाडी तांडा आहे . पाणी फांडेशन वाटर कप स्पर्धेत दुसरा कमांक मिळाला आहे. मंदिराचा आकार ३०X४० असुन मंदिर परिसराच्या विकासाला प्रंचड वाव आहे. पर्यटनाच्या दृष्टीने या मंदिरात धामिक स्थळाचा  दर्जा मिळवणे गरजेचे आहे. जेणे करुन भाविकांना योग्य सोयीसुविधा मिळु शकतील. मंदिराचे पुजारी नामदेव दगडू आडे,  सरपंच तिडके व गावकरी यांच्यासह विविध विभागाचे सदस्य मंदिर विकासासाठी तत्पर आहेत.

**मंदिराची वैशिष्टे :-**

१) बंजारा समाज व इतर समाजाचेही लोक मोठया प्रमाणात नवरात्र वेळेस आई तांडा येथे एकत्र येतात.
२) मंदिर परिसरात कोणही व्यवहार, देवान घेवान करतांना खोटे  बोलत नाही.
३) पोहरा देवीचे मूळ पीठ (स्थान) म्हणून ओळखले जाते.
४) पोहरा देवीनंतर सर्वात मोठी यात्रा भरते.
५) निसर्गाच्या सानिध्यात बालाघाटच्या डोंगर रांगेवर बसलेले हे  पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

**उपाय योजना :-**

१) भाविकांना सुविधा पुरवणे.
२) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून मंदिर परिसराचा विकास करणे.
३) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करणे.
४) हे तीर्थस्थान महामार्गला जोडणे आवश्यक आहे.
५) तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देणे.

**संदर्भ :-**

१) वंशावळीप्रमाणे सध्याचे पुजारी नामदेव आडे यांच्या व गावक-यासह सरपंच तिडके यांच्या मौखिक माहिती व आख्यायिकाच्या सहाय्याने
२) प्रत्यक्ष भेट व मुलाखत
३) मंदीराचे फोटो.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of the only Purushottam temple in India, situated in Purushottampuri village of Majalgaon taluka.

## पुरुषोत्तम तीर्थक्षेत्र पुरुषोत्तमपुरी

माजलगाव तालुक्यामध्ये पुरुषोत्तमपुरी येथे देशातील एकमेव असणारे पुरुषोत्तमाचे मंदिर आहे. माजलगाव शहरापासुन २२ कि. मी. अंतरावर गोदावरीच्या तीरावर हे हेमाडपंथीय मंदिर निसर्गाच्या सानिध्यात वसलेले आहे. पुरुषोत्तम हे विष्णुचे रुप मानले जाते. आधिक मासामध्ये एक महिना यात्रा भरते. यावेळी पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून लाखो भक्त येथे येतात.

गोदावरी नदीच्या दक्षीण किना-यावरील पुरुषोत्तमाचे मंदिर म्हणजे यादवकालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ नमुना होय. स्थापत्याचे वैशिष्टये म्हणजे मंदिराच्या बांधकामसाठी वापरलेल्या वीटा. पाण्यावर तरंगतात. देवगिरी येथील यादव सत्तेच्या काळात अनेक मंदिराची उभारणी करण्यात आली. यादव काळात बांधलेल्या स्थापत्य रचनेला हेमाडपंथी व स्थापत्य म्हणून ओळखले जाते. पुरुषोत्तमपुरी येथील मंदिर स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. पुरुषोत्तम मंदिरासंदर्भात ताम्रपट व शिलालेखाच्या स्वरुपात ऐतिहासिक पुरावा सापडला आहे. यादव घराण्यातील राजा रामचंददेव (रामदेवराय) यांचा ताम्रपट (शके १२१२) पुरुषोत्तमपुरी गावातील एका गोसाव्याकडे होता. सदरील ताम्रपट हैदाबादचे पुरातत्व खात्याचे संचालक गुलाम यजदानी यांनी डॉ. वा.वि.मिराशी यांना पाठविला. त्यांनी तो एपिग्राफिया ऑफ इंडिया, खंड २५, पृ १९९-२२५ मध्ये प्रसिध्द केला. यानंतर पुढे तो संशोधन मुक्तावळी या पुस्तकात सर चौका पृ १४७ - १७२ मध्ये प्रसिध्द केला. ताम्रपटाचे तीन पत्रे असून त्याची लांबी ३७ से.मी. रुंदी ५० से. मी. व जाडी २ से. मी. आहे. त्याचे वजन १५१ ग्रॅम आहे. त्यावर एकूण १४१ ओळी आहेत. या ताम्रपटात दोन मित्यांचा (तारखांचा) उल्लेख आहे. पहिली इ.स.५ सप्टेंबर १३१० (शके संवत १२३२) ही आहे. यादव वंशीय राजा रामचंद् याने प्रधान महामंडलिक पुरुषैनायक किंवा पुरुषोत्तम यास आग्रहारातुन गावे दान दिली. पुरुषोत्तमाने त्याचा पुरुषोत्तमपुरी नामक आग्रहार करुण तो काही ब्राम्हणांना दान दिला. या आग्रहारात साएगव्हाण , पिपंवळगव्हाण , पालीपोखरी , पिपंळवाडी , काजळकोवी , सोईजणे , सिंपविवहीरे , गोल्हे गव्हाण आणि धारवाघोरे या वाडयाही दान दिल्या होत्या या आग्रहाराच्या चतु:सिमा व पुढील प्रमाणे होत्या. पूर्वेस सादोळा व दांडिगौ , दक्षीणेस केसापुरी , सावरिगवा आणि हरिकिनीबगौ , पश्चिमेस राजगौ , हिवरे, चित्रवली आणि दुगलेगव्हाण सहीत महादेवपुरी आणि उत्तरेस गंगा (गोदावरी नदी) ही गावे आहेत. आजही पुरुषोत्तमपुरीच्या आसपास ही गावे आढळतात. सादुलो म्हणजे सादोळा , केशवपुरी म्हणजे केसापुरी , सावरेगवा म्हणजे सावरगाव , हरिकी निबगो म्हणजे हरकी लिंबगाव तर हिवरे राजगौ म्हणजे हिवरे बु. व राजेगाव तर गोळेगव्हाण म्हणजे गव्हाणथडी होय. या ताम्रपटाचे महत्व म्हणजे राजा रामचंद यादवाच्या कारकीदीतील शेवटचा पुरावा होय. या ताम्रपटात राजा रामचंदच्या विजयाचे वर्णन व तत्कालीन काळातील इतर प्रदेशावर राज्य करीत असलेल्या राजांचा उल्लेख आढळतो. यावरुन तत्कालीन धामिकस्थितीसह राजकीय स्थितीची माहिती मिळण्यास मदत होते.

पुरुषोत्तमपुरी येथे सापडलेला एका अन्य शिलालेखात रामचंद राजाने जिंकलेल्या अनेक लढायांचा उल्लेख आढळतो. राजा रामचंद यादवाचा मंत्री पुरुषोत्तम याने रामचंद यादवाकडून मिळणा-या अर्थसाह्यावर अग्रहार उभारले. याच अग्रहाराचे शके १२३२ (इ.स.१३१०) मध्ये यादवमंत्री पुरुषोत्तमाच्या नावाने पुरुषोत्तमपुरी असे नामकरण करण्यात आले. शिलालेखावरही याच काळाचा उल्लेख आहे.

तेराव्या शतकातील पुरुषोत्तमाचे मंदिर चौथ-यावर असून ते दगड व विटांनी बांधलेले आहे. या बांधकामासाठी वापरलेल्या विटांची वैशिष्ट म्हणजे त्या विटा पाण्यावर तरंगतात. साधारणतः ४० फुट उंचीचे हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. उंच पाय-यावरुन मंदिरामध्ये प्रवेश केल्यानंतर आत छोटासा सभामंडप येतो. बाजुस नक्षीकाम केलेले खांबही आहेत. मुख्य मंदिराच्या गाभा-यात चतुर्भुज उभी सुंदर मुर्ती आहे. पुरुषोत्तमाच्या हातात शंख , चक , पद्‌म , गदा धारण केलेली आहे. मंदिरासमोर मंदिराच्या डाव्या बाजुस महादेवाचे मंदिर व आणि पार्वतीच्या पादुकाही आहेत. गावच्या दक्षीणेस काशीविश्वेश्वराचे मंदिर आहे. गावापासून पूर्वेस १ कि. मी. अंतरावर गोदावरी पात्रात भस्माची टेकडी आहे. तेथे ऋषीचे वास्तव्य असल्याचे सांगितले जाते. धामिक दृष्टया महत्वपूर्ण असलेल्या १३ व्या शतकातील या पुरुषोत्तम मंदिराची सद्यस्थितीत पडझड झालेली दिसून येत आहे.



**श्री पुरुषोत्तम मंदिर**





**महादेवाचे मंदिर**

श्रावण आणि अधिक महिन्यात लाखोच्या संख्येने भक्तगण येथे येतात . या महिन्यास अधिकमास , पुरुषोत्तम मास किंवा धोंडयाचा महिना असे म्हणतात. सौर व चंदमासातील दरवर्षी ११ दिवसांचा फरक ३ वर्षात ३३ दिवसाचा होतो. यालाच अधिक मास असे म्हणतात. त्यामुळे या महिन्यात भाविक ३३ वस्तु, ३३ अनारसे , बत्तासे दान करतात. पुरुषोत्तमाचे

हे मंदिर देशभरात अधिक मासासाठी प्रसिध्द असल्याने महिनाभर चालणा-या यात्रेस महाराष्टासह आंध्रप्रदेश , तेलंगाणा , मध्यप्रदेश व गुजरात आदी राज्यातुन लाखोच्या संख्येने भाविक भक्तीभावाने येथे येतात. परंतु पुरातत्व विभाग व शासनाच्या दुर्लक्षतेमुळे मंदिर विकासापासून वंचित आहे.

प्राचीन असणा-या मंदिराच्या काही भागांची पडझड झाली असून मंदिराची मुख्य शिळा पडण्याची भिती आहे. त्याचप्रमाणे परराज्यातून येणा-या भाविकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. शासनाने व पुरातत्व विभागाने याकडे विशेष लक्ष देऊन मंदिर व परिसराचा विकास करुन ऐतिहासिक वास्तुचे जतन करणे गरजेचे आहे.

**मंदिराची वैशिष्टे :-**

१) देशातील पुरुषोत्तमाचे एकमेव मंदिर.

२) १३ व्या शतकातील यादवकालीन हेमाडपंथीय मंदिर.

३) पुरुषोत्तम मंदिराच्या बांधकामात वापरलेल्या विटा पाण्यावर तरंगतात.

४) पुरुषोत्तमा बरोबरच महादेव पार्वती व गणपती असा त्रीवेणी संगम.

५) गोदावरी नदीच्या काठावर निसर्गरम्य वातावरणात वसलेले पर्यटन स्थळ आहे.

६) अधिक मासामध्ये एक महिना यात्रा भरते.

७) देशातील विविध राज्यातून लाखोच्या संख्येने भाविक येतात.

८) पुरुषोत्तमाचे मंदिर शिल्पकला व स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ नमुना आहे.

**उपाय योजना :-**

१) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे.

२) मंदिराच्या भिंती ढासळत असून त्याकडे वेळीच लक्ष देणे.

३) पर्यटन क्षेत्राचा विकास करुन रोजगार निमितीला चालना देणे.

४) देशभरातून येणा-या भाविकांना सुविधा पुरविणे.

५) धामिकदृष्टया महत्वाच्या असलेल्या या तीर्थस्थळाची वाहतुक व्यवस्था सुरळीत करणे.

६) मुबलक पाणीसाठा असल्याने परिसरात वृक्षारोपण करणे.

**संदर्भ :-**

१) गोखले शोभना , पुराभिलेखविद्या , कॉन्टिनेन्टल प्रकाशन , पुणे , व्दितीय आवृती २००७.

२) साळुंके सतिश , बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगिन इतिहास , बीड जिल्हा इतिहास परिषद तृतीय आवृती २०११.

३) खरे ग. ह., दक्षीणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने , खंड १ , २ पुणे.

४) मिराशी वा. वि. स. , संशाधन मुक्तावली .

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Khandoba God temple situated in Devdahiphal village of Majalgaon taluka.

## खंडोबा मंदिर तीर्थक्षेत्र देवदहिफळ

माजलगाव पासून ३५ कि. मी. अंतरावर देवदहिफळ येथे कुंडलिका नदीची उपनदी सरस्वती नदी किनारी प्रसिध्द खंडोबाचे प्राचीन मंदिर आहे. बालाघाट डोंगर रांगेंच्या मध्यभागी नैसगिक सौंदर्य साधनानी नटलेल्या या तीर्थक्षेत्राला धामिक स्थळाचा **क** दर्जा प्राप्त आहे. लाखोच्या संख्येने भाविक यात्रेला येतात. या मंदिराचे बांधकाम इ. स. १२९६ या काळात झालेले असून या मंदिराचा जिर्णोव्दार २००४ या वर्षी करण्यात आला आहे. मंदिर व मंदिर परीसराला ५ एक्कर १७ गुंठे जमीन दान देण्यात आली आहे. परंतु त्याचा प्रत्यक्ष पुरावा आमच्यापर्यंत पोहचला नाही. या तीर्थक्षेत्राला धामिक स्थळाचा **क** दर्जा प्राप्त असून पंचवीस लक्ष रुपये निधी मिळाला आहे. मंदिरास रंगरंगोटी, भक्त निवास , परिसर स्वच्छतेसह , वृक्ष लागवड व मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी खर्च करण्यात आल्याचे गावचे प्रथम नागरिक सरपंच, पुजारी , गुरव , व जि. प. सदस्य बडे सांगतात. मंदिराला टस्ट नसून गावपातळीवर मंदिर व भाविकांची व्यवस्था पाहिली जाते. मंदिराचे प्राचीन वैभव पहाता तेथे असणारी व्यवस्था तुटपुंजी वाटते. लाखोच्या संख्येने भाविक यात्रेला येत असल्यामुळे पर्यटन स्थळाला **ब** दर्जा दिल्यास सामाजिक सांस्कृतिक विकासात भर पडून मोठे पर्यटन क्षेत्र उदयाला येईल, यात काही शंका नाही. सदर गावाची लोकसंख्या ३,५०० आहे.

डिसेंबर महिन्याच्या चंपाषष्टीला देवदहीफळ येथे खंडोबाची मोठी यात्रा भरते. ही यात्रा सलग दोन महिने चालते. लाखोच्या संख्येने यात्रेकरु येथे यात्रेसाठी व नवस फेडण्यासाठी येतात या यात्रेत मोठया प्रमाणावर खेळ , कुस्ती ,सकर्स , लोकनाटय , खेळणी. करमणुकीच्या साधनासह व्यापारी उलाढाल सतत दोन महिने चालू असते. खंडोबाची यात्रा म्हणजे भक्तासाठी पर्वणी असते. स्थापत्य कलेच्या दृष्टीने विचार केल्यास हे मंदिर मुळचे हेमाडपंथी शैलीत बांधले असून शिल्पकला व स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे. २००४ मध्ये या प्राचीन मंदिराचा जिर्णोध्दार केलेला आहे. त्यामुळे मुळचे बांधकाम नाहीसे झाले असून प्राचीन मंदिराच्या शिळानी हे मंदिर बांधले आहे. मंदिराच्या उत्तरेला पुरातन विहीर (बारव) असून याच विहीरीचे पाणी गाव व मंदिरासाठी वापरले जात असावे. ही विहीर घडवलेल्या दगडांनी बांधलेली आहे. विहीरीत खाली उतरण्यास दगडाने बांधलेल्या पाय-या आहेत. या विहीरीचे वैशिष्टये म्हणजे ही विहीर केव्हाही आटलेली नाही. कोरडया उन्हाळयात या विहीरीला पाणी असते असे गावकरी सांगतात. यावरुन इ. स. १२९६ च्या आसपास या मंदिराचे बांधकाम झ ााले असावे असे दिसते. हा कालखंड तेथील कालखंड शिळा , मंदिरावरील व दगडावरील कोरलेल्या शिल्पावरुन हे मंदिर यादव काळात बाधंले असावे असे सिध्द होते.


प्रत्यक्ष मंदिर बघीतल्यानंतर एक गोष्ट लक्षात येथे की, खंडोबा व महादेवाच्या मंदिरासमोर असलेल्या नंदीचे मुख हे मंदिराकडे असते परंतु या मंदिरासमोर असलेलेल्या नंदीचे मुख हे विरुध्द दिशेला आहे. याची एक अख्यायिका सांगितली जाते. शंकर जोशी नावाचे खंडोबा भक्त होते. ते मोग-या वरुन बीदर जवळ मैलार येथे खंडोबाच्या मंदिरास वारी करायचे. प्रत्येक महिन्याला ते वारी करत असत वयोवृध्द झाल्यानंतर खंडोबा त्याच्या स्वप्नात आले. व म्हणाले, तू आता वयोवृध्द झालेला आहे. आता तू माझ्याकडे येण्या ऐवजी मीच तुझ्याकडे येतो. तेव्हा खंडोबा त्या भाविक शंकर जोशी सोबत चालत असतांना देवाने त्यांच्याकडून वचन घेतले की मी तुझ्या सोबत येतो परंतु तू मागे बघू नको. शेखर जोशी पुढे निघाले व देव

येत आहेत की नाही ते मागे वळून बघितले ती जागा हीच असल्यामुळे देव त्यांना म्हणाले तू मागे बघितले वचन मोडलेस. आत्ता मला येथेच थांबावे लागेल. देव तेथेच थांबले. म्हणून या नंदीचे मुख (तोंड) मंदिराच्या पूर्व दिशेला म्हणजे विरुध्द दिसेला आहे अशी आख्यायिका सांगितली जाते.

या मंदिराचे प्रवेशव्दार व गर्भगृहाचे प्रवेशव्दार पूर्व दिशेला आहे. मंदिराच्या प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजुला दीपमाळ आहे. तेथेच मंदिराच्या प्राचीन प्रवेशव्दाराची शिळा आहे. समोर विष्णुचे स्वागत करतानाचे शिल्प कोरलेले आहे . या शिल्पावरुन मंदिराचे प्राचीनत्व सिध्द होते. दीपमाळेच्या बाजुला पंजेरी बाबाची समाधी आहे. या मंदिराच्या मुख्यगर्भगृहात प्राचीन महादेवाची पिंड व खंडोबाची भव्यदिव्य मुर्ती आहे. विशेष म्हणजे या मंदिरात दोन शिवलिंग आहेत. मोठे शिवलिंग प्रत्यक्षात महादेव तर दुसरे लहान शिवलिंग म्हणजे खंडोबा महादेवाचा अवतार असल्याचे दर्शविते.

मंदिराच्या जवळच भग्न अवस्थेत अनेक मूर्ती सापडल्या आहेत. व्दारपाल, विष्णु व शिवपार्वतीसह कोरलेल्या दगडाच्या मुर्ती आहेत. विष्णुची चर्तुभुज आकाराची मुर्तीसह अनेक मुर्ती विखुरलेल्या आवस्थेत आहेत. या सर्व मुर्ती, मंदिर प्राचीन इतिहास व संस्कृतीची साक्ष देतांना दिसतात. मंदिराच्या आजुबाजुला झाडे सावली असून गार्डनसाठी मोकळी जागा आहे. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सुव्यवस्थित पार्किंग , भक्त निवास , गार्डन, पाण्याची टाकी , व्यापा-यासाठी सुव्यवस्थित कट्टे , स्वच्छालये आसणे आवश्यक वाटते. कारण लाखोच्या संख्येने भाविक येथे यात्रेला येतात. जेजुरी तीर्थक्षेत्रानंतर देवदहीफळ येथील खंडोबा मंदिर महाराष्टातील नंबर २ चे तीर्थक्षेत्र आहे.









**मंदिराची वैशिष्टे :-**

१) जेजुरीच्या खंडोबा मंदिराच्या नंतरचे महाराष्टातील जागृत दुसरे तीर्थक्षेत्र होय.

२) यादव कालीन पुरातन मंदिर असून हेमाडपंथी बांधकाम शैलीचा उत्तम नमुना.

३) पर्यटन स्थळाच्या दृष्टीने महत्वाचे तीर्थक्षेत्र.

४) चंपाषष्टीला खंडोबाची यात्रा भरते. लाखो भक्तांसाठी ही यात्रा सतत दोन महीने चालते.

५) सरस्वती नंदीच्या काठावर बालाघाट डोंगर रांगाच्या उत्तरेला हे तीर्थक्षेत्र.

**उपाय योजना :-**

१) भक्त निवास, पार्कींग , सार्वजनिक स्वच्छतागृह , गाडर्न, वृक्ष लागवड करणे गरजेचे वाटते.

२) पर्यटनाचा **ब** दर्जा मिळवणे.

३) मंदिर परिसराचा विकास करणे.

४) भाविकांसाठी सुविधा उप्लबध करुन देणे.

५) व्यापारी, करमनुकीच्या खेळासाठी व्यवस्थित नियोजनाची गरज आहे.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Keshavraj temple of God ishnu situated in Kesapuri village of Majalgaon taluka.

## केशवराज मंदिर तीर्थक्षेत्र केसापुरी

बीड जिल्यातील माजलगाव तालुक्यात केसापुरी हे ऐतिहासिक गाव आहे. या गावाचे प्राचीन नाव भद्‌वती असून नंतर केशवपुरी असे झाले. हे गाव माजलगावपासून पश्चिमेस ३ कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणी गावाच्या बाहेर (महाड) भग्न अवस्थेतील केशव मंदिर म्हणजेच हे विष्णु मंदिर आहे. या मंदिराची निमिती मंदिर अवशेषावरुन कल्याणीच्या चालुक्याच्या काळात इ.स.बाराव्या शतकात सोमेश्वर तिसरा यांच्या काळात झाल्याचे दिसते. कारण मंदिराच्या मुख्यमंडपाच्या छतावर कालीमातेचे शिल्प कोरलेले असून हे शिल्प महिषा सुराला मारतानाचे आहे. तर चार बाजुला तांडव करणारा महादेव, नाचणारा गणपती, इतर देवगणाची सुंदर शिल्पे आहेत. या मंदिरात केशवराजाची मुर्ती नसल्यामुळे या मंदिराला बरेच जन शिवमंदिर म्हणतात. परंतु या मंदिरावर असलेल्या यक्ष, गंधर्व, किन्नर इ. शिल्पावरुन हे मंदिर केशवराजाचे आहे हे सिध्द होते अखंड भारतात एकूण केशवराजाचे २८ मंदिर असून त्यातील पहिले मंदिर बीड जिल्यातील माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथे आहे व मुख्यमंडप , मंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा या मंदिराचा परविन्यास आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. या मंदिराची पूर्व - पश्चिम लांबी ७६ फूट आणि दक्षीण - उत्तर रुंदी ५४ फूट आहे. मंदिराचे गर्भगृह पूर्णपणे उध्दवस्त झाले आहे. त्याचा आकार ९x९ चौरस फूट आहे. मुखमंडप थोडा चांगल्या स्थितीत आहे. त्याची पूर्व - पश्चिम लांबी १० फूट आणि दक्षीण - उत्तर ६ फूट आहे. मुख्यमंडपात दोन्ही बाजुस ३ फूट उंचीचे दगडांची बांधलेले ओटे आहेत. मंडपही चांगल्या अवस्थेत आहे. मंडप ४६x४६ चौरस फूटाचा आहे. मंडपात ३२ स्तंभ आहेत. या ठिकाणी मंडपात रंगसाज आहे. रंगसाधेचे स्तंभ आणि आढे कोरीव काम करुन सजविले आहेत. या ठिकाणी मध्यभागात नृसिंह प्रतिमा कोरलेली आहे. आणि शिव गणेश आणि कातिकेय प्रतिमा कोप-यात मध्यभागातील विभागात कोरलेल्या आहेत. मंदिराच्या बाहय भिंतीवर पदम आणि कुणी कोरलेले आढळते. कुमुद आणि पदम हे बहुसंख्येने कोरलेले आढळते. या सर्व शिल्पकलेवर चालुक्य कलाशैलीचा स्पष्ट प्रभाव दिसतो. हे एक विशाल मंदिर असल्याचे उपलब्ध अवशेषावरुन दिसून येते. या तीर्थक्षेत्राच्या संदर्भात दोन आख्यायिका पण आहेत. पहिली म्हणजे महाभारतातील शांतीपर्वात आलेली पांडव यमुरध्वज राजाची आख्यायिका. हा भदावती नगरीचा राजा होता. तो धर्मात्मा , भगवतभक्त व प्रजावत्सल्य राजा होता. त्यांनी अनेक यज्ञ केले होते. त्यापैकी अश्वमेध यज्ञ हा एक होय. त्यांनी या यज्ञाच्या वेळी घोडा सोडला होता आणि त्यासोबत परकमी राजपुत्र ताम्रध्वज आणि प्रधानमंत्र्यासह सैन्य दिले होते. त्यावेळेस दुसरीकडे हस्तीनापूर येथे धर्मराज युधिष्ठरांचा अश्वमेध यज्ञ चालू होता. त्यावेळेस त्यांनीही घोडा सोडलेला होता. त्या घोडयासोबत श्रीकृष्ण आणि अर्जुन आलेले होते त्या वेळी अर्जुनाला आपल्या पराकमाबददल गर्व निर्माण झाला हे गर्वहरण करण्यासाठी श्रीकृष्णाने भगवतभक्त ताम्रश्वजाच्या माध्यमातून अर्जुनाचा पराभव घडवून आणला. श्रीकृष्ण व अर्जुनाचा पराभव केल्यानंतर दोन्ही यज्ञातील घोडे ताम्रध्वजाने आपल्या वडीलांकडे मयुरध्वज राजाकडे दिले. त्यांना सेनापतीनी युध्दाची सर्व हकिकत सांगितली. हे ऐकून मयुरध्वजाने दुःख व्यक्त करुन मुलाला ताम्रध्वजाला म्हणाले की , तू माझा पुत्र नसून शत्रु आहे. कारण प्रत्यक्ष देवाची भेट होऊनही तू केशवराजाला सोडून घोडयाला घेऊन आलास. ताम्रध्वजाला पश्चाताप झाला. इकडे अर्जुनाची मुच्छर्ना संपली. त्यावेळी श्रीकृष्णाने घोडयाविषयीचा वृतांत सांगितला. श्रीकृष्णाने स्वतः ब्राम्हण वेश धारन केला आणि अर्जुनाला शिष्य बनवले व मयुरध्वजाच्या यज्ञशाळेत उपस्थित झाले. त्यावेळी त्यांचे तेज पाहून राजा मयुरध्वजाने आसनावरुन उठत नमस्कार केला. त्यापुर्वीच आशिर्वाद दिला. राजाने त्यांचा आदर सत्कार करुन त्यांच्या

इच्छा विचारली. त्यावेळी ब्राम्हण वेशधारी श्रीकृष्ण म्हणाले की, माझ्या मुलासोबत इकडे येत असतांना वाटेत सिंह भेटला व मुलाला खान्याची इच्छा व्यक्त केली. मी पुत्राच्या बदल्यात स्वतःला देण्याचे ठरवले. पण तो ती विनवणी नाकारली. शेवटी म्हणाला की, जर मयुरध्वज राजाचा मुलगा व त्यांचे अर्धे शरीर मला दिले तर मी तुझ्या मुलाला सोडेन. हे ऐकूण राजा मयुरध्वजाने तात्काळ संमती दिली. मयुरध्वजाचे करवतीने कापू लागले तेव्हा डाव्या डोळयातुन अश्रू येत होते. ते पाहुन ब्राम्हण देवता निघुन जाऊ लागले. तेव्हा मयुरध्वजाच्या पत्नीने अग्रह करुन म्हणाले की, उजवा भाग हा ब्राम्हणदान झाल्याने खूश आहे तर डावा भाग आपण काही पवित्रकामसाठी कामी येत नाही म्हणून अश्रु ढाळीत आहे असे म्हणाले. त्यावेळी हे मयुरध्वजाचे विशुध्द भाव पाहून केशवराजानी शंख, चक गदाधारी चर्तुभूज पितांबर , मोरपंख धारण केलेला श्रीकृष्ण भगवान केशवराज रुपात प्रगट झाले. मयुरध्वजाच्या शरीराला स्पर्श करुन पुवीपेक्षाही सुंदर शरीर बनवले.यावेळी अर्जुनाचे गर्वहरण झ ाले व मयुरध्वज राजाचे चरण अर्जुनाने धरले आणि स्वतः गर्वहरण झाल्याचे सांगितले. त्यांनतर मयुरध्वजाने श्रीकृष्ण भगवानाला केशवराजरुपात येथेच थांबण्याची विनंती केली. त्यांनीच या मूतीची स्थापना व मंदिराचे बांधकाम केलेले आहे. हे पांडवकालीन मंदिर आहे अशी या मंदिराबददल आख्यिायिका आहे. परंतू हे मंदिर चालुक्यराजा सोमेश्वर तृतीय यांच्या काळात निर्माण झालेले आहे. या भगवान रुपाचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी "राजस सुकुमार मदनाचा पतुळा | रविशशिकळा लोपलीया || १ || कस्तुरीमळवट चंदनाची उटी | रुळे माळ कंठी वैजयंती || धृ || मुगुट कुंडले श्रीमुख शोभले | सुखाचे ओतले सकळ ही || २ || कासे सोनसळा पांगरे पाटोळा | घननीळा सावळा बाइयानो || ३ || सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा | तुका म्हणे जीवा धीर नाही || ४ ||" असे वर्णन केलेले आहे. याच प्रमाणे संत एकनाथ महाराजांचे पंजोबा संत भानूदास महाराजांनी आपल्या अभंगातुन या रुपाचे वर्णन केले ते - "शंखचक गदा धरु | कासे सुरंग पितांबरु | चरणी ब्रीदाचा तोडंरु | असुरावरी काढीतसे || १ || बरवा बरवा केशवराजु | गरुडवाहन चतुर्भुजू | कंठी कौस्तुभ झळके वीजु | मेघशाम देखोनी || २ || करी सृष्टीची रचना | नाभी जन्म चतुरानना | जग हे वाखानी मदना | ते लेकरु तयांचे || ३ || कमला विलासली पायी | आर्त तुळशिचे ठायी | बहयादिंका अवसर नाही | तो यशोदे वोसंगा ||४|| उपमा द्यावी कवणे अंगा | चरणी जन्मली पै गंगा | सोळा सहस्त्र संभोगा | नित्य न पुरती कामिनी ||५|| अधिष्ठान गोदातीरी | रिध्दीसिध्दी तिष्ठती व्दारी | भानुदास पुजा करी | वाक्पुष्पे अनुपम्य ||६||

यावरुन राजा मयुरध्वजाने श्री केशवराजांची स्थापना केली त्याचे वर्णन वरीलप्रमाणे येते. दुसरी आख्ययिका म्हणजे भीम आणी बकासूर युध्द छेडत छेडत केसापुरी येथे आले. भीम ज्या तळयात पडला ते तळे गोड पाण्याचे झाले आणि बकासूर ज्या तळयात पडला ते तळे खा-या पाण्याचे झाले. असा उल्लेख पुराणातही आहे. ती दोन तळी या मंदिरांजवळच आहेत.

केशवराजाचे सुस्थितीत असलेले मंदिर आज केसापुरी गावात उत्तरेला तोंड करुन आहे. या मंदिराला पुर्व व पश्चिम प्रवेशव्दारही आहे. मंदिरात प्रवेश करतांना मंदिराचे प्रवेशव्दार हे जुन्या मंदिराचे असल्याचे स्पष्टपणे दिसते. आत प्रवेश करताना दोन्ही बाजुला मुख्य सभामंडप आहे. सभामंडपात एकूण १४ खांब आहेत. सभामंडपाच्या बाहेरच्या बाजुने १० खोल्या आहेत. देवाचे स्नानाचे पाणी साठवण्यासाठी कल्लोळ आहे. वर जाण्यासाठी सभामंडपातुन दगडी पाय-या आहे.

गर्भगृहात जी मुर्ती आहे ती स्वयंभू असून शाळीग्राम दगडाची आहे. या मंदिराबद्‌दल लंडन वस्तुसंग्राहालयात दिड पान माहिती दिलेली आहे. या मुर्तीचे वैशिष्टय म्हणजे ही मुर्ती शाळीग्राम दगडाची असून डोक्यावर शिवलिंगाचे पिंड कोरलेले आहे. या मुर्तीची उंची जवळपास सात फूट आहे. ही मुर्ती अर्धनारी नटेश्वराची आहे. या मुर्तीवर डोक्याभोवती तेजोवलय आहे. डोक्यामागे कमानीत विष्णुचे दहा अवतार कोरलेले आहेत. गळयात मंगळसुत्र व मंगळसुत्राच्याखाली छातीवर भृगुऋषिने मारलेले लाथेचे चिन्ह आहे. मुर्तीच्या उजव्या हातात पांचजन्य शंख, दुस-या हातात कमलपुष्प तर डाव्या बाजुच्या वरच्या हातात सुदर्शन चक तर खालच्या हातात गदा आहे. मुर्तीचे आर्धे डोळे मिटलेले असून लांबसडक नाक आहे. नाकाखालील तोंडातील खालचा ओठ फुगलेला आहे. डोक्यावर नक्षीकाम केलेला टोप व त्याखाली लोंबनारे कुरुळे केस, हे पाहिल्यानंतर मुर्तीचे मनमोहक दृश्य दिसते. तसेच पायात तोडे व पायाच्या बोटात जोडवे आहेत. मुतिच्या नखाची ठेवण, कंकण , पैजंन, अंगठीवरचे बारकावे , बोलकी व भावस्पर्शी मुदा आपणाला आकषूण घेते. केशवराजाच्या मुर्तीवर सप्तशेषाची छाया आहे. भिमाने गरम दूध पाजल्याने केशवराजाचे ओठ फुगलेले आहे असे म्हटले जाते. केशवराजाचा पायाचा अंगठा तुटलेला आहे. या सर्व सौभाग्य अलंकारामुळे केशवराजाला व केशवलक्ष्मी असेही म्हटले जाते. केशवराजाच्या डाव्या बाजुला ब्रम्हदेवाची मुर्ती आहे. पुष्कर नंतर ब्रम्हदेवाची मुर्ती येथेच असल्याचे मानले जाते. पुष्कर येथील ब्रम्हदेवाच्या मुर्तीसारखीच ही मुर्ती दिसून येते. ब्रम्हदेवाच्या बाजुला हंसवाहिनी सरस्वती आहे.





प्रातःसमई केशवराजाची मुर्ती गरम लागते. ज्या मुर्तीत चैतन्य असते तीच मुर्ती गरम लागते असे म्हटले जाते. केशवराज हे पंढरपूरचे मूळ पीठ मानले जाते. संत नामदेवानी -- न ामा म्हणे केशवराजा | केला नेम चालवी माझा | असा उल्लेख केलेला आहे. केसापुरी येथील केशवराज जन्मोत्सव आषाढ शुध्द एकादशीपासून वद्य प्रतिपदेपर्यंत पाच दिवस साजरा केला जातो. रोज हजारो भाविक येतात व भक्तीभावाने या उत्सवात सहभागी होतात. यादव राजा रामचंददेव याने त्यांचा प्रांताधिकारी पुरुषोत्तम यास पुरुषोत्तमपुरी येथील आग्रहार दिली असता त्याच्या सिमादर्शवितांना- "पुर्वकडे दंडीगौ आणि सादुले , दक्षीणेस केशवपुरी , सावरीगवा आणि हरिकिनिंबगौ , पश्चिमेस राजगौ , हिवरेचित्रवली आणी दुर्गलेगाव्हाणसहित

महादेवपुरी आणि उत्तरेस गंगा" असा जो उल्लेख केलेला आहे. त्यात दक्षीणेकडील सिमेवर असलेले केशवपुरी असा केसापुरीचा उल्लेख आलेला आहे. चालुक्याची सांस्कृतिक राजधानी ही धर्मापुरी असून तेथील केदारेश्वर मंदिरावर ज्या मुर्त्या आहेत आणि तेथील वास्तुरचना व शिल्पकला ही केसापुरी येथील शिल्पकलेशी व वास्तुकलेशी मिळती जुळती आहे. यावरुन केशवराजाचे मूळ मंदिर हे चालुक्याच्याच काळात बांधलेले आहे. तर त्यांचा जिर्णोध्दार हा यादवाच्या काळात झालेला दिसतो. अशा या प्राचीन अवशेषाकडे सरकारचे व जंनतेचे वेळीच लक्ष जाणे गरजचे आहे. अन्यथा आपल्या राष्ट्राचा व संस्कृतिचा एक अमूल्य ठेवा नाहिसा होऊ शकतो.




**प्राचीन श्री केशवराज मंदिर**

**मंदिराची वैशिष्टे :-**

१) चालुक्यकालीन बाराव्या शकतकातील स्थापत्यकलेचा अव्दितीय नमुना आहे.

२) केशवराजाची मुर्ती ही दुमिळ अशा शाळीग्राम दगडाची आहे.

३) केशवराजाच्या मुर्तीवरील अलंकार हे स्त्री - पुरुषांचे असल्याने त्यास केशव लक्ष्मी म्हटले जाते.

४) पुष्करनंतर ब्रम्हाची मुर्ती येथेच आहे.

५) पंढरपूरच्या पांडुरंगाचे मुळपिठ आहे असे म्हटले जाते.

६) शुध्द आषाढी एकादशीला होणा-या महोत्सवात देशातून हजारो भाविक येतात

**उपाय योजना :-**

१) भग्न अवस्थेतील मंदिराकडे पुरातत्व खात्याने वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

२) चालुक्यकालीन दुर्मीळ सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करणे.

३) यात्रेस येणा-या भाविकांना सुविधा पुरविणे.

४) पर्यटनाच्या दृष्टीकोणातून मंदिर परिसराचा विकास करुन रोजगाराला चालना देणे.

५) तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देणे.

**संदर्भ :-**


१) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या , पृष्ठ २५२

२) काळे भगवान, मराठवाडा काल आणि आज

३) सांळुखे सतिष , बीड जिल्याचा इतिहास

४) देव शां.भा, पुरातत्व विद्या

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Gautam Rishi temple situated in Sadola village of Majalgaon taluka.

## गौतम ऋषी मंदिर तीर्थक्षेत्र, सादोळा

गोदावरी ही नदी बीड जिल्यातील एक प्रमुख नदी म्हणून ओळखली जाते. जी मराठवाडयाच्या पाच जिल्यातून जाते. या गोदावरी नदीच्या काठावर सादोळा येथे गौतम ऋषी मंदिर आहे. माजलगावपासून उत्तरेस सादोळयाच्या अगोदर पंढरपूर - खामगाव रोडवरुन पूर्वेकडे वळावे लागते. पुढे १ किलोमीटर अंतरावर सादोळा गावच्या पूर्वेला लोणी - सावंगीच्या बंधा-यात व गोदावरी नदीपात्रात महर्षी गौतम ऋषीचे मंदिर नैसगिक व मोहक वातावरणात वसलेले आहे. या मंदिराजवळ गोदावरी नदीवर लोणी- सावंगीचा बंधारा बांधलेला असून मंदिराजवळ पाणी मोठया प्रमाणात उपलब्ध आहे.ऋग्वेदांची रचना ज्या अनेक ऋर्षींनी केली त्यापैकी सुप्तदृष्टा दीर्घतमस म्हणजेच गौतम ऋषी हा होय. गायत्री मंत्राची रचना ही यांनीच केलेली आहे.

गोदावरी नदीला गौतमी असे दुसरे नाव आहे. हे स्थान ऋषी गौतमाची तपोभूमी आहे. त्यांनी ६० हजार वर्षे तप केल्याचा उल्लेख येतो. याच ठिकाणी गौतमाने यमाला पितृऋण कसे फेडावे या विषयी प्रश्न विचारला. त्यावर यमाने सत्य, धर्म, तप शुचित्व याचा अवलंब करुन मातापितरांची सेवा करावी म्हणजे पितृऋणातून मुक्त होता येते असे म्हटले. ऋषी गौतमाने बारा वर्षाचा दुष्काळ पडला असता इतर ऋर्षींना व लोकांना भोजन देऊन वाचविले. या संदर्भात येथील रहिवाशाकडून एक दंतकृथा सुध्दा सांगण्यात येते. ऋषी गौतम हा गोदावरी नदीकाठी रहात असे व रोज प्रातसमयी भात पेरीत असे. स्नान संध्या झाल्यानंतर सकाळी पेरलेले तांदूळ भोजनाच्या वेळी भोजनासाठी तयार होत असे. अशी ही दंतकथा आहे.

गौतम ऋषीनी आपल्या आश्रमात गाईला खूप महत्वाचे स्थान दिले होते. गाई खूप मोठया प्रमाणात पालन करीत असे. यावरुनच कदाचीत गौ म्हणजे गाय असाही अर्थ होतो. गाईचा संदर्भ गौतम ऋषी आणि अहिल्या यांच्या संदर्भातही येतो. अहिल्या ही ब्रम्हाची मानसकन्या मानली जाते. जिचा श्रेष्ठ पंचकन्यामध्ये समावेश होतो. ब्रम्हाने अहिलेच्या विवाहासाठी एक अट ठेवलेली होती. ती म्हणजे सर्वात प्रथम पृथ्वीला प्रदक्षिणा घालणा-याशी तीचा विवाह केला जाईल. तेव्हा या स्पर्धेत सर्व देवगण उतरले. ऋषी गौतमाने आपल्या अश्रमातील गाईच्या भोवती प्रदक्षिणा घातल्या व त्यांना पृथ्वीप्रदक्षिणा घातल्याचे फळ मिळाले. नारदाने ब्रम्हाला हे सांगितल्यानंतर ब्रम्हाने आपल्या मानसकन्येचा विवाह गौतमाशी लावला. ती अत्यंत सुंदर लावन्यवती असल्यामुळे देवांचेही मन तिच्यावर गेले होते. परंतु ऋषी गौतमाने ब्रम्हाने घातलेली अट सर्वात प्रथम पूर्ण केल्यामुळे तिचा विवाह गौतमाशी लावला. तिचा गौतमाशी विवाह झाल्यामुळे इतर देवांनी अभिलाषा सोडून दिली. परंतु इंद्राच्या मनातील आसक्ती तशीच राहिली. अहिल्येला फसवून तिच्यासी संबध केला. हे गौतम ऋषीला समजल्यानंतर दोघांनाही शाप दिला.

अज्ञानाध्दार्षीता विप्र त्वद्पेन दिवौकसा |


न कामकाराव्दिप्रषे प्रसादं कर्तुमर्हसि ||

अशा प्रकारे अहिलेच्या विनवणी नंतर तिला तिच्या पतीने म्हणजेच ऋषी गौतमाने उ:शाप दिला व प्रभु रामचंद तुझा उध्दार करील असे सांगितले.

भगिरथाने जशी गंगानदी पृथ्वीवर शंकराच्या अराधनेनी आणली तशीच गोदावरी पृथ्वीवर ऋषी गौतमानी आणली. गौतम म्हणजेच गौ+तम. दीर्घतम ऋषीनी गाईला मारल्याचे पाप केल्यामुळे त्यांना गौतम हे नाव पडले. गौतम ऋषी रोज यज्ञ करीत व त्यासाठी ते भात पेरीत व मंत्राने पक्व करीत. सर्व ऋषीनी गोदावरीच्या स्नानाचे पुण्य मिळविण्यासाठी गौतम ऋषीच्या आश्रमातील भातशेतीत गाईला पाठवले. गाय भात खातांना गौतम ऋषीने पाहिले. तिला हकण्यासाठी दर्भअस्त्र सोडले. त्यामुळे गाय मरण पावली आणि गौतमाला गौहत्या केल्याचे पाप लागले. त्या गाईला उठवण्यासाठी ऋषी गौतमाला या ठिकाणी ६० हजार वर्ष तप करावे लागले, तेव्हा शंकर प्रसन्न झाले. शंकराने गौतमाला वर मागण्यास सांगितले. त्यावेळी ऋषी गौतमाने पापक्षालनार्थ व पृथ्वीवरील प्राणीमात्रासाठी गंगा द्यावी अशी विनंती केली. तेव्हा शंकराने गौतमीला तशी जाण्याची आज्ञा दिली. गौतमाच्या साधनेमुळे गौतमी पृथ्वीवर आली म्हणून गौतमी असे म्हटले जाते. पितृ ऋनातून मुक्त होण्यासाठी ऋषी गौतमाने यमाला याच ठिकाणी विचारल्यामुळे येथे मोठया प्रमाणात लोक येतात आणि पितृ ऋनातून मुक्ती मिळवतात.

सद्याला गौतम ऋषी मंदिर हे गोदावरी नदी पात्रात असून त्या मंदिराचे नवीन बांधकाम झालेले आहे. या मंदिराच्या बाजुला महादेवाची पिंड आहे. या मंदिराचे व मुर्तीचे तोंड हे पूर्वेकडे आहे. हे छोटेखानी मंदिर आहे. जवळच गौतम ऋषीनी स्थापन केलेली गणेशमुर्ती आहे. गौतम ऋषी मंदिरात गौतमाच्या पादुकाही आहेत. हे मंदिर दिसायला नवीन असले तरीही या मंदिराच्या अजुबाजुला परिसरात भग्न अवशेषातील अनेक शिळा पडलेल्या आहेत. त्यावर असलेल्या मुर्त्या हया चालुक्य व यादवकाळाची साक्ष देतात. मोठमोठया शिळावर ज्या मुर्त्या कोरलेल्या आहेत त्या मुर्त्यांची ठेवन ही चालुक्यकालीन असल्याचे दिसते. म्हणजेच हे मंदिर उपलब्ध पुराव्यावरुन बाराव्या शतकातील असल्याचे दिसते. मंदिराकडे जात असतांना रस्त्याच्या दुतर्फा अनेक दगडी मुर्त्या सापडतात. या विखुरलेल्या दगडी मुर्ती जतन आणी संवर्धन केले तर येथील सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी करता येते. विखुरलेल्या शिल्पातून येथील ऐतिहासिक , सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. या सर्व मुर्त्यावरुन हे मंदीर पूरातन असल्याचे सिध्द होते.

पुरुषोत्तमपुरीच्या ताम्रपटात पुरुषोत्तमाच्या दिशा दर्शवितांना पूर्वेला दंडीगौ आणि सादुले , दक्षिनेस केशवपुरी , सावरीगवा आणी हरिकिनिंबगौ , पश्चिमेस राजगौ , हिवरे , चित्रवली आणि दुगलेगव्हाणसहीत महादेवपुरी आणि उत्तरेस गंगा असा जो उल्लेख केला आहे. त्यात पूर्वेकडील सिमेवर सादुले असा उल्लेख आलेला आहे. या वरुन हे मंदिर बाराव्या शतकातील असावे असे दिसते. या मंदिराच्या अजुबाजुला पाणी असल्यामुळे व येथेच लोणीसावंगीचा बंधारा असल्याने पाण्याची उपलब्धता मोठया प्रमाणात आहे. उपलब्ध पाण्याचा वापर करुन आजुबाजुला घाटनिर्मीती व बागबगीचे बनवता येऊ शकते. मराठवाडयाच्या व महाराष्टाच्या कानाकोप-यातून भाविक भक्त येथे येतात. या मंदिरापासून पूर्वेला काही अंतररावर मंजरथ असून मंजरथ ते गौतम ऋषी मंदिर या परीसराला ब्रम्हस्थल असे म्हटले आहे. प्रत्येक महिन्याच्या अमावस्येला यात्रा भरते. भजन, पूजन व कीर्तन होते. गोदावरी नदी ही गौतम ऋषीनी आणल्यामुळे येथील अब्जक तीर्थ हे गोदावरीचे हदयस्थान आहे.





## श्री गौतमतऋषी मंदिर तीर्थक्षेत्र

गौतमऋषी मंदिर, केसापुरी मंदिर, व मंजरथ येथील मंदिरे ही माजलगाव तालुक्यातील सांस्कृतिक जडनघडणीची साक्ष देतात. या सांस्कृतिक ठेव्याचे वेळीच जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. आशा पुरातन तीर्थक्षेत्राकडे शासनाचे वेळीच लक्ष्य देणे आवश्यक आहे. अन्यथा हा ठेवा कालौघात नाहीसा झाल्याशिवाय राहणार नाही.



**मंदिराची वैशिष्टये :-**

१) चालुक्यकालीन स्थापत्यकलेचा सुंदर नमुना आहे.

२) गणेश मुर्ती ही यादव कालीन आहे.

३) दर महिन्याच्या अमावस्येला येथे यात्रा भरते.

४) हे तीर्थक्षेत्र मर्हषी गौतमाची तपोभूमी आहे.

५) गोदावरील नदी काठचे हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

**उपाय योजना :-**

१) पुरातन चालुक्यकालीन सांस्कृतिक वारसा जतन करणे.

२) पवित्र तीर्थस्थळाचा विकास करणे गरजचे आहे.

३) दर्शनासाठी येणा-या भक्तांना सुविधा पुरविणे.

४) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून उपलब्ध पाण्याचा वापर करुन वृक्षारोपन, बागबगीचे व घाट निर्मिती करणे.

५) तीर्थस्थळाचा दर्जा मिळवून देणे.

**संदर्भ :-**


१) महाभारत शांतीपर्व - १२९

२) ब्रम्हपुराण

३) नारदपुराण , २ - ७३

४) रामायण उत्तरकांड ३० - ४०

५) मराठी विश्वकोष खंड - ५ , २७२

६) पौराणीककौष

७) गुरुचरीत्र , अध्याय १३ , ६२ ते ७७

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of various temples and historical places situated in Manjarath village of Majalgaon taluka.

## मार्जार तीर्थक्षेत्र, मंजरथ

बीड जिल्यातील माजलगाव तालुक्यात मार्जार तीर्थक्षेत्र मंजरथ येथे आहे. हे तीर्थक्षेत्र सुप्रसिध्द ऐतिहासिक, धामिक व सांस्कृतिक तिर्थक्षेत्र आहे. आज या गावाला दक्षिणेची काशी म्हणून ओळखले जाते. या गावाचे प्राचीन नाव मार्जार क्षेत्र हे होते. पुढे मंजरतीर्थ झाले व त्यापासून आजचे मंजरथ नाव उदयाला आले. मंजरथ हे गाव माजलगावच्या उत्तरेस १२ कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणी गावाच्या बाहेर गोदावरी नदीकाठी अनेक मंदिरे आहेत. मंजरथ हे गाव गोदावरी व सिंधुफेणा नदीच्या संगमावर निर्सम्य परिसरात वसलेला आहे.

या गावाला कल्याणीच्या चालुक्याच्या काळात मंजरथतीर्थ या नावाने ओळखले जात असे. ऐतिहासिक दृष्टया हे ठिकाण महत्वाचे आहे.१ कारण येथे झालेल्या लढाईत कल्याणीचा शेवटचा चालुक्य राजा सोमेश्वर तृतीयने इ.स.११८७ ला यादव राज्याचा संस्थापक पाचवा भिल्लम यांचा पराभव करुन चालुक्म सत्तेचे अल्पकालीन पूनर्जीवन केले. २ येथील सोमेश्वर मंदिर , त्रिविकमाचे मंदिर व वृक्षाकपिचे मंदिर त्यांच्याच काळात बांधल्याचे दिसून येते.

शक्तिसंगमतंत्र या ग्रंथात या स्थलाचे नाव मार्जार तीर्थ असे नमूद करण्यात आले असून महाराष्टातील प्रमुख तीर्थक्षेत्रात त्याचा समावेश करण्यात आला आहे. मंजरथक्षेत्र महात्म्य आणि येथील वृक्षाकपी मंदिरातील देवी अहिल्याबाईच्या शिलालेखावर याचे नाव बिडालाब्जकतिर्थ असे देण्यात आले आहे. ३ अद्यापही मार्जार हत्येचे प्रायश्चित घेण्यासाठी लोक दूरदूरुन येथे येतात. या क्षेत्राचे मूळ नाव चालुक्यकालीन शिलालेखातील उल्लेखाप्रमाणे मंजरतीर्थ हेच होय. मंजरथ हे बालाघाटच्या उत्तरेकडील रांगेचे नाव आहे. ४ तीर्थक्षेत्र त्या परिसरात असल्यामुळे या तीर्थक्षेत्राला मंजरतीर्थ असे नामकरण झाले. आणि त्याचे अपभ्रष्ट रुप होऊन आजचे मंजरथ हे नाव आले.

मंजरथ येथे अनेक मंदिरे , तीर्थे , घाट , मठ , गुहा इत्यादी ऐतिहासिक व पर्यटन स्थळे आहेत. यात प्रामुख्याने त्रिविकम , सोमेश्वर , वृक्षाकपी इत्यादी मंदिरे आहेत. तसेच हनुमंततीर्थ , इंदतीर्थ , अब्जकतीर्थ असे ३५ तीर्थ आहेत. निबाळकरांचा घाट , देवी अहिल्याबाई होळकरांचा घाट , बायजाबाई शिंदेचा घाट व हेमादी पंडीतांचा घाट असे चार घाट आहेत, तसेच रामाचा मठ आहे. वृक्षाकपी मंदिरातुन छत्रबोरगाव इथपर्यंत एक भूयारही आहे. अशी ऐतिहासिक , धामिक तीर्थक्षेत्र मंजरथ येथे आहेत५.

पुरुषोत्तमपुरी येथे सापडलेल्या रामचंद यादवाचा ताम्रपट व शिलालेखातही मंजरथ येथील घडामोठीचा उल्लेख मिळतो. तसेच वृषाकपी मंदिरात समोरच्या बाजुस शिलालेख आहे. तो असा “श्री गणेशायनमः शके त्रीषुर सैदुभिः परिमिते १६५३ पक्षेशिते कार्तीक व्दादश्यांत्रु विरोध हायुत महावर्षे बीडालब्जके || श्री निंबालकरोप नाम विभुना गोदा तटे दक्षीण प्रसाद सुलतानजी नृपवरे नाकारी वर्षाकप :|| ६

यावरुन निंबाळकरांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केल्याचे दिसते. या गावच्या अनेक रंजक कथा आहेत. एक म्हणजे प्रभु रामचंद वनवासात असतांना रावणाने सीतेचे अपहरण केले. तिचा शोध घेत प्रभु रामचंद मंजरथ येथे आले. त्यांना येथेच दिशानिर्देश मिळाले आणि चिंता दूर झाली. त्यांमुळे त्यांनी याठिकाणी रामेश्वर शिवलिंगाची स्थापना केली७. त्यावेळी

गोदावरी, सिंदफणा व सरस्वती त्रिवेणी संगम होता असे म्हटले जाते. दुसरी म्हणजे इंद - इंदायनी येथे येऊन मोठे तप केले आणि महाशनी नावाच्या दैत्याचा नाश करण्यासाठी हरिहरास प्रसन्न करुन घेतले. हरिहरानी त्या जलाशयातून दिव्य पुष्प निर्माण केले आणि त्या पुष्पांनी महाशनी दैत्याचा नाश केला८. दुसरी म्हणजे नमुची नावाचा दैत्याचा खून करण्यासाठी समुद्‌तून फेस आणून त्या फेसापासुन फास बनवून नमुची नावाच्या दैत्याच्या गळयाभोती फास घातला. त्यात त्याचा अंत झाला. सिंधु फेणा म्हणजे समुद फेस, म्हणजे समुदाचा आणलेला फेस. या पासूनच सिंदफणा हे नाव तयार झाले९. याच ठिकाणी सिंदफणा आणि गोदावरी या पवित्र नदयांचा संगम आहे. तिसरी म्हणजे ब्रम्हगिरीच्या शेजारी अंजन पर्वतावर केशरी नावाचा गंधर्व राहत होता. त्याला अंजना व अदिका नावाच्या दोन शीलवान पत्न्या होत्या. इंद्राच्या शापाने अंजनीचे तोंड वानरीसारखे झाले होते तर अदिकेचे तोंड मांजरीसारखे झाले होते . या दोघींनी अगस्तीची पूजा केली आणि प्रसन्न करुन घेतले. अगस्तीने अंजनीला व अदिकेला मागितलेला वर दिला. त्यानुसर अंजनीला वायू देवतेपासून पराकमी पुत्र म्हणजे हनुमान तर अदिकेला नैऋत्य देवतेपासून पिशाच्च आशी मुले झाली. देवांनी त्या दोघींना बलवान पुत्राच्या सहाय्याने गौतमीत स्नान केल्यास शापमुक्त व्हाल असे सांगितले१०. त्याप्रमाणे अंजना व अदिकेने गोदावरीत स्नान करुन स्वतःला शापमुक्त करुन घेतले. शापमुक्त झाल्यानंतर अदिकेने हे क्षेत्र माझ्या नावाने ओळखले जावे व ज्यांनी चुकून आपल्या हातून मांजरीचा वध केला असेल त्यांची येथे पापमुक्ती व्हावी असा वर देवांना मांगितला. देवांनी तथास्तु म्हटले. तेंव्हापासून त्रिविकमाच्या पायाजवळ त्रिविकमाच्या मंदिरात मार्जार देवता आहे.

चौथी म्हणजे - त्रिविकमस्य महात्म्य अधिकृत्य चतुर्मुखः |

त्रिवर्गमब्रवीम्हच्च वामन परि कीर्तितम ||४४||

पुराणं दश साहस्त्र कुर्म कल्पानुंग शिवम |

यः शरव्दिषुवे दधाद वैष्णवं यात्स सौ पद्‌म ||४५||११

यात त्रिवर्गाचे वर्णन ब्रम्हाने केले आहे. त्यात वामन आणि बळीची कथा आलेली आहे. बळी हा हिरण्यकश्यपुचा पणतु, प्रल्हादाचा नातु , विरोचनाचा पुत्र, कपिलाचा पुतण्या आणि बाणाचा पिता होय१२. प्राचीन भारतातील एक अत्यंत सदगुणी, प्रजाहितदक्ष व सामर्थ्यशाली राजा. त्यांनी नव्यानव अवश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख आलेला आहे. त्यांनी संपूर्ण पृथ्वी जिंकली होती. शंभरावा यज्ञ जर यशस्वी झाला तर तो इंदपदही प्राप्त करेल या भितीने देवराज इंद इतर देवगणासहीत विष्णुकडे गेला आणि विष्णुने इंदाला बळीला मारण्याचे आश्वासन दिले. विष्णुने इंदाला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कपटाने वामनवेश धारण करुन बळीच्या यज्ञस्थळी उपस्थित राहिला. राजा बळीने त्यांची विचारपुस करुन त्यांची इच्छा विचारली. त्यावेळेस वामनाने तीन पावले भूमी मागितली. दानशूर बळीराजाने तीन पावले भूमी दान दिली. त्यावेळी कपट रुपाने वामन वेश्यात आलेल्या विष्णुने महाभयंकर विराट रुप धारण केले पहिल्या पाऊलात पृथ्वी, दुस-या पाऊलात स्वर्ग व्यापले व बळीला म्हणाले तीसरे पाऊल कुठे ठेऊ, तेव्हा उदार बळीराजाने विष्णुला तीसरे पाऊल आपल्या डोक्यावर ठेवण्याचा आदेश


दिला. आशाप्रकारे बळीला विष्णुने पाताळात घातले . बळी  हा शेतक-यांचा राजा असल्यामुळे आजही दिपावलीच्या वेळेस ईडापिडा टळो बळीचे राज्य येवो अशी  कवणे गायली जातात. यावरुन बळीची महती लक्षात येते.

मंजरथ येथे आज अनेक मंदिरे आहेत. ती मंदिरे चालुक्य कालखंडामध्ये निर्माण केलेली आहेत. यापैकी सुस्थितीत  असलेल्या मंदिरापैकी वर्षाकपि व त्रिविकमाचे मंदिर होय. तर सोमेश्वर मंदिराचे अवशेष विखुरलेले आहेत. वर्षाकपी मंदिराचे मुख्य व्दार पूर्वेकडे असून उत्तरेकडे व दक्षिणेकडे  दोन उपव्दार आहेत. गोदावरी नदीच्या दक्षिण काठावर व सिंदफणाच्या पश्चिम काठावर हे मंदिर आहे. या मंदीराचा जिर्णोध्दार तिनवेळेस म्हणजेच मंदिरातील शिलालेखावरुन निंबाळकर, हेमाद्रीपंत व होळकर यांच्या काळात झाल्याचे दिसते. परंतु मूळ बांधकाम मात्र चालुक्य राजा सोमेश्वर यांच्याच काळात बाराव्या शतकात झालेले आहेत. मंदिराच्या गाभा-यात महादेवाचे शिवलिंग असून उजव्या बाजुला महादेव पार्वतीची मुर्ती आहे तर डाव्या बाजुला चतुर्भुज विष्णुची मुर्ती आहे. याच ठिकाणी इंद्‌ - इंदाणीला हरीहर प्रसन्न झाले होते. गर्भगृहाच्या बाहेरच्या व्दारावर शिलालेख कोरलेला असून यात मंदिराच्या जिर्णोध्दाराची माहिती देण्यात आलेली आहे. गर्भगृहासमोर सभामंडप असून संभामंडपात स्तंभ आहेत. या स्तंभावर नागफणे कोरलेले आहेत. सभामंडपाला लागून उत्तरेकडे घाट व गोदावरी  नदी आहे. गोदावरीचे हदयस्थान येथेच आहे. गोदावरीचे विशाल पात्र, बाजुला घाट व मंदिरे पाहून माणसाचे मन प्रसन्न होते .

दुसरे मंदिर म्हणजे त्रिविकमाचे मंदिर होय. वर्षाकपिच्या मंदिरापासून दक्षिणेला २०० फुट अंतरावर त्रिविकमाचे मंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम चालुक्य काळात झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या मंदिराचे मुख्य प्रवेशव्दार पूर्वेकडे  तोंड करुन आहे. या मंदिराचे बांधकाम मोठमोठया शिळांणी पूर्णपणे दगडात केलेले असून ते एकमेकात घटट्‌ बसवलेले आहेत. वरच्या दगडाचा भार खालच्या दगडावर पडणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. मंदिराचे बांधकाम त्रिस्तरीय रचनेत केलेले आहे. कळसाचे बांधकाम पक्क्या भाजलेल्या व पाण्यावर तरंगणा-या आशा हलक्या विटांणी केलेले आहे. मंदिर अखिव , रेखिव व सुंदर आहे. मंदिराचे बांधकाम गर्भगृह , अंतराळ व सभामंडप या स्थापत्यशैलीत केलेले आहे. मंडपातील स्तंभशिर्षावर सर्वतोभद चतुर्भूज भारवाहक , किर्तीमुख व नागफणे आहेत. मंडपातील स्तंभावर कोरीव नक्षीकाम आहे. या मंदिराची पूर्व पश्चिम लांबी ८० फूट तर उत्तर दक्षिण रुंदी ५० फूट आहे. मंदिराच्या मुख्य गर्भगृहात चतुर्भूज त्रिविकमाची मुर्ती लक्ष्मीसह आहे. त्रिविकमाच्या मुर्तीसमोर मांजरीची सुंदर व सुबक मुर्ती आहे. एकंदरीत मंदिरातील गर्भगृह हे सुशोभीत आहे. मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशव्दारावर गणेशमुर्ती आहे. दोन्ही बाजुला व्दारपाल आहे. प्रवेशव्दाराच्या उंबरठयाला मधोमध भारवाहक आहे. तर दोन्ही बाजुला शिव व विष्णु पत्नीसह व्दारपाल आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजुला शिवपार्वती तर डाव्या बाजुला नरसिंहाची मुर्ती हिरण्यकश्यपुला मारतानाची कोरलेली आहे. सभामंडपात मुख्यमुर्तीच्या समोर सभामंडपाच्या मधोमध जमिनीवर कासव आहे. सभामंडपात एकुण २० स्तंभ आहेत. स्तंभावर नागफने , विरुपाक्ष , गरुड , चतुर्भूज भारवाहक , गजराज , किर्तीमुख , फुलासारखे नक्षीकाम प्रत्येक स्तंभावर कोरलेले आहे. या सर्व मुर्तीशास्त्रावरुन ही शिल्पकला चालुक्यकालीन असल्याचे सिध्द होते. मंदिराच्या समोर गरुडाची मुर्ती आहे. गरुड हे विष्णुचे वाहन आहे. यावरुन

त्रिविकमाचे मंदिर हे  मूळ विष्णु मंदिर होय. धर्मापुरीच्या शिल्पशास्त्राचा प्रभाव या मंदिरावरील मुर्तीकलेवर पडल्याचा दिसून येतो१५.

मंजरथ येथील त्रिविकमाचे व वर्षाकपिचे मंदिर आजही इतिहासाच्या संशोधनाची वाट पाहत आहेत. ते उत्तम स्थितीत असून वेळीच या मंदिराकडे पुराणवस्तु संग्राहालय व शासनाचे लक्ष्य जाणे गरजेचे आहे. तितकेच लोकांनीही आपला ऐतिहासिक वारसा जतन करण्याची गरज आहे. अन्यथा आपण आपल्या संस्कृतिचा अमूल्य ठेवा जतन करु शकणार नाही. हे मंदिर अभ्यासकापासून , संशोधकापासून व पुरातत्वखात्यापासून दुर्लक्षित आहे. धर्मापुरीच्या मंदिरापेक्षाही उत्तम स्थितीत हे मंदिरे असल्यामुळे  यांचे जतन करण्यात जास्त कष्ट पडणार नाहीत. या ठिकाणी महाराष्टाच्या ठिकठिकाणाहून ज्यांना काशीला जाणे शक्य नाही ते या ठिकाणी येतात आणि केलेल्या पापातून त्रिविकमाचे व मार्जारीचे दर्शन घेऊन पापमुक्त होतात. या मंदिराकडे पाप व पुण्य यापैक्षा मानवी समाजात नैतीकतेची पातळी उंचविण्याचे एक उत्कृष्ठ साधन म्हणुनही पाहता येते. या ठिकाणी विपूल प्रमाणात उपलब्ध असलेले पाणी, गोदावरीचे विशालकाय पात्र , आजुबाजुला उपलब्ध असलेला परिसर यामुळे  या ठिकाणी नदीतील नौकानयनाला वाव आहे. तसेच उपलब्ध पाण्याचा बागबगीच्यासाठी व वृक्षरोपनासाठी  वापर करुन हा परिसर एक उत्तम पर्यटनक्षेत्र बनवता येऊ शकते. काशीनंतरचे दक्षिण भारतातील हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. यास तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन विकास केल्यास स्थानिक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील व संस्कृती वारशाचे जतनही होईल.



**मंदिराची वैशिष्टये :-**

१) चालुक्यकालीन स्थापत्यकलेचा सुंदर नमुना आहे.

२) मंजरथ या तीर्थक्षेत्राला दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते.

३) गोदावरी व सिंदफणा नदीच्या संगमावर ही मंदिरे आहेत.

४) नदीकाठावरील घाट, मंदिरे व परिसर निसर्गरम्य आहे.

५) या मंदिरातील बांधकामाला वापरलेल्या विटा पाण्यावर तरंगतात.

६) अंतिम संस्कारानंतरच्या विधीसह इतर धार्मिक विधी करण्यासाठी दूरदूरुण लोक येथे येतात.

७) मंदिराचे बांधकाम खालच्या दगडावर वरच्या दगडाचा भार पडू नये या पध्दतीने केलेले आहे.

**उपाय योजना :-**

१) दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखल्या जाणा-या मंजरथ येथील परिसराचा विकास करणे गरजेचे आहे.

२) सोमेश्वर मंदिराची पुणबांधणी करणे व इतर मंदिराची डागडुजी करणे आवश्यक आहे.

३) दर्शनासाठी व धार्मिक विधीसाठी येणा-या भक्तांना सुविधा पुरविणे.

४) मुबलक पाणीसाठा असल्याने वृक्षारोपन व बागबगीचे करणे शक्य आहे.

५) तीर्थस्थळाचा दर्जा मिळवून देणे.

**संदर्भ :-**


१) महाभारत शांतीपर्व - १२९

२) ब्रम्हपुराण

३) नारदपुराण , २ - ७३

४) रामायण उत्तरकांड ३० - ४०

५) मराठी विश्वकोष खंड - ५ , २७२

६) पौराणीककौष

७) गुरुचरीत्र , अध्याय १३ , ६२ ते ७७

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Narsinha God temple situated in Mogra village of Majalgaon taluka.

## तीर्थक्षेत्र नृसिंह मंदिर, मोगरा

माजलगाव शहरापासून २० कि. मी. अंतरावर मोगरा या गावामध्ये नृसिंहाचे प्राचीन मंदिर गोदावरी तीरावर आहे. नृसिंह जयंतीच्या दिवशी मराठवाडयाच्या विविध भागातून भक्त दर्शनासाठी येथे येतात.

मच्छअवतार , कुर्मअवतार, वराहअवतार आणि नृसिंह अवतार भारतीय संस्कृतीत झालेला प्रवेश हा बॅबोलीयन, असेरियन आणि इजिप्तसीयन या संस्कृतिच्या प्रभावामुळे व सांस्कृतिक देवाणघेवाणीमुळे झाले आहे. इजिप्त संस्कृतीत देवांचे स्वरुप पशू मानव पशू या स्वरुपात होते. या प्रभावातून नृसिंह या देवतेचा भारतीय संस्कृतीत जन्म झाला आहे. तर दुस-या बाजुला प्राचीन काळी आदिवाशी समाजात त्यांचे एक कुलचिन्ह असे व तो समाज त्या कुलचिन्हाच्या नावाने ओळखला जाई. नृसिंह हा आर्यत्तरांचा देव आहे. असे जे प्रतिपादन केले जाते, त्यांची पाश्वभुमी वरीलप्रमाणे असण्याची शक्यता आहे. विष्णुच्या नृसिंह अवताराची कथा भागवत पुराणात सांगीतली जाते.

मुर्ती शास्त्राच्या अभ्यासानुसार नृसिंह मुर्तीचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. १ गिज नृसिंह किंवा केवल नृसिंह २ स्थौन नृसिंह ३ यानक नृसिंह ४ लक्ष्मी नृसिंह.गिज नृसिंह मुर्ती प्रकारात नृसिंह मुर्ती पदमपिठावर उत्कूटीक आसनात एकटा बसलेला असतो, ती चर्तुभुज मुर्ती असते. स्थोन नृसिंह मुर्ती १२ किंवा १६ भुजाची असते. त्रिभंग स्थानात मुर्ती असते. हिरण्यकश्यपुच्या वधाच्या आवस्थेत दाखवलेली असते. यानक नृसिंह मुर्ती ही गरुडाच्या खांदयावर किंवा आदिशेषावर बसलेला असतो. त्याच्या मस्तकावर पाच फनी शेषाचे छत्र असते.

लक्ष्मी नृसिंह रुपातील मुर्ती पदमपिठावर बसलेलेली असते. तो अर्धपर्यक आसन व सुखासनात बसलेला असून डाव्या पायाच्या मांडीवर लक्ष्मी बसलेली असते. ही मुर्ती ललीत आसनात असते. नृसिंहाच्या मुर्ती हया गुप्त काळात आढळतात. पहिली मुर्ती गुप्ताच्या नाण्यावर असून गुप्तकालीन देवगडच्या मंदिरावर आहे. आणि हळुहळु नृसिंह मुर्ती उत्तर भारतातून दक्षिण भारतात आलेली आहे. दक्षिण भारतात मोठया प्रमाणावर नृसिंह मुर्ती आढळतात. त्यापैकीच मोगरा येथील नृसिंह मुर्ती व मंदिर आहे. नृसिंह ललीत आसनात बसलेला असून शरीरावर व्याघ्रचर्म परिधान केलेले आहे. त्यांच्या हातात कोणतेही शस्त्र किंवा आयुध नाही.

हिंदु धर्माच्या गंगा महात्म्य या ग्रंथात नृसिंह मंदिराचे विशेष महत्व सांगीतले आहे. मंदिराची निर्मिती यादव काळात झाल्याचे दिसून येते. हेमाडपंथीय स्थापत्य शैलीत मंदिराचे बांधकाम करण्यात आलेले आहे. मंदिराचे पुर्वेकडील दिशेला मुख्यव्दार असून गोदावरी नदीच्या तीरावर असल्याने परिसर रमणीय वाटतो. मंदीराचे तीन दिशेला तीन दरवाजे आहेत. त्याची रचना अतिव सुंदर आणि शिल्प रुपात आहेत. या मंदिराला २७ पाय-या असून २७ नक्षत्राला स्मरुन त्या बांधल्याचे सांगितले जाते. मंदिराच्या बाहेर नाग देवतेची मुर्ती आहे. एका रात्रीमध्ये मंदिर बांधल्याची अख्यायिका आहे. गावक-यांच्या सांगण्यानुसार मंदिरातील मुळ मुर्ती गाभा-यात नसल्याचे इ. स. १९५२ साली गाभा-यात नृसिंहाची मुर्ती स्थापित केली. मंदिराचा पूर्ण परिसर ७ एक्कर असुन मंदिराच्या पाठामागे एक ओठा आहे.

नृसिंहाचे हे मंदीर गोदावरी नदीच्या किनारी आहे. गोदावरी नदी पूर्ण भारत वर्षामध्ये पूर्व - पश्चिम वाहते. परंतु येथे गोदावरी नदीचा दक्षिण - उत्तर वाहते श्रावण महिन्यात महादेवाचा अभिषेक करण्यासाठी १०० गावचे लोक या नदीपात्रातुन खांदयावर पाणी घेऊन जातात. एका अख्यायिकेनुसार या ठिकाणी भगवान श्रीकृष्णाने दानवांचा संहार केल्यानंतर सुदर्शन चक्र





**नृसिंहाचे मंदीर**

गोदावरीच्या पाण्यात धुतले व सुदर्शन चक्र येथे स्थापीत केले. या घटनेमुळे या ठिकाणाला चक्रतिर्थ या नावाने ओळखले जाते. अहिल्याबाई होळकर यांनी नदीच्या किनारी घाट बांधला आहे. या घाटाला तिन्ही बाजुनी मैदान आहे. त्यामुळे ते ब्रम्हा - विष्णु - महेश च्या रुपात पाहिले जाते. घाटावर कवी रंगनाथ स्वामी यांची समाधी आहे. विवाहानंतर नव वधुवर दर्शनासाठी दुर दुरच्या भागातुन येथे येतात. नृसिंह जयंतीच्या दिवशी मोठया भक्तीभावाने भक्त येथे मोठया संख्येने येथे येतात. नृसिंहाचे जागृत अरुणाच्या या देवस्थानाला पाहिजे तसा विकास झाला नसल्याचे येथे येणा-या भाविकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आहे.

**वैशिष्टै :-**

१) नृसिंहाचे प्राचिन मंदिर हेमांडपंथी आहे.

२) गोदावरीच तीरावर ७ एक्कर जमिनीचा परीसरात मंदिर स्थित आहे.

३) मंदिरा समोरील गोदावरीचा प्रवाह उत्तर - दक्षिण आहे.

४) वैशाखी पौर्णिमेला जन्मोत्सव साजरा केला जातो.

५) गोदावरीच्या तीरावरील अहिल्याबाई होळकर यांची बांधलेला घाट आजही सुस्थितीत आहे.

**उपाय व योजना :-**

१) प्राचिन ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करणे.

२) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून मंदिर परिसराचा विकास करुन रोजगाराला चालना देणे.

३) दर्शनासाठी जेणा-या भाविकांना सुविधा पुरविणे.

४) तीर्थस्थळाला दर्जा मिळवुन देणे.

**संदर्भ :-**


१) ऋग्वेद संहिता.

२) नृसिंह पुराण.

३) म्हैसेकर प्रदीप, भारतीय मुर्तीशास्त्र, विद्या प्रकाशन औरंगाबाद.

४) Sastri, H. K., South Indian Images of God & Goddesses

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Lord Shri Ganesha temple situated in Gangamasla village of Majalgaon taluka.

## तीर्थक्षेत्र मोरेश्वर मंदिर, गंगामसला

बीड जिल्हयातील माजलगाव तालुक्यात मौजे गंगामसला येथे श्रीक्षेत्र मोरेश्वराचे मंदिर आहे. गंगामसला हे गाव माजलगाव - परभणी या २२२ राष्ट्रीय महामर्गावर असून माजलगाव पासून पूर्वेला २३ कि. मी. अंतरावर आहे. गणेश कोशातील २१ गणपतीचे जे महत्व वर्णन केले आहे. त्यापैकी एक गणपती म्हणजे माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथील मोरेश्वर होय. मोरेश्वराचा उल्लेख गणेश कोशामध्ये भालचंद्र असाही आला आहे. मोरेश्वराचे मंदिर गोदावरीच्या पवित्र पात्रात अगदी मध्यावर उभे आहे. हे तीर्थक्षंत्र माजलगावचे भुषण आहे. या तीर्थक्षेत्राला धार्मिक स्थळाचा **क** दर्जा प्राप्त आहे.

गणेश कोशामध्ये या देवास्थानाचा गंगामाल , गंगामसले भालचंद्र असा उल्लेख आढळतो. गणेशाच्या शापामुळे पृथ्वीवरील चंद्रप्रकाश बंद झाला होता. त्यावर उःशाप मिळाल्यानंतर ब्रम्हा, विष्णू, महादेव, देवी व सुर्य यांनी गंगामसला या गावी तपश्चर्या केली. त्यावर गणेश प्रसन्न झाला व पृथ्वीवर पूर्ववत चंद्रप्रकाश सुरु झाला ही या मंदिराची गणेश कोशातील अख्यायीका आहे.

मोरेश्वर मंदिराचे बांधकाम माधवराव पेशवे यांच्या काळात झाले कारण माधवराव पेशवे यांच्या काळात निजाम पेशव्यात अनेक लढाया झाल्या. निजामावर स्वारी करण्यासाठी पेशवे जात असतांना वाटेत गोदावरी पात्रात त्यांच्या दलातील हत्ती नदी पात्रात अडकला. प्रयत्न करुनही हत्ती बाहेर निघेना त्यावेळेस पेशव्यांनी श्री गणेशाची प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर हत्ती सहीसलामत बाहेर आला निजामावर चढाई करुन पेशव्यांना विजय मिळाला. विजय मिळवून परत येत असतांना हत्ती अडकलेल्या ठिकांणी माधवराव पेशव्यांनी गणपतीचे मंदिर १८ व्या शतकात बांधले आहे. नवसाला पावणारा गणपती म्हणून मोरेश्वराची अख्यायीका सर्वदुर प्रसिध्द आहे. चतुर्थीच्या दिवशी भाविकांची संख्या हजारावर तर अंगारीक चतुर्थीला लाखोच्या संख्येने भाविक मराठवाडा व महाराष्ट्रातून येतात. या मंदिराचे बांधकाम पेशवे काळात माधवराव पेशवे यांनी १८७० च्या दरम्यान केले आहे. मोरेश्वर मंदिराचे प्रवेशव्दार पूर्वेकडे असून गोदावरी पात्रात उभे आहे. या मंदिरात असलेली मुर्ती पेशवेकालीन असून या मुर्तीवर कळसाच्या मध्यभागातून वर्षातून एकदा अंगारिक चतुर्थीच्या दिवशी पाण्याचे थेंब पडतात असे ग्रामस्थ म्हणतात.

मंदिराच्या देखरेखीसाठी पेशवेकाळात मंदिरात अग्रहार म्हणून २६ एक्कर ११ गुंठे जमिन देण्यात आली आहे. आढोळा शिवारातील १२ एक्कर जमीन आजही मंदिरासाठी अग्रहार म्हणून आहे. या ठिकाणी ५०X६० आकाराचा भक्त निवास असून मोठा हॉल आहे, तर १०X१० च्या तीन खोल्या आहेत. या मंदिराची १९९६ साली ट्रस्ट तयार करण्यात आलेली आहे. माघ शुध्द चतुर्थीला येथे मोठया प्रमाणात यात्रा भरते. ही झाली मोरेश्वर संदर्भातील माहिती.

गंगामसला या गावाची अजूनही एक ऐतिहासिक परंपरा आहे. संत तुकाराम महाराजानंतर देहु ते पंढरपुर ही पायी दिंडी सोहळा त्यांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या पादुका तयार करुन पंढरपुरची वारी कायम चालु ठेवली. ही परंपरा आजतागायत कायम चालु आहे. मोगलकाळात व निझामकाळात वारीवर अनेक निर्बध आकारले गेले, तेव्हा पादुका न्यायच्या कशा असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा गंगामसला येथील लोकांनी पुढाकार घेऊन आसमानी व सुलतानी संकटाचा सामना करुन ही परंपरा कायम चालू ठेवली. गंगामसला येथुन पैसे व धान्य गेल्यानंतरच ही वारी सुरुवात होत असे. पालखी नंतरच्या काळात सुरवात करण्यात आली आहे. पालखीची सर्व जबाबदारी गंगामसला या गावावर होती. मागील पाचशे वर्षापासून संत जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पादुका उचलण्याचा मान या गावाला आहे. आजही संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाचा आर्थिक व्यवहार हा याच गावातून पाहिला जातो. ही या गावची परंपरा आहे. संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोळयाचा असलेला या गावचा मान व पेशवे माधवराव यांनी मोरेश्वर मंदिराची केलेली बांधणी यावरुन या गावचा इतिहास प्राचीन असल्याचे दिसून येते. असे असले तरीही या तीर्थस्थळाला तीर्थक्षेत्राचा **क** दर्जा देण्यात आलेला असून विकासापासून हे तीर्थक्षेत्र वंचित आहे.





**वैशिष्टये :-**

१) पेशवेकालीन १८ व्या शतकातील स्थापत्याचा नमुना आहे.

२) मोरेश्वर हे गणपती मंदिर भालचंद्र या नावानेही प्रसिध्द आहे.

३) माघ शुध्द चतुर्थीला येथे उत्सव भरतो.

४) गोदावरी नदीच्या मधोमध हे मंदिर आहे.

५) महाराष्ट्र व मराठवाडयाच्या विविध भागातून येथे भाविक येतात.

**उपाय योजना :-**

१) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसाचे जतन व संवर्धन करणे.

२) मंदिर परिसरात सोयी-सुविधा पुरविणे.

३) मंदिर परिसराचा उपलब्ध पाण्याचा वापर करुन विकास करणे.

४) पर्यटनाच्या दृष्टीकोनातुन विकास करणे.

५) तीर्थक्षेत्राला पुढील दर्जा मिळवुन देणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१) मुलाखत

२) मौखिक साधने

३) प्रत्यक्ष भेट

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of various temples situated in Shukleshwar Limbgaon village of Majalgaon taluka.

## शुक्लेश्वर मंदिर तीर्थक्षेत्र, शुक्लेश्वर लिंबगाव

बीड जिल्हयातील माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीच्या तीरावर असलेले शुक्लेश्वर लिंबगाव हे ऐतिहासिक परंपरा असलेले गाव आहे. हे माजलगाव पासून आग्नेय दिशेला १९ कि.मि. अंतरावर आहे. या गावात श्री शुक्लेश्वर मंदिर, श्री विष्णु मंदिर, ऋषी भारव्दाज मंदिर व रामेश्वर मंदिरे आहेत. या गावाला ऐतिहासिक व सांस्कृतिक समृध्द वारसा लाभलेला आहे. येथील शुक्लेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्राचा **ब** दर्जा आहे परंतु विकासापासून वंचित आहे.

या तीर्थक्षेत्राला तीर्थक्षेत्राचा **क** दर्जा असतांना २५ लक्ष रुपये अनुदान आलेले होते. त्यातुन १ सभामंडप व २ खोल्या बांधलेल्या आहेत. एकूण मंदिराचे क्षेत्रफळ ४ एक्कर ४ गुंठे आहे. या ठिकाणी गुरुकुल असुन १० विद्यार्थ्यांना वारकरी संांप्रदायाचे शिक्षण ह.भ.प.तुकाराम महाराज शास्त्री हे देतात. या तीर्थक्षेत्राचे १९८४ मध्ये ट्रस्ट स्थापन झालेली आहे.

शुक्लेश्वर मंदिराचे बांधकाम हे हेमाडपंथी शेलीत झालेले असून या मंदिराचा पदविण्यास गर्भगृह, अंतराल आणि सभामंडप असा आहे. या मंदिराचे मुख्य व गर्भगृहाचे प्रवेशव्दार पूर्वेकडे आहे. या मंदिराचे मुळ बांधकाम १२ व्या शतकात झालेले असून या मंदिराचा जिर्णोध्दार पेशवेकाळात झाल्याचे दिसून येते. कळसाच्या खालील भाग हा मोठ मोठया शिळांनी बांधकाम केलेला असून कळसाचा भाग हा विटानी बांधलेला आहे. येथील दगडाची रचना ही एकमेकात गुंतलेली असून वरच्या दगडाचा भार खालच्या दगडावर पडणार नाही अशी रचना केलेली आहे. या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे या मंदिराच्या बांधकामात वापरण्यात आलेल्या विटा हया पाण्यावर तरंगतात म्हणजेच पुरुषोत्तमपुरी, मंजरथप्रमाणे शुक्लेश्वर शुक्लतिर्थ लिंबगाव येथे ही बांधकामात वापरलेल्या विटा हया पाण्यावर तरंगतात याचा अर्थ हे तिन्ही मंदिरे १२ व्या शतकात बांधकाम झालेले असावे. या मंदिराच्या गर्भगृहात महादेवाची पिंड आहे. गर्भगृहाचा आकार १०x१० असून उंची ४० फुट आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशव्दारावर गणपती कोरलेला असून प्रवेशव्दाराच्या उंबरवठयावर नृसिंह कोरलेला आहे. व्दारपाळ म्हणून मंदिराच्या दोन्ही बाजुला शिव आणि विष्णुची मुर्ती कोरलेली आहे. मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशव्दारावर शिल्पांकन कोरलेले आहे त्यात शिव, विष्णु, लक्ष्मी व पार्वती हया मुर्त्या कोरलेल्या दिसतात. गर्भगृहाच्या पुढे अंतरालाच्या मधोमध कासव कोरलेला आहे तर अंतरालातील स्तंभावर विविध देवदेवतेच्या मुर्त्या , नागफणे , पुष्प व वेली कोरलेले दिसते.

शुक्लेश्वर हे नाव या गावाला का पडले तर गौतमी महात्म्यातील १३३ व्या अद्यायात, ब्रम्हपुणातील १७ अध्याय व पद्यमपुराणात यांची माहिती आलेली आहे. या माहिती प्रमाणे फार पुर्वी यज्ञग्न (यज्ञाचा नाश करणारा) नावाचा काळकभिन्न राक्षस भारव्दाज ऋषीच्या यज्ञात प्रगट  झाला आणि म्हणाला, मी एक शापीत काळा राक्षस आहे जर मला अमृताचा अभिषेक केला तर मी शापमुक्त होईल आणि शुभ्रवर्णाचा म्हणजेच शुध्द होईल अन्यथा मी यज्ञ खाऊन टाकीन अशी धमकी दिली. तेव्हा भारव्दाज ऋर्षीनी त्यास गोदावरी तिर्थात स्नान करण्यास सांगीतले आणि तो स्नान केल्यानंतर त्यांचे काळे रुप जाऊन शुभ्ररुप झाले म्हणजे तो शुध्द झाला तो शापमुक्त झाला. त्यामुळे या स्थानाला शुक्ल म्हणजे पांढरे किंवा शुध्द करणारे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. हे क्षेत्र संकल्पसिध्दी पूर्ण करणारे आहे म्हणून या तीर्थक्षेत्राला शुक्लतिर्थ असे म्हटले जाते.

शुक्लेश्वर तीर्थक्षेत्राला मोठयाप्रमाणात भाविक येतात. दर सोमवारी व विशेषत:सोमवती अमावस्याला येथे यात्रा भरते व या यात्रेला महाराष्ट्रातून भक्तगण येतात. या मंदिराच्या परीसरात उत्कृष्टपध्दतीने लावलेली झाडी व मनमोहक परिसर हे या मंदिराचे वैशिष्टे आहे.

शुक्लेश्वर मंदिराच्या थोडया अंतरावर पूर्वेला ऋषी भारव्दाज यांचे मंदिर आहे. ऋषी भारव्दाज यांचे तपश्चर्या स्थान व यज्ञस्थान आहे. याच ठिकाणी यज्ञाच्यावेळी काळकभिन्न राक्षस प्रकट झालेला होता. या मंदिराचे बांधकाम प्राचीन असून अस्तित्वात असलेले बांधकाम हे नंतर पेशवे काळात केलेले दिसते. या मंदिराच्या अजुबाजुला प्राचीन दगडी शिळा विखुरलेल्या अढळतात. आजही जमिनीत मंदिराचे प्राचीन अवशेष असल्याचे दिसून येते. मंदिराच्या गर्भगृहात महादेवाची पिंड असुन गर्भगृह सुस्थितीत आहे तर गर्भगृहाच्या पुढील भाग नामशेष झालेला दिसून येतो.

शुक्लेश्वर मंदिराच्या पूर्वेला गावात श्रीविष्णुचे प्राचीन मंदिर आहे. व या मंदिराला लागूनच कृपेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरातील विष्णुची मुळ मुर्ती चोरीला गेली असून ती गोदावरी नदीकाठी असलेल्या गुंज या ठिकाणी असल्याचे गावकरी सांगतात. विष्णु मंदिराचे बांधकाम १२ व्या शतकात झाल्याचे दिसून येते कारण या मंदिराचा पदविन्यास शुक्लेश्वर मंदिरासारखाच आहे. विष्णु मंदिर हे शुक्लेश्वर मंदिरापेक्षा भव्य आहे. या मंदिराची पूर्व - पश्चिम लांबी ८० फूट तर दक्षीण -

उत्तर रुंदी ६० फूट आहे. मंदिराची रचना गर्भगृह अंतराल व सभामंडप अशी आहे. या मंदिराच्या प्रवेशव्दारावर नृसिंहाचे शिल्प कोरलेले आहे. तसेच प्रवेशव्दाराच्या बाजुला असलेल्या स्तंभावर नागफणे, फूले इत्यादी नक्षीकाम कोरलेली आहे. अंतरालातील स्तंभावर किर्तीमुख, नागफणे नक्षीकाम कोरलेली आहे. गर्भगृहात चतुर्भुज महाविष्णुची मुर्ती असून ती सुव्यवस्थीत आहे. या मुर्तीच्या स्नानाचे पाणी उत्तरेला कल्लोळ मध्ये काढलेले आहे.

गावाच्या पुर्वेला २०० फूट अंतरावर गोदावरी नदी किनारी प्राचीन रामेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर प्राचीन असून सांस्कृतिकदृष्टया व कलात्मकदृष्टया माजलगावच नव्हे तर बीड जिल्हयाचा एक ऐतिहासिक वारसा सांगणारे हे स्थापत्य आहे. या मंदिराची शिल्पकला, स्थापत्यकला आणि मुर्तीकला ही वैशिष्टयेपुर्ण आहे. या मंदिराच्या स्तंभावर जे शिल्प कोरलेले आहे त्यात एक म्हणजे भावाने बहिणीला लाथ मारली आणि भावाच्या पायात आळया पडल्या. दुसरी वाली सुग्रीव कथा त्यानंतर हिरण्यकश्यपुला मारतानाचे नृसिंह शिल्प, गणपतीचे शिल्प, द्रोणागीरी शिल्प, रामलक्ष्मण हनुमान संवाद, अष्टभुज देवीचे शिल्प इत्यादी मुर्त्या या मंदिराच्या स्तंभावर कोरलेल्या आहेत. बीड जिल्हयातील धर्मापुरी, चिंचवण , मंजरथ इत्यादी मंदिरावरील शिल्पापेक्षा या मंदिरावरील शिल्प हे आकाराणे छोटे व उठावदार आहे. या मंदिरावरील असलेले शिल्प माजलगावच नव्हे तर या परीसराचा वारसा व संस्कृती सांगणारे शिल्प आहेत.

शुक्लेश्वर लिंबगाव येथील मंदिरे ही प्राचीन व मध्ययुगीन संस्कृतिचा सांस्कृतिक वारसा जपणारे मंदिरे आहेत. हे मंदिरे विकासाच्या व संशोधनाच्या प्रतिक्षेत आहेत. इतिहासकाराच्या व संशोधकाच्या प्रतिक्षेत वाट पहात असलेले हे तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे या तीर्थक्षेत्राचा विकास व संशोधन करुन त्याचे महत्व व सांस्कृतिक वारसा माहितीपटलावर आणणे आवश्यक आहे.



**श्री शुक्लेश्वर मंदिर शुक्लतीर्थ लिंबगाव**



**श्री महाविष्णु मंदिर शुक्लतीर्थ लिंबगाव**



**प्राचीन श्री रामेश्वर मंदिर शुक्लतीर्थ लिंबगाव**



**श्री भारव्दाज ऋषी मंदिर शुक्लतीर्थ लिंबगाव**

**वैशिष्टये :-**

१) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करणे.

२) हे मंदिरे चालुक्य व यादवकालीन संयुक्त हेमाडपंथी शैलीत निर्माणझालेली आहेत.

३) या तीर्थक्षेत्राला तीर्थस्थळाचा **ब** दर्जा आहे.

४) मंदिरावरील शिल्प बोलके व उठावदार आहेत.

५) दर सोमवती अमावस्येला यात्रा भरते.

**उपाय योजना :-**

१) प्राचीन अवशेषांचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.

२) या तीर्थक्षेत्रासाठी भरीव निधीची गरज आहे.

३) यात्रेसाठी येणा-या भाविकांना सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

४) मंदिर परिसरात मुबलक पाणीसाठा असल्याने पर्यटनात्मक विकासास चालना देणे गरजेचे आहे.

५) मंदिराचे संशोधन व डागडुजी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**


१) ब्रम्हपुराण १७.

२) पद्मपुराण ६.

३) गौतमी महात्म्ये १३३.

४) म्हैसेकर प्रदीप, भारतीय मुर्ती शास्त्र.

५) साळुंखे सतिष, बीड जिल्हयाचा इतिहास.

६) जोशी लक्ष्मणशास्त्री, संपादक, मराठी विश्वकोश.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Majalgaon taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Lord Ganesha temple situated in Pathrud village of Majalgaon taluka.

## गणपती तीर्थक्षेत्र, पात्रुड


बीड जिल्हयातील माजलगाव तालुक्यात माजलगाव पासून दक्षिणेस ९ कि. मी. अंतरावर पात्रुड हे गाव आहे. या गावात प्राचीन गणपती मंदिर आहे. गणपती मंदिर हे गावाच्या मधोमध उंच्च वट्यावर आहे. गावक-यांच्या सांगण्यानुसार या मंदिराच्या खाली जुने मंदिर असून त्यावर उभारलेले हे गणपती मंदिर आहे. परंतू गणपती मंदिराच्याखाली कदाचित महादेवाचे मंदिर असावे असे मंदिर परिसरातील उपलब्ध अवशेषावरुन दिसते.

गणेशपुराणात या क्षेत्राविषयी माहिती आलेली आहे. या क्षेत्राला प्राचीन नाव प्रल्हादाश्रम असे होते. मुदगल ऋषी हे गणपतीचे भक्त होते. तेव्हा मुदगल ऋषीने प्रल्हाद नावाच्या शिष्याला प्रल्हादपुरला पात्रुडला पाठवले आणि प्रल्हाद नावाच्या शिष्याने प्रल्हादपुरला गणेश मंदिराचे बांधकाम केले. तेव्हापासून पात्रुडचे प्राचीन नाव प्रल्हादपूर हे आहे. त्याचे अपभ्रंश होऊन पात्रुड असे नाव पडले.

गणेश मंदिराच्या अवशेषावरुन हे मंदिर १३ व्या शतकातील असल्याचे दिसून येते. मंदिराचे मुळ बांधकाम हे हेमाडपंथी शैलीत झाल्याचे दिसून येते. मंदिराचे प्रवेशव्दार पूर्वेकडे असून मंदिराला २१ पाय-या आहेत. मुळ मंदिराचा गाभारा १६x१६ असून मंदिराबाहेर ६०x८० आशी जागा आहे. मंदिराच्या मुळ सभामंडपात एकूण ११ खांब आजही सुस्थितीत आहेत. या मंदिराच्या दक्षिणेला ५० फूटावर बारव होती. ती नष्टप्राय झालेली आहे. मंदिराच्या स्तंभावर नागफने आहेत. मंदिराचे बांधकाम हे दगडात दगड बसवुन केलेले आहे. मंदिराच्य आजु बाजुला अनेक प्राचीन मुर्त्या व अवशेष सापडतात या वरुन हे पुरातन मंदिर असल्याचे सिध्द होते. परंतू हे मंदिर शासन, संशोधक यांच्या दुर्लक्षामुळे वंचित राहिलेले तीर्थक्षेत्र आहे.

गणेश मंदिराला माधवराव पेशवे यांनी आग्रहार म्हणून जमीन दान दिल्याचे गावकरी सांगतात. तसेच या मंदिराचा जिर्णोध्दारही पेशव्याच्या काळात झाल्याचे सांगतात. पेशव्यांनी या गावाला लागून असलेल्या हजरत ख्वाजा मकदुम महेमुद शहासिध्दीकी अन्सारी यांच्या दर्ग्यासाठी जमीन दान दिल्याचे पुरावे उपलब्ध आहेत.






**वैशिष्टये :-**

१) प्राचीन बाजारपेठेचे गाव आहे.

२) हेमाडपंथी शैलीत बांधलेले गणपती मंदिर आहे.

३) या मंदिराच्या खाली प्राचीन महादेव मंदिर आहे.

४) या गावात सर्वधर्म संहिष्णुता पहायला मिळते.

५) हे तीर्थक्षेत्र खांबगाव पंढरपूर महामार्गावर आहे.

**उपाययोजना :-**

१) मंदिर परिसराचा विकास करणे.

२) ऐतिहासिक व सांस्कृतिक साधनांचे जतन करणे.

३) तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवणे.

४) भाविकांना सुविधा उपलब्ध करणे.

५) पर्यटन स्थळ म्हणून विकास करणे.

**संदर्भ :-**


१) गणेशपुराण.

२) साळुंखे सतिश, बीड जिल्हयाचा इतिहास.

३) प्रत्यक्ष भेट.

४) मौखिक साधने.

५) मुलाखत.

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Wadvani taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Lord Makardhwaja and various temples situated in Chinchavan village of Wadvani taluka.

## मकरध्वज तीर्थक्षेत्र, चिंचवण

बीड जिल्यातील वडवणी तालुक्यात चिंचवण हे ऐतिहासिक परंपरेचा समृध्द वारसा असलेले गाव आहे. हे गाव वडवणीपासून दक्षिणेस ७ कि. मी. अंतरावर आहे. या गावाचे प्राचीन नाव महिकावती हे होते. या गावचे वैशिष्टे म्हणजे या गावात मारुती ऐवजी त्यांच्या मुलाचे म्हणजेच मकरध्वजाचे प्राचीन मंदिर आहे. मकरध्वजाच्या मंदिरापुढे मुर्ती पालथी घातलेली मंकावतीचे उध्वस्त मंदिर आहे. मकरध्वज मंदिराच्या उत्तरेला १०० फुट अंतरावर शंभु महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. त्या मंदिराला लागूनच विठ्ठल रुक्मिनीचे प्राचीन मंदिर आहे. तसेच गावाच्या पश्चिमेला जंगदंबा देवीचे मंदिर आहे. असा समृध्द प्राचीन वारसा असलेले चिंचवण हे गाव आहे. या सर्व मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी शैलीत केल्याचे दिसते परंतु प्रारंभ मात्र चालुक्याच्याच काळात झालेला आहे. येथील मकरध्वज मंदिर प्रसिध्द असून त्याचा जिर्णोध्दार २०१५ मध्ये झालेला आहे. येथे दरवर्षी नियमितपणे पौष पौर्णिमेला यात्रा भरते. यात्रेला जवळपास महाराष्टाच्या कानाकोप-यातून लाखो भाविक येतात.

**मकरध्वज मंदिरः-** महाराष्ट ही देवस्थान व तीर्थक्षेत्रे यांनी गाजलेली भूमी आहे. ज्याप्रमाणे महाराष्टात अनेक तीर्थक्षेत्रे आहेत त्याप्रमाणेच बीड जिल्हयात चिंचवण येथे मकरध्वज हे देवस्थान आहे. या मंदिराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. मकरध्वज मंदिर हे भारतात दोन ठिकाणी आहे. एक काशी व दुसरे चिंचवण. ''मकरध्वज हा हनुमानाचा मुलगा आहे, हनुमानाच्या घामापासून मकरध्वजाचा जन्म झाला आहे. जेव्हा लंका दहन केले तेव्हा समुदामध्ये हनुमंताने घाम टाकला तेव्हा त्या घामाला मगरीने गिळले व मगरीपासून आणि मारुतीच्या घामापासून मकरध्वजाचा जन्म झाला''१. पुढे रामायणाच्या युध्दकांडात या संदर्भात माहिती आलेली आहे.

प्रभुरामचंद व रावण यांच्यात घनघोर युध्द झाले. यात रावणाची अवस्था बिकट झाली. तेव्हा रावणाला अशा कठीण प्रसंगी महिकावती नगरीतील अहिरावण व महिरावण यांची आठवण झाली. रावणाने झालेला सर्व वृतांत दोघांना सांगितला. दोघांनी रावणाला आश्वस्थ केले. त्या दोघांनी अंबिकेची आराधना करुन तिला प्रसन्न केले. नंतर अहिरावण व महिरावण यांनी वानरसैन्यात जाऊन राम लक्ष्मणाला भुयारी मार्गाने पाताळात आणले. मारुतीने रात्रीच्यावेळी सैन्यात राम लक्ष्मणाला शोधले, पण त्यांना राम लक्ष्मण दिसले नाहीत. त्या वेळेला तो घाबरुन गेला, सर्वत्र शोधाशोध करुन जेव्हा ते सापडेना तेव्हा त्याने बिभीषन व सुग्रीव यांच्याकडे सैन्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली व आपण स्वतः शोधण्यासाठी बाहेर पडले. परंतु कोठे जावे हे त्यांच्या लक्षात येईना म्हणून त्यांनी राम लक्ष्मणाच्या शोधासाठी आदिशक्तीला शरण जाऊन तिची प्रार्थना केली. तेव्हा आदिशक्तीने जवळच एका झाडावर गिधाडाचे जोडपे बसलेले होते त्यातील मादीच्या शरीरात प्रवेश केला आणि मारुतीला अहिमहिरावणाने भुयारी मार्गाने राम लक्ष्मणला पाताळात घेऊन गेल्याचे सांगितले.


राम लक्ष्मणाला पाताळात नेल्यावर अहिमहिरावणाने त्यांच्या बंदोबस्तासाठी मकरध्वजाच्या नेतृत्वाखाली १४,००० हजार सैनिक ठेवले. हनुमंताने तापस वेश धारण करुन मध्यरात्रीच्या वेळी व्दारातून प्रवेश करु लागताच मकरध्वजाने त्यांना अडवले. मारुतीने त्यावेळी अद्‌भुत शक्तीचा वापर करुन सर्वांना निदिस्थ केले. परंतु त्याचा मकरध्वजावर काही फरक

झाला नाही. त्यामुळे मकरध्वजाने मारुतीला इथून निघून जाण्यास सांगितले. तेव्हा दोघात युध्दाला सुरुवात झाली. मारुतीच्या आघाताचा मकरध्वजावर काहीच परीणाम होत नव्हता. तेंव्हा मारुतीने त्याला त्याची ओळख विचारली. तेव्हा तो म्हणाला, मी वायुसूत हनुमानाचा मुलगा आहे. अहिमहिरावणाने राम लक्ष्मणाला आणून येथे ठेवलेले असून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी म्हणून माझी व्दारपाल म्हणून नेमणुक केलेली आहे. पकडून आणलेल्या दोन मानवांना अंबिकेला बळी द्यायचे आहे असे सांगितले. हनुमान हे ऐकूण संतापला तेव्हा मकरध्वजाने आपल्या आईला बोलावले व तिने सर्व हकिगत सांगितली. दोघांचे मिलन झाले. मारुतीने अंबिकेची प्रार्थना केली आणि ती तिथून निघून गेली. तिच्या जागी स्वतः मारुती बसले. देवीला नैवेद्य दाखवण्यासाठी सर्व प्रकारची फळे ठेवली ते सर्व मारुतीने भक्षण केले. तेव्हा बळी देण्यासाठी राम लक्ष्मणाला आणले. देवीपुढे आणल्यानंतर राम लक्ष्मणाला इष्टदेवतेची स्मरण करण्यास सांगितले. त्यावेळी रामाने हनुमंताचे स्मरण केले. स्मरण करताच मारुती प्रगट झाले आणि राम लक्ष्मणाला बंधमुक्त केले.


मारुतीने राम लक्ष्मणाला बंधमुक्त केल्यानंतर महिरावणाचा वध केला व अहिरावणासी युध्द करण्याची आज्ञा रामाकडे मागितली. तेव्हा स्वतःच त्यांच्याशी युध्द करण्याचे रामाने ठरवले. हनुमानाच्या खांद्यावर राम लक्ष्मण बसून अहिरावणासी संघर्ष सुरु केला. अहिरावणाच्या शरीरात बाण घुसल्यानंतर जे रक्त निघू लागले त्यापासुन अनेक अहिरावण जन्माला येऊ लागले. तेव्हा हनुमंताने मकरध्वजाच्या मातेला यावर उपाय विचारला. तिने अहिरावणाच्या पत्नीला म्हणजेच चंदसेनेला विचारण्यास सांगितले. मारुती चंदसेनाजवळ गेला यावर उपाय विचारला. तेव्हा तिने एक अट घातली ती म्हणजे रघुनंदन माझ्या घरी आले पाहिजेत व त्यांचे दर्शन झाले पाहिजे. मारुती आश्वासन दिले. चंदसेनाने सांगितले की, पाताळात एका ठिकाणी अमृत आहे तेथुन भुंगे अमृत आणतात व रक्ताच्या थेंबावर टाकतात त्यामुळे अहिरावण अमर आहे. हे ऐकूण मारुतीने अमृताचा शोध लावला व भुंग्यांना मारले. अमृत स्वतः प्राशन केले त्यानंतर रामाने अहिरावणाचा वध केला व महिकावतीचे राज्य मकरध्वजास दिले. महिकावतीचा म्हणजेच आजचा चिंचवणचा राजा मकरध्वज झाला.

मकरध्वजाचा जन्म पौष शुध्द पौर्णिमेला झाला म्हणून त्यादिवशी जन्मोत्सव साजरा केला जातो. यावेळी ७ दिवस गावात सप्ताह असतो व यात्रा भरते. महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून येथे मोठया प्रमाणात भाविक येतात. परंतु शासनाच्या दुर्लक्षामुळे महाराष्टात केवळ एकमेव असलेले मकरध्वजाचे मंदिर दुर्लक्षित आहे. या मंदिराच्या स्थापत्यशैलीवरुन हे हेमांडपंथी असल्याचे दिसते. २०१५ ला जिर्णोध्दार झाला असला तरी मूळ मंदिर हे यादवांच्या काळात १३ व्या शतकात बांधल्याचे दिसते. त्यामुळे ते पुरातन मंदिर आहे. मंदिराचे गर्भगृह २०X२० असून गर्भगृहातील मकरध्वजाची मुर्ती ही पाषाणाची आहे. मकरध्वजाची मुर्ती सुंदर व अलंकारवेष्टीत असून गुडघा टेकवलेली आहे. या गर्भगृहाचे तोंड पश्चिमाभिमुख आहे. मंदिराच्या भोवती प्रदर्शनापथ असून या मंदिरावर वेसरशैलीचा स्पष्ट प्रभाव आहे. या मंदिराचा कळस भव्य व शिल्पवेष्टीत आहे. गर्भगृहाच्यापुढे अंतराळ असून दोन्ही बाजुला गजराज उभे केलेले आहे. मंदिरापुढे नवीन बांधकाम केलेले सभामंडप आहे. मंदिराची एकूण जागा जवळपास १५ गुंठे आहे. मंदिराचे गर्भगृह व कळस यांचे नवीन बांधकाम केल्याने जुने अस्तित्व नाहीसे झालेले आहे.

मकरध्वजाच्या मंदिरापुढेच ५० फुट अंतरावर मंकावतीचे पालथी मुर्ती घातलेले भग्न अवस्थेतील मंदिर आहे. याच ठिकाणी मारुती मंकावतीची मुर्ती पालथी टाकून त्याठिकाणी स्वतः बसलेले होते. ही देवता येथील मुळदेवता होती. या देवतेमुळे या गावाला मंकावती , महिकावती व आजचे चिंचवण असे नाव पडले. त्या देवतेकडे गावातील लोकांचे दुर्लक्ष आहे. याकडे शासनाने व लोकांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे अन्यथा आपण आपल्या गावचा इतिहासच हरवू शकतो.







**महादेवाचे मंदिर :-** मकरध्वज मंदिराच्या उत्तरेला १०० फुट अंतरावर १३ व्या शतकातील महादेवाचे मंदिर आहे. मंदिराचे पूर्वाभिमुख प्रवेशव्दार असून कळसाचा खालील भागाची पडझड होत आहे तर कळसाचा भाग नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. कळसाचा भाग पक्क्या विटांनी बांधकाम केलेला असून कळसाच्या खालील मंदिराचा भाग हा मोठमोठया शिळांनी बांधलेला आहे. मंदिराचा पदविन्यास गर्भगृह , अंतराल व सभामंडप असा आहे. मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग असून भिंतीला लागून चौथ-यावर चतुर्भुज विष्णुची मुर्ती आहे. मंदिराच्या गर्भगृहात चारही कोप-यात दगडी स्तंभ असून त्यावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे. गर्भगृह सुस्थितीत आहे. गर्भगृहाच्या प्रवेशव्दारावर गणपती कोरलेला आहे. गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजुला उत्कृष्ट अशा तीन तीन देवदेवतेच्या मुर्त्या आहेत. तर गर्भगृहाच्या उंबरवठयाच्या खाली भारवाहकाचे शिल्प आहे. अंतरालाच्या भिंतीवर आतून देवदेवतेच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. पुढे सभामंडपात ३२ स्तंभ आहेत. स्तंभावर भारवाहक , नागफणे , पद्मपुष्प , नृत्यांगनेच्या मुर्त्यां , नृसींह इत्यादी मुर्त्या कोरलेल्या आहेत. मुख्य मंदिराचे प्रवेशव्दार हे उध्वस्त झालेले आहे. उजव्या बाजुची भिंत खचत चाललेली आहे. मंदिरात प्रवेश करतांना प्रवेशव्दाराच्या बाहेर दोन्ही बाजुने चार चार फूटाचे दगडी चौथरे आहेत.मंदिराच्या बाहय भागावर विविध देवदेवतेच्या मुर्त्या व शिल्प कोरलेले आहेत. ज्यात कणी , भारवाहक , शिव , विष्णु , राम , बलराम , नृसिंह इत्यादी देवतेच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. मंदिराच्या गर्भगृहातील देवतेच्या स्नानाचे पाणी मगरीच्या मुखातून बाहेर काढलेले आहे. ते पाणी बाजुलाच असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या गर्भगृहाच्या खालून पाण्यात सोडलेले आहे. दोन्ही मंदिरातील देवतेच्या स्नानाचे पाणी उत्तरेला साठवले जाते. त्याला कल्लोळ असे म्हणतात. एकदंरीत या मंदिराच्या स्थापत्य व शिल्पकलेवरुन हे मंदिर चालुक्य व यादवकाळाच्या स्थापतेचा उत्कृष्ठ नमुना दिसुन येतो. या मंदिराचा प्रारंभ चालुक्यांनी केल्याचे दिसते तर पुर्ण यादवानी केल्याचे दिसते. मंदिराचा विस्तार पूर्व पश्चिम लांबी ७५ फूट असून दक्षिण उत्तर रुंदी ४० फूट आहे.


 

**विठ्ठल रुक्मिणी मंदिर :-** मकरध्वज मंदिराच्या १४५ फुटावर व महादेव मंदिराच्या १० फुट अंतरावर विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर आहे. हे दोन्ही जुळे मंदिरे आहेत. या मंदिरांचे बांधकाम महादेव मंदिराच्या समकाळातच झालेले दिसून येते. या मंदिराचे पूर्वाभिमुख प्रवेशव्दार आहे. कळसाचा अर्धा भाग नष्ट झालेला असून अर्धा भाग नक्षीकाम केलेला सुआवस्थेत आहे. तर मंदिराच्या बाहेर यज्ञशाळा आहे. त्याचा एक स्तंभ विखुरलेला असून ३ स्तंभ उभे आहेत. हे मंदिर पडझड होण्याच्या मार्गावर आहे. या मंदिराच्या शिळा हया एकमेकात धातू ओतून घटट बसवलेल्या आहेत. हे यज्ञशाळेतील स्तंभावरुन दिसून येते. या मंदिराचे बांधकामसुध्दा १३ व्या शतकात झाल्याचे दिसते. दोन्ही जुळया मंदिराचे बांधकाम चालुक्य काळात करण्यात आले. परंतु या मंदिराचे पूर्ण बांधकाम यादवांच्या काळात केले गेले. या मंदिरात चालुक्याच्या स्थापत्य शेलीचे व शिल्पकलेचे अनेक नमुने पाहता येतात. चालुक्य व हेमाडपंथी या दोन्ही शेलीच्या माध्यमातून या मंदिराचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

या मंदिराचे वैशिष्टे म्हणजे या मंदिराच्या गर्भगृहात भुयार आहे आणि हे भुयार धारुरच्या किल्यात व तसेच पुढे अंबाजोगाईच्या हत्तीखाना येथे जाते असे म्हटले जाते. प्रत्यक्षात गर्भगृहात भुयार आजही अस्तित्वात आहे. हा संशोधनाचा भाग आहे. अहिमहिरावणाने राम लक्ष्मणाला याच भुयारातून आणले असा संदर्भ स्थानिक लोक जोडतात.

विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा पदविण्यासही महादेव मंदिरासारखाच आहे. गर्भगृह , अंतराल व सभामंडप या स्थापत्यशैलीत या मंदिराचे बांधकाम झालेले आहे. या दोन्ही मंदिरावर प्राचीन वेसरशैलीचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. या मंदिराच्या गर्भगृहाचा आकार हा २०X२० असा आहे. या मंदिराची रुंदी ४० फूट असून लांबी ७५ फूट आहे. अशा विस्तीर्ण जागेत हे मंदिर बांधलेले आहे. गर्भगृहात विठ्ठल रुक्मिणीची मुर्ती आहे. गर्भगृहाच्या उजव्या बाजुला आतुन भुयार आहे. गर्भगृहात भिंतीला लागून चौथ-यावर विठ्ठल रुक्मिणीची मुर्ती आहे. या मंदिराच्या उत्तरबाजुला कल्लोळ आहे. गर्भगृहाच्या प्रवेशव्दारावर गणपती मुर्ती आहे. प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजुने शिव व विष्णु सपत्निक व्दारपाल कोरलेले आहेत. प्रवेशव्दाराच्या उंबरवठयावर मधोमध नृसिंहासारखा भारवाहक कोरलेला आहे. अंतरालात सुंदर पुष्पशिल्प कोरलेले आहेत तर सभामंडपातील स्तंभावर प्रत्येक शिल्पात एक एक दंतकथा लपलेली आहे. यात राम वालीची कथा , नृत्यशिल्प, विष्णुच्या अवतारातील विविध शिल्प, ज्यात वामन , हर्यक , नृसिह , राम तसेच बलराम , गणपती , समुदमंथनाचे शिल्प , पक्षीपुष्प , नागफणी , पदम , कुमुद , कणी , पशु , पक्षी , पुष्प इत्यादी सुंदर शिल्पांकण केलेले आहे. या सर्व मुर्त्यावरुन हे मंदिर हेमाडपंथी म्हणत असे तरी देवकुळावरुन व स्थापत्यकला व शिल्पकलेवरुन ते चालुक्यकालीन असल्याचे दिसते. या

मंदिराच्या कळसाच्या बाहय भागावर विटाच्या माध्यमातून जे नक्षीकाम केलेले आहे ते अत्युच्चकोटीचे आहे आणि ते नामशेष होत आहे. या मंदिराकडे पुरातत्व खाते , प्रशासन व लोकांचे दुर्लक्ष झालेले आहे. जर वेळीच लक्ष दिले नाही तर आज जो आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे तो नष्ट होईल. त्यासाठी या मंदिराचे जतन आणि संवर्धन होणे गरजेचे आहे.





**जंगदंबादेवीचे मंदिर :-** गावाच्या पश्चिमेला यादव कालखंडात हेमांडपंथी शैलीत बांधकाम केलेले देवी जंगदबेचे मंदिर आहे. हे मंदिरही पडझड होण्याच्या मार्गावर आहे. या मंदिरावरील मुर्तीकला सुबक व अलंकारिक आहेत.

हे सर्व मंदिरे प्राचीन व मोठमोठया शिळाणी बांधकाम केलेले आहे. आजही हे मंदिरे आपल्या संस्कृतीचा वारसा सांगताना आपणाला दिसत आहे. या मंदिराचे वास्तुशिल्प अत्युच्च प्रकारचे आहे. हे मंदिर इतिहास अभ्यासकापासून व संशोधकापासून दुलक्षित आहे. धर्मापुरी येथील जे शिल्प आहेत त्यापेक्षाही अत्युच्च कोटीचे शिल्प चिंचवण येथील मंदिरावर आहेत. धर्मापुरी ही चालुक्यांची सांस्कृतिक राजाधानी असल्याने सर्व संशोधकाचे लक्ष तिकडेच गेले. परंतु त्यापेक्षाही येथील मुर्तीशिल्प हे बोलके आणि बोधात्मक आहेत. हे या मंदिराचे वैशिष्टे आहेत. मंदिराची शिल्पकला आणि महाराष्टातील नव्हे तर देशातील दुर्मिळ मकरध्वजाचे मंदिर मौजे चिंचवण येथे आहे. याचा इतिहास व माहिती राज्याच्या व राष्टाच्या नकाशावर गुगलच्या माध्यमातून आली पाहिजे तरच लोकांना या तीर्थक्षेत्राबददल माहिती होईल आणि या परिसरांचा व गावचा विकास होईल.

**मंदिराची वैशिष्टये :-**

१) चालुक्यकालीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे.

२) महाराष्टातील एकमेव मकरध्वजाचे मंदिर येथे आहे.

३) मकरध्वज , शिव , विष्णु व जगदंबा मंदिर ही प्राचीन मंदिरे आहेत.

४) येथील मुर्तीकला व शिल्पकलाही प्रमाणबध्द आहे.

५) दरवर्षी पौष पौणिमेला जन्मोत्सव साजरा होतो व लाखो भाविक येतात.

**उपाय योजना :-**

१) सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करणे.

२) यात्रेस येणा-या भाविकास सुविधा पुरविणे.

३) मंदिराच्या संदर्भातील माहिती पटलावर आणणे.

४) पर्यटनाच्या दृष्टिकोणातून मंदिर परिसरांचा विकास करणे.

५) तीर्थस्थळाचा दर्जा मिळवून देणे.

**संदर्भ :-**

१) महाभारत शांतीपर्व - १२९

२) ब्रम्हपुराण

३) नारदपुराण , २ - ७३

४) रामायण उत्तरकांड ३० - ४०

५) मराठी विश्वकोष खंड - ५ , २७२

६) पौराणीककौष

७) गुरुचरीत्र , अध्याय १३ , ६२ ते ७७

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Dharur taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Lord Shankara temple situated in Dhunakwad village of Dharur taluka.

## श्री धुनकेश्वर मंदिर तीर्थक्षेत्र, धुनकवाड

धारुर तालुक्यातील लेंडी व कुंडलीका नदी तिरावर धुनकवड हे गाव वसलेले आहे. गावाच्या बाजुलाच उंच डोंगरावर महादेवाचे प्राचीन हेमाडपंथी मंदीर असून गावाच्या नावावरुन धुनकेश्वर महादेव मंदीर असे संबोधले जाते. बालाघाटाच्या उंच डोंगर रांगेत थंड हवेच्या ठिकाणी हिरवीगार झाडी वेली अशा सानिध्यात व बालाघाट डोंगराच्या कुशीत हे मंदीर आहे. चैत्री पौर्णिमेच्या व्दादशीला या तीर्थक्षेत्राची यात्रा भरते, मोठयासंख्येने भावीक यात्रेला येतात. दोन नदयांच्या संगमावर असलेल्या तिर्थक्षेत्राला जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. गावधंरा मार्गे व दुसरा कुंडलीकेच्या पात्रातुन नावेने जावे लागते ते धोक्याचे आहे.

उंच डोंगर टेकडीवर असलेल्या तीर्थक्षेत्रावर गार्डन , पाणी उंच डोंगररांगा, गर्द हिरवीगार झाडी हे सर्व ठिकाणे माणसाला मोहित करतात. मंदीराबाहेर असलेल्या प्राचीन शिलावरुन हे मंदीर यादव कालीन स्थापत्य शैली (बांधकामाचा) उत्तम नमुना वाटतो. साधारण हे मंदीर १२ व्या व १३ व्या शतकाच्या आसपास बांधले गेले असावे.

मंदीराच्या दक्षिण बाजुला एक समाधी असून तेथून एक भुयार कुंडलीका पात्र पारकरुन चिंचवण येथे निघत असल्याचे भाविक सांगतात. सदरील भुयार सध्या बंद आहे. अहीरावन महीरावन राम लक्ष्मणाला याच भुयारातून नेल्याचे ग्रामस्थ सांगतात. हा पुरावा चिंचवणच्या मकरध्वज मंदीराशी जोडला जातो. त्यावेळीच कुंडलीका फक्त एका नांगराच्या तासाच्या आकाराची होती. सदर भुयारात धुनकवड येथील लिबांजी भोई तीन दिवस जावुन आल्याचे सांगीतले जाते. सध्या ते हयात नाहीत.

मंदिराचा जिर्णोध्दार सन २००० साली झाला असून प्राचीन मंदिराच्या शिळाच्या दगडाने बांधले आहे. या मंदिर विकासाला भरपूर वाव असून पर्यटन सुविधा उपलब्ध झाल्यास व या तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यास बोटींग, मुलांना गार्डन झ ााल्यास उत्तम पर्यटन स्थळ होईल यात शंका नाही. मंदिराचे गर्भगृह सभामंडप रमणीय वाटतो. खालून यावेळत भाविक डोंगरावर चालत जातात वरती थंड हवा लागते तेव्हा भाविकांचा थकवा निघुन जातो.

मंदिर स्थापत्य , हिरवीगार गर्द झाडी, वेली व कुंडलीका नदीचा संगम डोंगर यामुळे भाविकासाठी बोटींग नदीवर पुल बांधल्यास या पर्यटन स्थळापासून शासनाला आर्थिक लाभ सुध्दा होऊ शकतो.





**वैशिष्टये :-**

१) यादव कालीन हेमाडपंथी प्राचीन मंदीर.

२) नैसर्गिक गर्द झाडी , डोंगररांगा नदयांचा संगम भक्तांना मोहुन टाकतो.

३) धुनकेश्वर महादेव मंदिर मराठवाडयात प्रसिध्द आहे.

४) लेंडी व कुंडलीका दोन नदयांचा संगम या तिर्थक्षेत्राच्या सौदर्यात भर टाकते.

५) भक्तासाठी हे पर्यटन क्षेत्र म्हणजे पर्वनी आहे.

**उपाय योजना :-**

१) पर्यटन व धार्मीक स्थळाला दर्जा मिळावा.

२) नदयांच्या पाण्याचा उपयोग बोटींगसाठी व्हावा.

३) भाविकांना येण्याजाण्यासाठी नदीवर पुल बांधणे.

४) तेथे असलेल्या नैसर्गिक साधन सामुग्रीचा वापर करुन मंदिर विकासात भर घालावी.

५) भक्त निवास रस्ते , पाणी याची उत्तम सोय करता येते.

**संदर्भ :-**

१) मौखिक साधने

२) मुलाखत

३) प्रत्यक्ष भेट

Date: 26 Sept. to 03 Oct. 2020
Title: Study report of temples in Wadvani taluka
No. of students: 10, No. of teachers: 04
Report: It includes detailed study report and historical information of Harishchandra temple situated in Harichandra Pimpri village of Wadvani taluka.

## राजा हरिचंद्र तीर्थक्षेत्र, हरिचंद्र पिंपरी

बीड जिल्हयातील वडवणी तालुक्यात वडवणीपासुन उत्तरेस ११ कि. मी. अंतरावर मौजे हरिचंद्र पिंपरी हे गाव आहे. या गावात प्राचीन हरिचंद्राचे मंदिर आहे. हे मंदिर द. भारतातीलच नव्हे तर देशातील एकमेव मंदिर आहे. या मंदिराचे गर्भगृहाचे तोंड उत्तरेकडे असून मंदिराचे बांधकाम मुळ यादवकाळात हेमाडपंथी शैलीत झाल्याचे दिसून येते.

हे मुळ मंदिर महादेवाचे असून नंतरच्या काळात त्या पिंडीवर राजा हरिचंद्राचे मुकुट बसविण्यात आले आहे. दरवर्षी महाशिरात्रीला या ठिकाणी यात्रा भरते व सात दिवस ही यात्रा चालते. या यात्रेसाठी महाराष्ट्र , आंध्र प्रदेश , कर्नाटक व देशभरातून लाखो भाविक याकाळात येथे येतात. राजा हरिचंद्राचे मंदिर हे देशातील एकमेव मंदिर आहे. या मंदिराच्या ५०० मिटरवर दक्षिणेस विश्वामित्र थांबल्याचा ओठा आहे. या मंदिराला एकुण १७३ एक्कर जमीन देखरेखीसाठी आहे. हे तीर्थक्षेत्र क्षेत्र भगवान बाबा  ट्रस्टव्दारा चालवले जाते. आज या मंदिराची देखभाल भगवान महाराज राजपुत हे पहातात या मंदिराला तीर्थक्षेत्राचा **ब** दर्जा आहे.

इक्ष्वांकु कुळातील सुर्यवंशी राजा त्रिशंकु यांचा पुत्र दानशुर व सत्यवान राजा हरिचंद्र हा होय. हरिचंद्राच्य आईचे नाव सत्यवती होते. हा इंन्द्रसभेत मिरवत असे. राजा हरिचंद्राच्या वडिलांचे नाव त्रिशंकु आईचे नाव सत्यवती होते. राजा हरिचंद्र हे समस्त राज्याचे सम्राट होते. त्यामुळे त्यांची आज्ञा सर्व राजे पालन करीत असे. राजा हरिचंद्राने आपल्या चैत्र रथावर आरुढ होऊन सात खंडावर विजय मिळवलेला होता. त्यांनी हे जिंकल्यानंतर राजसुय यज्ञ केले. त्यावेळी याचकांच्या इच्छेपेक्षा पाचपट धन जास्तीचे दिले होते. त्यामुळे सर्व ब्रम्हवृंद संतुष्ट झालेले होते. अन्य राजापेक्षा हा तेजस्वी आणि यशस्वी राजा होता. इंद्रसभेमध्ये त्यांना सन्मानपुर्वक बोलावले जात असे. त्यामुळे इंद्राच्या मनात हरिचंद्राविषयी इर्ष्या निर्माण झाली. त्यामुळे इंद्राने हरिचंद्राची परीक्षा घेण्याचे ठरवले. यासाठी ऋषी विश्वामित्राची नियुक्ती करण्यात आली. प्रभु रामाचे पुर्वज असणारे सत्यवादी राजा हरिचंद्र यांची राजधानी अयोध्या होती. अयोध्येत हिंस्त्र पशुंनी धुमाकुळ घातला. तेव्हा  या हिंस्त्र पशुचा पाठलाग करीत - करीत राजा हरिचंद्र सैन्यासह अयोध्येपासून दुरवर दंडकारण्यापर्यंत आले. दंडकारण्यात आल्यानंतर राजा हरिचंद्राने या ठिकाणी मुक्काम केला. या ठिकाणी महादेवाचे मंदिर होते तेव्हा या मंदिरातच विश्रांती घेतली. संध्याकाळी झोपलेल्या अवस्थेत असतांना त्यांना स्वप्न पडले व स्वप्नात संपूर्ण राज्य विश्वमित्राला दान दिले. म्हणून स्वप्न पडलेले व दान केलेले ठिकाण म्हणजेच आजच्या बीड जिल्हयातील वडवणी जवळील राजा हरिचंद्र पिंपरी होय. याच ठिकाणी राजा हरिचंद्राचे मंदिर आहे. संपूर्ण जगभरातील राजा हरिचंद्राचे हे एकमेव मंदिर आहे.

पत्नीचे नाव तारामती किंवा चंद्रमती तर मुलाचे नाव रोहिदास हे होते. राजा हरिश्चंद्र यांचे गुरु वशिष्ठ हे होते. वशिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यात वितुष्ठ होते. राजा हरिचंद्राला दीर्घकाळापर्यंत मुलबाळ नव्हते. तेव्हा वरुणाच्या कृपेमुळे रोहित नावाचा मुलगा झाला. तो मोठा झाल्यावर त्याचाच मी बळी देईन असे अभिवचन हरिचंद्राने वरुणास दिले होते. परंतु उपनयनानंतर वेळ आल्यावर रोहित याने बळी जाण्यास नकार दिला व तो रानात पळुन गेला. तेव्हा वरुणाच्या रोषाने हरिचंद्राला वरुण रोग जडला. तेव्हा रोहितला हे कळताच परतच असतांना इंद्राने त्यास परावृत केले. वशिष्ठांच्या सल्यानुसार अजीतगर्ग  ब्राम्हणाकडुन शंभर गाईच्या बदल्यात त्याचा मधला मुलगा शुनःशेप यास विकत घेऊन बळी देण्याचे ठरवले. हे विश्वामित्राला कळाल्यानंतर त्यांनी वरुणयंत्राव्दारे शुनःशेप यांचे रक्षण केले. पुढे हरिचंद्र या रोगातून बरा झाला व रोहित राजवाडयात  परत आला. त्यानंतर हरिचंद्राने राजसुय यज्ञ केला. एक उदार, सत्वशील व दानशुर राजा म्हणून त्याची किर्ती झाली.

हरिचंद्र पिंपरी येथील असलेले राजा हरिचंद्र मंदिर हे यादवकाळातील १३ व्या शतकात त्याचे मुळ बांधकाम असावे असे उपलब्ध शिळाच्या अवशेषावरुन दिसून येते. परंतु त्याचे जिणोध्दार हे नवीन झालेले आहे. या मंदिराचे वैशिष्टे म्हणजे या मंदिरातील गर्भगृहात महादेवाची असलेली पिंडे हे इतर मंदिरातील गर्भगृहात असलेल्या पिंडीसारखे ठेवलेल्या दिशेने नसून ती दरवाज्याकडे सरळ रेषेत आहे तर बाकीच्या मंदिरात महादेवाची पिंड ही आडवी असते. गर्भगृहातच पिंडीच्या पाठीमागे विष्णुची चतुर्भज मुर्ती आहे.






**वैशिष्टये :-**

१) देशातील हरिचंद्राचे एकमेव मंदिर.

२) महादेवाच्या मुर्तीवर हरिचंद्राचे मुकूट आहे.

३) या मंदिरात महादेवाची पिंड ही सरळ रेषेत आहे.

४) महाशिवरात्रीला दरवर्षी यात्रा भरते.

५) या तीर्थक्षेत्राला तीर्थक्षेत्राचा **ब** दर्जा आहे.

६) या मंदिराला १७३ एक्कर जमीन असून विकासाला वाव आहे.

**उपाय योजना :-**

१) देशातील एकमेव मंदिर असल्याने भक्तांना सोयी सुविधा परविणे.

२) तीर्थक्षेत्राच्या **ब** दर्जातुन **अ** दर्जात आणणे.

३) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून मंदिर परिसराचा विकास करणे.

४) सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसाचे जतन करणे.

५) दळणवळणाची सोय उपलब्ध करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**


१) महाभारत, सभापर्व, ७ ते १३

२) महाभारत, सभापर्व, १२, ११ ते १८

३) शर्मा राजाप्रसाद, पौराणिक कोश, ज्ञानमंडल प्रकाशन, वाराणसी, १९७०, पृ. ५४९

४) दैनिक पुढारी २६ जानेवारी २०१८

५) देवी भागवत ७ ते १८

६) जोशी लक्ष्मणशास्त्री, संपादक, मराठी विश्वकोश, खंड २० पृ. १९८७

प्रशासकीय मान्यता

**पुरुषोत्तमपुर, ता.माजलगाव, जि. बीड येथील पुरुषोत्तम मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे.**

Sunderrao Solanke Mahavidyalaya
MAJALGAON DIST.BEED (MAHARASHTRA)
Majalgaon

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४०४(एल.बी.५)/रस्ते-८**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - २७ एप्रिल, २०२२

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४०४/रस्ते-८, दि. ३०.१२.२०२०
२) बैठकीचे इतिवृत्त क्रमांक : खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४०४/भाग-१/रस्ते-८, दि. १५.०४.२०२१
३) शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४०४/रस्ते-८, दि. २१.०९.२०२१
४) शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४०४/रस्ते-८, दि. १८.०१.२०२२

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे यांच्या जतन, संवर्धन, पुर्नवसन व परिसर विकासाची कामे राज्य शासनामार्फत करण्याबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मार्च, २०२१ मध्ये अर्थसंकल्पिय अधिवेशनात केलेल्या घोषणेनुसार महाराष्ट्रातील आठ मंदिरांचे जतन, संवर्धन व परिसर विकास कार्यक्रम, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांच्यामार्फत हाती घेण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे. विषयाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक २३.१२.२०२० रोजी झालेल्या बैठकीत यास मान्यता देण्यात आली.

प्रस्ताव :

**'पुरुषोत्तमपुर, ता.माजलगाव, जि. बीड येथील पुरुषोत्तम मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे.'** मंदिर परिसराचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये प्रामुख्याने ३ विभागात खालील कामे प्रस्तावित केली गेली आहेत.

१. मंदिराचा जीर्णोद्धार / पूर्नबांधकाम करणे.
२. मंदिर परिसरातील पर्यटनाच्या / भाविकांच्या दृष्टीने सोयी सुविधा करुन देणे.
३. इतर सोयी सुविधा व संलग्न कामे करणे.

भाग १: **मंदिराचा जीर्णोद्धार / पुर्नबांधकाम करणे:-**

१) भगवान पुरुषोत्तम मंदिराचे १९६९ चे चुकीच्या पद्धतीने केलेले बांधकाम उतरवून पुन्हा बांधणे.
२) फाऊंडेशन व प्लिंथ ची तपासणी करणे आणि आवश्यक तेथे त्याची शैली, साहित्य आणि कालावधीसाठी योग्य तपशिलांमध्ये पुर्नबांधणी.
३) सहालक्षेश्वर मंदिर पुर्नबांधणी.
४) यात्रेकरु आणि भाविकांसाठी असलेल्या सुविधांमध्ये मंदिराभोवती ओवऱ्या पुनःश्च बांधणे.
५) भक्त निवास, बहुउद्देशीय हॉल आणि गावाच्या वस्तीच्या दक्षिणेला असलेल्या जमिनीच्या भूखंडावर पोलीस चौकी, वैद्यकीय सुविधा इत्यादीसारख्या इतर सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

| अ.क्र. | वर्णन | रु. कोटी |
|---|---|---|
| १. | **मंदिर संवर्धन व इतर बांधकामे** | |
| १. | डिसमेंटलिंग आणि रिमूव्हल सिव्हिल वर्क | ०.३१ |
| २. | संवर्धन कार्य | १.४४ |
| ३. | प्रस्तावित जीर्णोद्धार | ४.५९ |

| | | |
|---|---|---|
| ४. | इलेक्ट्रिकल्स नष्ट करणे | ०.०००३५ |
| ५. | प्लबिंग वर्क्स | ०.०२२ |
| ६. | इलेक्ट्रिकल वर्क्स | ०.०२९१ |
| ७ | साइनेज वर्क्स | ०.०२९२ |
| ८. | लँडस्केप वर्क्स | ०.००२९ |
| ९. | प्रस्तावित ओवऱ्या, दीपमाळ, प्रवेशद्वार | २१.०७ |
| २. | **मंदिर परिसर विकास + भक्तनिवास** भक्त निवास + बहुउद्देशीय हॉल + वैद्यकीय उपकेंद्र + पोलीस स्टेशन + कर्मचारी निवास | ९.०२ |
| | **एकूण** | **३६.५१** |

भाग २: <u>**मंदिर परिसरातील पर्यटनाच्या / भाविकांच्या दृष्टीने सोयी सुविधा करुन देणे :-**</u>

१) मुख्य प्रवेश द्वाराच्या बाजूला कमानी जवळच सुरक्षा रक्षकांसाठी अद्ययावत अशी रुम बांधणे. प्रवेशद्वारा जवळच हात - पाय धुण्याची पण सोय प्रस्तावित आहे.

२) दर्शन बारी, व्ही. आय. पी . बारी इ. कामे.

३) जत्रा कालावधी मध्ये तसेच दैनंदिन भेट देणाऱ्या लोकांसाठी आवश्यक असलेल्या पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि वीज या संबंधित सुविधा निर्माण करण्याचीही योजना आहे.

४) महामार्गाशी जोडण्यासाठी आवश्यक रस्ते बांधणे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र | वर्णन | रु. कोटी |
|---|---|---|
| **१** | **परिसरातील इतर विकास कामे** | |
| १ | पाणीपुरवठा | १.७५ |
| २ | स्वच्छता गटार लाइन्स | २.५० |
| ३ | सांडपाणी उपचार प्लांट | १.५० |
| ४ | मंदिराच्या बाहेर स्वच्छतागृहे | १.०० |
| ५ | गोदावरी नदीकाठी घाट (७० m X ३०m) | ५.०० |
| ६ | पावसाळ्याच्या पाण्याची साठवण योजना | १.५० |
| ७ | लँडस्केप विकास | १.५० |
| ८ | एंट्री पॉईंटवर कमान | १.०० |
| ९ | कचरा संकलन आणि विल्हेवाट लावण्याची व्यवस्था | ०.७५ |
| १० | सणासुदीच्या वेळी रांगा लावण्यासाठी दर्शनबारी | १.५० |
| ११ | गावातील घरांमध्ये आकस्मिकता, होमस्टे आणि शौचालये | ३.७५ |
| **२** | **जोडणारे रस्ते** | |
| १ | ओडीआर ते गावापर्यंतच्या २.५० किमी रस्त्याचे अपग्रेडेशन | १.५० |
| २ | प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाला जोडण्यासाठी पुरुषोत्तमपुरी ते जयकोवाडी दरम्यान नवीन १० मीटर रुंद रस्त्याची निर्मिती | २.७० |
| | **एकूण रु. कोटी** | **२५.९५** |

सदर प्रस्तावाच्या छाननी अंती अंदाजपत्रकातील कामाच्या वावातील समाविष्ट बाबी व त्याच्या किंमतीचा येणारा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

तथापि, खालील तक्यात दर्शविल्यानुसार रु.५४.५६ कोटी (Including all Taxes and Charges) ची पहिल्या टप्प्यातील कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्तावित केली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार सदर प्रकल्पास (पहिला टप्पा) प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**Recapitulation Sheet**
**Part I (Temple Restoration & Conservation)**

| अ. क्र. | वर्णन | किमंत रु- कोटी |
|---|---|---|
| १ | मंदिर संवर्धन व इतर बांधकामे | २७.४९ |
| २ | मंदिर परिसर विकास + भक्तनिवास | ९.०२ |
| A | एकुण A | **३६.५१** |
| | मंदिर परिसरातील इलेक्ट्रिकल वर्क्स | ०.२४ |
| | पाणीपुरवठा व प्लंबिंग वर्क ५%, | १.८३ |
| B | एकुण B | **३८.५८** |
| | रॉयल्टी शुल्क १% | ०.३९ |
| | गुणवत्ता चाचणी शुल्क १.५% | ०.५८ |
| | आकस्मिक खर्च ४% | १.५४ |
| C | एकुण C | **४१.०९** |
| | जी.एस.टी (GST) शुल्क १२% | ४.९३ |
| | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ७.५% | २.८९ |
| | जी.एस.टी (GST) शुल्क १८% (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्कवर) | ०.५२ |
| | वार्षिक दरवाढ ५% | २.०५ |
| | सेंटेज चार्जेस ६% | २.४७ |
| | कामगार विमा ०.५% | ०.२० |
| | प्रकल्प विमा १% | ०.४१ |
| | एकुण | **५४.५६** |

**एकूण किंमत रु. ५४.५६ कोटी (अक्षरी रुपये चोप्पन कोटी छप्पन लाख फक्त)**

**शासन निर्णय:-**

**पुरुषोत्तमपुर, ता.माजलगाव, जि. बीड येथील पुरुषोत्तम मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे. या रु. ५४.५६ कोटी (अक्षरी रुपये चोप्पन कोटी छप्पन लाख फक्त)** इतक्या अंदाजित खर्चाच्या बांधकामास याद्वारे खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाचे स्थापत्य विषयक आराखडे व नकाशे तसेच मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे बाबतचे संकल्पन करुन त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेऊनच कामे सुरु करावीत.
२. ज्या कामास या निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे त्या कामास विचाराधीन असलेल्या नियोजित कोणत्याही पाटबंधारे / जलविद्युत पाणी पुरवठा प्रकल्पामुळे बाधा येत नाही किंवा हे काम अशा योजनांच्या जलाशयाखाली येणार नाही, अशा अर्थाचे योग्य नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरित केलेले नसून ते या प्रकल्पाच्या कागदपत्रात समाविष्ट नाही.

क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी या कामाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे / जलविद्युत पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची खात्री करुन घेतली पाहिजे या अटीवरच ही प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरहू कामाचा प्रस्ताव तयार करताना कामाचे समर्थन व आवश्यकता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील / पत्रातील सूचनांचे अनुपालन, या सर्व बाबींचा क्षेत्रीय पातळीवर विचार करण्यात आलेला आहे व प्रस्तावाची क्षेत्रीय पातळीवर सर्व तांत्रिक दृष्टीकोनातून छाननी करण्यात आलेली आहे, अशी धारणा आहे. तथापि, तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबींची पुन्हा एकदा खातरजमा करून घेण्यात यावी.

४. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी व काम सुरू करण्यापूर्वी पुढील बाबींची पुर्तता करण्यात यावी या अटीवरच ही प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

i. जी मंदिरे भारतीय पुरातत्व विभागाचे अखत्यारीत आहेत त्या मंदिरांचे बाबतीत,प्रस्तावित कामांचा आराखडा भारतीय पुरातत्व विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यांनी दिलेल्या परवानगी प्रमाणेच निविदा मागविण्यात याव्यात.

ii. बांधकामासाठी ज्या ठिकाणी वन व पर्यावरण व अन्य विभागांची (MCZMA/NCZMA) मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक त्या अटी पूर्ण करण्यात याव्यात. त्यासाठी संबंधीत संस्थाकडे अर्ज करण्याची जबाबदारी संबंधीत अधिक्षक अभियंता यांची राहील व अशी परवानगी प्राप्त झाल्यानंतरच संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याने नकाशास व अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता द्यावी.

iii. काम आदिवासी क्षेत्रातील असल्यास संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास यांचे परवानगीचे पत्र मिळविण्यात यावे व आदिवासी व्यक्तींच्या जमीनी संपादन करतांना प्रचलित कायद्याचे पालन करावे.

iv. कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करताना अस्तित्वातील बांधकाम पाडल्यानंतर मिळणाऱ्या सामुग्रीच्या किंमतीचा विचार अंदाजपत्रकात यथोचितपणे करण्यात यावा.

v. कामास वन जमिनीची आवश्यकता असल्यास संबंधीत प्राधिकरणाची परवानगी घेण्याची जबाबदारी तांत्रिक मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्याची असेल. वन जमिन ताब्यात मिळाल्याशिवाय प्रत्यक्षपणे स्थापत्य विषयक कामे सुरु करण्यात येऊ नये.

vi. राज्यदरसुची २०२१-२२ मधील General Note च्या अनुषंगाने बांधकाम कालावधी करीता आवश्यक सर्वसाधारण विम्याची तरतूद सादरकर्त्या सक्षम अधिकाऱ्याने प्रस्तावीत केल्यानुसार करण्यात आली आहे. तथापी सदर परिच्छेदानूसार देखभाल दुरुस्ती व दोषदायीत्व कालावधीकरीता विम्याची तरतूद तांत्रीक मान्यता प्रदान करणारे सक्षम अधिकारी तांत्रीक मान्यता अंदाजपत्रकाच्या गोषवाऱ्यामध्ये करतील असे ग्राह्य धरण्यात आले आहे. या शर्तीवर सदर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

vii. कामासाठी मंजूर निधीच्या मर्यादेच्या अधीन राहूनच खर्च करण्यात यावा.

viii. सदर मंदिर व त्याच्या परिसराच्या जागेबाबतच्या उपभोक्त्याच्या मालकी बाबतची खातरजमा करणारी कागदपत्रे प्राप्त करुन घेणे तसेच प्रस्तावित काम हे शासनाच्या ताब्यातील जागेवरच करण्यात यावे. खाजगी किंवा इतर मालकी जागेत करावयाचे झाल्याचे त्याचे प्रचलित भूसंपादन नियमानूसार लागणारी जमिन संपादीत करुन व जमिनीचा सर्व मोबदला अदा करुन अथवा संबंधीताकडून संमतीपत्र घेवून नंतरच कामास तांत्रिक मान्यता प्रदान करावी व त्यानंतरच कामास सुरवात करावी.

ix. कंत्राटदाराशी करावयाच्या करारनाम्यात बांधकामाचे संकल्पित आयुर्मान दर्शवून त्या कालावधीत कामात दोष निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदार व संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांची राहील. अशा प्रकरणी कंत्राटदार व संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल" अशा आशयाची अट करारनाम्यात समाविष्ट करावी.

x. सदर मंदिर व त्याच्या परिसर विकासाबाबतची कामे करण्यासाठीची ना-हरकत परवानगी व कामे पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल दुरुस्ती करण्याचे हमी पत्र उपभोक्त्याकडून मिळाल्यानंतर कामे सुरु करण्यात यावीत.

xi. सदर मंदिर परिसराचा विकास करण्यापूर्वी उपभोक्त्याकडून परिसराचा भूमी अभिलेख विभागाचा सिमांकन नकाशा प्राप्त करुन घेऊन कामे कार्यान्वीत करणे,

xii. प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी स्थानिक प्रशासन उदा. ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

xiii. सदरची कामे (मंदिर व परिसर विकास) पूर्ण करुन संबंधीताकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हस्तांतरीत करेल. त्यानंतर उपभोक्त्यास त्यामध्ये काही बदल करावयाचे झाल्यास त्याबाबी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या निदर्शनास आणूनच करण्याबाबतची अट हस्तांतरणामध्ये अंतर्भूत करावी.

५. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दराचे वर्णन/दर/दर पृथ:करणातील गृहीत धरलेली अंतरे व अनुषंगिक इतर बाबी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात शासनाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.

६. तांत्रिक मान्यता प्रदान करतांना प्रशासकीय मान्यतेतील वाव अन्य कोणत्याही योजनेत/कार्यक्रमात समाविष्ट नाही, याची खातरजमा तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांने करावी.

७. सदर कामावरील खर्च हा मागणी क्रमांक एच-०८, ४०५९३१४३ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च या प्रधान शिर्षाअंतर्गत भागविण्यात यावा.

८. या कामासाठी अर्थसंकल्पात सदर लेखाशिर्षात पुरेशी तरतूद असल्याशिवाय हे काम सुरु करण्यात येवू नये.

९. हा शासन निर्णय, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अनुमतीने काढण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२२०४२७१६३०५९५८१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRASHANT DATTATRAYA NAOGHARE

Digitally signed by PRASHANT DATTATRAYA NAOGHARE
DN: c=IN, o=PERSONAL, title=2651,
pseudonym=f5844207168a5fb67d073b74427b1ca6,
2.5.4.20=5516948DC0257AD8288D73B46DE5C0AC33B6DC5EF4E61293
4BEEDB4FFB3C8634, postalCode=440015, st=MAHARASHTRA,
serialNumber=c1053939b952ab2ea32a29655bf0c5192a35fe6b1a80f0c
9229a6df80ecdce19, cn=PRASHANT DATTATRAYA NAOGHARE
Date: 2022.04.27 16:32:22 +05'30'

**(प्रशांत द. नवघरे)**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) महालेखापाल-१ व २, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
२) महालेखापाल-१ व २, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई

५) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग), मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (सांस्कुतिक कार्य विभाग), मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (पर्यटन विभाग), मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (पर्यावरण विभाग), मंत्रालय, मुंबई
१४) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५० (मंजूर नकाशे व अंदाजपत्रकाच्या प्रतीसह)
१५) मुख्य अभियंता, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०
१६) जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी
१७) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन), यांचे स्वीय सहाय्यक
१८) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) व नगर विकास, यांचे स्वीय सहाय्यक
१९) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन), यांचे स्वीय सहाय्यक
२०) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे स्वीय सहाय्यक
२१) अधिष्ठाता, सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, ७८, डॉ. दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
२२) संचालक, पुरातत्व विभाग, सेंट जॉर्जेस हॉस्पीटल कॉम्पलेक्स, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
२३) कार्यासन अधिकारी, अर्थ-१/अर्थ-२/नियोजन-१/रस्ते-५/रस्ते-८/इमारती-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist.Beed (MS)

Sunderrao Solanke Mahavidyalaya Majalgaon
MAJALGAON DIST.BEED (MAHARASHTRA)

PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalya
Majalgaon Dist. Beed (M.S.)